# मागास क्षेत्र अनुदान निधी
## BACKWARD REGION GRANT FUND

# कार्यक्रम - मार्गदर्शिका

निर्मिती आणि वितरण

पंचायत राज मंत्रालय भारत सरकार

(बीआरजीएफ प्रशिक्षण वाचन साहित्य)

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| | **प्रकरण :-** | |
| १. | कार्यक्रमाची उद्दीष्टे आणि मुलभूत वैशिष्टये. | ०३-०६ |
| २. | मागास क्षेत्र अनुदान निधी कार्यक्रमाची नियोजन प्रक्रिया. | ०७-०७ |
| ३. | ग्रामपंचायती आणि नगरपालिकांचे नियोजन आणि अंमलबजावणी याकरीता क्षमतावृध्दी. | ०८-१४ |
| ४. | मागास क्षेत्र अनुदान निधी प्रकल्पाची कार्यवाही. | १५-२१ |
| | **परिशिष्ट :-** | २२-२२ |
| ५. | ११ व्या पंचावार्षिक योजनेदरम्यान नियोजन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना. | २३-५१ |
| ६. | राष्ट्रीय क्षमतावृध्दी कार्यक्रमाचे स्वरुप व आराखडा | ५२-९२ |
| ७. | अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या विकासाकरीता योजनांचा प्राधान्यक्रम. | ९३-९३ |
| | | |

**मागास क्षेत्र अनुदान निधी (Backward Region Grant Fund) या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट जिल्हे :-**

देशपातळीवर हा कार्यक्रम २५० जिल्हयांमध्ये राबविण्यांत येत असून महाराष्ट्रामध्ये पुढील १२ जिल्हयांच समावेश या कार्यक्रमामध्ये करण्यांत आला आहे.

***अहमदनगर, नंदुरबार, धुळे, गडचिरोली, औरंगाबाद, गोंदीया, चंद्रपूर, भंडारा, अमरावती, यवतमाळ, हिंगोली आणि नांदेड.***

# प्रकरण १ : कार्यक्रमाचे स्वरूप व उद्दिष्टे

**१.१** विकासातील प्रादेशिक असमतोल व विषमता दूर करण्याकरता, 'मागास क्षेत्र अनुदान निधी' या प्रकल्पाची स्वतंत्रपणे रचना करण्यात आली आहे. मागास म्हणून घोषित केलेल्या जिल्ह्यात सद्यःस्थितीत उपलब्ध असलेल्या सहाय्यक अनुदानात भर पडावी तसेच त्यांचे एकत्रीकरण आणि योग्य पुनर्योजन व्हावे म्हणून या निधीमार्फत वित्तीय साधने स्थानिक संस्थांना पुरवण्यात येतील. या निधीतून खालील उद्दिष्टे साध्य होतील :-

अ) स्थानिक पातळीवरची साधनसामुग्री व सुविधा आणि विद्यमान निधीतून योग्य न्याय मिळाला नाही अशा विकासाच्या गरजा यामधील तफावत भरून काढणे.

ब) लोकसहभागातून नियोजन, अंमलबजावणी आणि संनियंत्रण त्याचबरोबर निर्णयक्षमता वाढविण्यासाठी ग्रामपंचायत आणि नगरपालिका स्तरावरच्या प्रशासनाची क्षमतावृध्दी करणे.

क) स्थानिक संस्थाना नियोजन, अंमलबजावणी तसेच विविध योजनांचे सनियंत्रण करण्याकरीता व्यावसायिक तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करणे.

ड) स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या अपुऱ्या साधनांमुळे होणारी हानी टाळून पंचायती मार्फत केली जाणारी कामे अधिक परिणामकारकपणे करण्यासाठी कार्यक्षमता वृध्दींगत करणे.

**१.२** या परिपत्रकात नमूद केलेल्या मा. क्षे. अ. नि. (बी. आर. जी. एफ्. ) कार्यक्रम मार्गदर्शिका ही घटनेच्या ९ व्या भागात निर्देशित केलेली राज्ये व जिल्हे यांना लागू होते. राज्यघटनेच्या ९ व्या भागाच्या कक्षेत नसणारी राज्ये व जिल्हे यांना लागू असणाऱ्या मार्गदर्शक तत्वे व रुपरेखा या स्वतंत्रपणे व वेगळ्या देण्यात येणार आहेत.

**१.३** प्रत्येक जिल्ह्याने व्यावसायिक व्यवस्थापन तज्ञांचा आणि संस्थांचा आधार घेवून मागासलेपणाचा चिकित्सक अभ्यास केल्यावरच जिल्ह्याचा एकात्मिक विकास होईल. यामध्ये मुख्यतः जिल्ह्याच्या मुलभूत सर्वेक्षणाचा समावेश होतो. या सर्वेक्षणाचा उपयोग शेवटच्या टप्प्यात कार्यसिध्दीचे मूल्यमापन करण्यासाठी मूलाधार (संदर्भ) म्हणून करण्यात येईल. यानंतर लगेचच जिल्ह्याच्या मागासलेपणावर आधारीत वर्ष २००६- ०७ आणि ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडासाठी तपशिलवार लोकसहभागीय जिल्हा विकास दूरदर्शी / पथदर्शी आराखडा तयार करावयाचा आहे. घटनेच्या भाग ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा, तालुका व ग्रामस्तरांवरील पंचायती कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी घटनेच्या २४३ जी (२४३ क्र) नुसार हाती घेण्यात येईल. घटनेच्या २४३ झेड डी (२४३ZD) अंतर्गत २४३ जी (२४३ क्र) नुसार ग्रामपंचायती व २४३ डब्ल्यू (२४३ W) नुसार नागरी भागामध्ये नगरपालिका द्वारे पंचायती कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येईल.

१.४ या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या अनेक विकास कार्यक्रमांचा एकत्रितपणे विचार करुन विविध प्रकल्पांच्या वित्तीय साधनांचे संयुक्तपणे उपयोजन करून त्या द्वारे जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी जिल्ह्यात विकास कामांसाठी उपलब्ध होणाऱ्या साधन सामुग्रीचे (निधीचे) एकत्रीकरण करावयाचे आहे. स्थानिक विकास योजनांच्या तत्वांना बाधक ठरणाऱ्या कसल्याही प्रकारच्या अवाजवी योजनांचे स्वरूप 'माक्षेअनि' या कार्यक्रमाला दिले जाणार नाही. माक्षेअनि कार्यक्रमांतर्गत निवडायचे प्रकल्प/ योजना यांची निवड करणे तसेच त्यांची अंमलबजावणी करणे याकरता स्थानिक रहिवाश्यांचा सहभाग आवश्यक असून त्याकरीता ग्रामीण भागातील ग्रामसभा/ प्रभागसभा तसेच शहरी भागातील क्षेत्रीय तसेच प्रभाग समित्या यांचा सहभाग महत्वाचा आहे. ग्रामपंचायती आणि नगरपालिकांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या संसाधनांचा विचार करून लोकसहभागीय नियोजन आराखडा तयार करावयाचा आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो:

- राज्य आराखडयांतर्गत राज्यस्तरावरील योजना,
- केंद्रीय सहाय्य लाभलेल्या योजना विशेषकरून महत्वाकांक्षी योजना (flagship),
- राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रमाद्वारे नियमितपणे उपलब्ध होणारा निधी,
- केंद्रीय आणि राज्य वित्त आयोगांमार्फत दिली जाणारी 'मार्गदर्शित' (Tied) आणि मुक्त (Untied) अनुदाने,
- भारत निर्माण योजनेद्वारा उपलब्ध होणारी अनुदाने.

१.५ ग्रामपंचायती आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या विकास आराखड्यांचे एकत्रीकरण करून 'जिल्हा नियोजन समिती' (Article २४३ZD) जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करेल. या आराखडयात जिल्ह्यात उपलब्ध असणारी सर्व आर्थिक संसाधने प्रतिबिंबीत होतील आणि कसल्याही प्रकारची दिरंगाई, गळती, बदल अथवा पुनरावृत्ती न करता या साधनांचा पूर्ण क्षमतेने उपयोग कसा करता येईल हे देखील स्पष्ट होईल.

१.६ 'मा क्षे अ नि ' कार्यक्रम राबविताना दोन प्रकारचा निधी उपलब्ध होईल.

**अ) प्रतिवर्षास २५० कोटी रूपयांचा क्षमतावृध्दी निधी** :- विकास नियोजन, त्याची कार्यवाही, नियंत्रण, जमाखर्च आणि वित्तीय उत्तरदायित्व तसेच पारदर्शकता यांसाठी क्षमता वाढविण्याकरता या निधीचा उपयोग करता येईल. या निधीतून आवश्यक तेथे ठेकेदाराकडील तसेच इतर कंत्राटी पध्दतीच्या कामांचा समावेश करता येईल.

**ब) वित्तीय वर्ष २००६-०७ करता ३५०० कोटी रूपयांचे मुक्त** (Untied) **अनुदान. (११ व्या पंचवार्षिक योजनेत मंजूर झालेले वाढीव निधी यथावकाश संबंधितांना कळविण्यात येतील.)** :- या मार्गदर्शिकेत निर्देशित केल्याप्रमाणे ग्रामपंचायती आणि नगरपालिकांनी लोकांचा सहभाग घेवून ठरविलेल्या वेगळ्या कार्यक्रमांना जो खर्च लागेल त्याकरीता या मुक्तनिधीचा वापर करता येईल. तसेच जिल्ह्याच्या एकात्मिक विकासाकरता ज्या त्रुटी भासतील त्याही या निधीतून भरुन काढता येतील. या मुक्त निधीचा नियोजित वापर ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांनी 'पारदर्शक' तत्वानुसार करावयाचा आहे.

**१.७ या निधीच्या जिल्हावार वितरण करण्याचे निकष :-**

संबंधित प्रत्येक जिल्ह्याला भरीव स्वरूपाचा मुक्त निधी पुढील निकषानुसार वितरीत करण्यात येईल.

अ) प्रत्येक जिल्ह्याला निश्चितपणे प्रतिवर्षी किमान १० कोटी रूपये.

ब) एकूण निधीतील ५० टक्के निधी हा आर्थिक मागासलेपण या निकषानुसार सर्व जिल्ह्यामध्ये विभागला जाईल. राज्यातील मागासलेल्या जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या आणि विशिष्ट जिल्ह्याची लोकसंख्या या गुणोत्तरानुसार प्रत्येक जिल्ह्याला निधीतील वाटा मिळेल.

क) निधीतील उर्वरित ५० टक्के निधी हा एकूण मागासलेल्या जिल्ह्यांचे एकत्रित क्षेत्रफळ, आणि एका विशिष्ट जिल्ह्यातील मागास क्षेत्राचे त्यातील प्रमाण या निकषानुसार सर्व जिल्ह्यामध्ये वाटले जाईल.

**१.८ 'मा क्षे अ नि'** (BRGF) **निधीच्या ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांच्यातल्या वितरणाचे सूत्र :-** प्रत्येक राज्याने पंचायती आणि नगरपालिकांना (राजधानी आणि दशलक्षी लोकसंख्या असलेली शहरे वगळून) वितरीत करावयाच्या निधी वाटपाचे सूत्र ठरविताना पुढील गोष्टींचा विचार करण्यात यावा.

**अ)** प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायती आणि नगरपालिका) यांचा निधीतील हिस्सा.

**ब)** निधीतील ग्रामपंचायत तसेच नगरपालिकांना द्यावयाचा एकूण वाटा कसा व किती असावा हे ठरविण्याचे सूत्र.

**१.९ सूत्रांचे घटक** (Components) **ठरविताना खालील गोष्टी लक्षात घ्याव्या.**

अ) राज्याने तयार केलेला आणि स्विकारलेला कोणताही निर्देशांक ज्यामध्ये विकासाची पातळी / मागासलेपणा स्पष्ट प्रतिबिंबीत होतो.

ब) जिल्हास्तरीय नियोजन करण्यासाठी नियोजन आयोगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शिकेनुसार बाबी लक्षात घेऊन जिल्हावार कामाचा / गरजांचा अग्रक्रम ठरवावा (परिशिष्ट २).

क) निधीतील योग्य तो भाग कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रोत्साहन पर बक्षिसांकरिता राखीव ठेवावा.

निधींच्या वाटपांची सर्व पंचायती व नगरपालिकांमधील संबंधित कर्मचाऱ्यांना तपशीलवार माहीती करून द्यावी. यासंबंधीचे निकष झाल्यास, त्यांची अंमलबजावणी २००७-०८ या वर्षात तसेच ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या संपूर्ण काळात करण्यात यावी.

**१.१०** राष्ट्रीय सम विकास योजनेचे मागास क्षेत्र अनुदान निधीमध्ये रुपांतर/संक्रमण आणि २००६-२००७ साठी सुरुवातीच्या पद्धतीचे स्वरुप :

अ) राष्ट्रीय समविकास योजनेत अंतर्भूत केलेल्या सर्वच्या सर्व १४७ जिल्ह्याना त्यांनी या योजने अंतर्गत (आर.एस.व्ही.वाय.) राबविलेल्या व मान्य केलेल्या कामासाठी निधीचा वापर केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मा.क्षे.अ.नि. अंतर्गत निधी देण्यात येईल.

ब) राष्ट्रीय सम विकास योजनेत अंतर्भूत न केलेले मा.क्षे.अ.नि. जिल्हे वर्ष २००६-०७ मध्ये या मार्गदर्शिकेप्रमाणे जिल्हा विकासाची प्रक्रिया सुरू करतील. ज्या रासवियो मा.क्षे.अ.नि. जिल्ह्यांनी जिल्हा विकास आराखडा तयार केला आहे अशा जिल्ह्यांना वर्ष २००६-०७ साठी पूर्ण निधी प्राप्त होईल जेणेकरुन हे जिल्हे त्यांच्या आराखड्याची अंमलबजावणी त्वरित करु शकतील.

क) जिल्ह्यात राबविल्या जात असलेल्या महत्वाच्या योजनांचा एकत्रित विचार करुन ज्या रा. स. वि. यो मध्ये नसलेला मा.क्षे.अ.नि. जिल्ह्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या मदतीने लोकसहभागीय जिल्हा विकास आराखडा सादर केला आहे अशा जिल्ह्यांना वर्ष २००६-०७ साठीचा रु. १० कोटीचा पहिला हप्ता दिला जाईल. घटनेच्या कलम २४३ झेड डी नुसार ज्या राज्यांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या स्थापनेची प्रक्रिया चालू आहे किंवा ज्या राज्यात दिनांक १५ फेब्रुवारी २००७ पूर्वी जिल्हा नियोजन समित्या स्थापन झाल्या आहेत अशी राज्ये, वर्ष २००६-०७ साठीच्या अनुदानासाठी पात्र ठरतील.

ड) वर्ष २००६ -०७ मध्ये क्षमता बांधणीसाठी देण्यात येणाऱ्या निधीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या स्थापनेची अट शिथील करुन सर्व राज्यांना निधी देता येईल.

**१.११ अपेक्षित बदल/ परिणाम :- मागास क्षेत्र अनुदान निधी कार्यक्रमाच्या पुढाकाराने पुढील बदल अपेक्षित आहेत.**

- प्रादेशिक असमतोल / विषमता कमी करणे.
- मागास जिल्हयातील दारिद्रय निर्मूलन करण्यामध्ये हातभार लावणे.
- उत्तरदायी व जबाबदार पंचायत व नगरपालिका संस्था निर्माण करण्यास चालना देणे.

# प्रकरण २ : ‘ मा क्षे अ नि ’ (बी०आर०जी०एफ०) नियोजनाची प्रक्रीया

२.१ संबंधित मागासलेल्या जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत अथवा नगरपालिका या योजनेचे प्राथमिक घटक (युनिट) असतील. घटनेच्या २४३ झेड डी कलमानुसार नियुक्त झालेल्या जिल्हा नियोजन समित्यांनी तयार केलेल्या ‘जिल्हा-आराखडयामध्ये’ मागास जिल्ह्यातील ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांनी तयार केलेल्या कार्यक्रमांचा समावेश केला जाईल. नियोजन आयोगाने वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियोजन कार्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील. ११ व्या पंचवार्षिक योजनेकरता राज्यांच्या वार्षिक योजनांकरता तसेच जिल्हावार योजनांकरता उपयुक्त असलेल्या केंद्रीय नियोजन मंडळाने, ज्या विद्यमान मार्गदर्शक सूचना केल्या आहेत त्या परिशिष्ट क्र. २ मध्ये नमूद केल्या आहेत.

२.२ **नियोजन मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये निर्देश केलेल्या मंडळाचा दृष्टिकोन (Vision) लक्षात घेवून जिल्हा योजनेचा समग्र आराखडा तयार करताना आर्थिक हितापासून वंचित राहीलेल्या समूहांचा अंतर्भाव झाला आहे याची खात्री करुन घेणे.**

नियोजन मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अभिप्रेत असलेला दृष्टिकोन समोर ठेवून जिल्हा विकास नियोजन करताना त्यात अनुसूचित जाती व जमाती यांच्या विकासासाठी संबंधित बाबींची विशेष काळजी घेतली गेली पाहिजे. हे साध्य करण्याकरीता खालील बाबींकडे विशेष लक्ष पुरवावे.

- प्रत्येक ग्रामपंचायत आणि नगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी योजना निहाय उपयोजन दर्शवणारी उपयोजना तयार करावी.

- अनुसूचित जाती आणि जमाती यांना लाभदायक असणाऱ्या योजनांसाठी सदर पंचायतीच्या/ नगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात असणाऱ्या या समूहांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी दिला जावा.

- ज्या गावात अनु. जाती व अनु. जमाती लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असेल त्या खेड्यात शाळा, अंगणवाड्या आणि आरोग्यकेंद्रे इ. सोयी सुविधा उपलब्ध करण्याला प्राधान्य द्यावे.

# प्रकरण ३ : पंचायती आणि नगरपालिका यांना नियोजन व त्याची कार्यवाही यशस्वी रितीने करण्यासाठी त्यांच्या सक्षमीकरणाची उभारणी

३.१ मा क्षे अ नि (बी.आर.जी.एफ.) या नव्या कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणी करण्याकरता ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांचे आर्थिक सामर्थ्य वाढविणे हा त्या योजनेचा असाधारण महत्व असलेला घटक आहे. अल्पकाळात काही भरीव दृश्य स्वरूपाची ठोस कामे पार पाडता यावी म्हणून आवश्यक असलेली क्षमता वाढविण्याकरता प्रथम, स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून, एक आदर्श आराखडा तयार करावा लागेल. त्याकरता आवश्यक कामाचा तपशीलवार नमूना परिशिष्ट ३ मध्ये दिला आहे. मा.क्षे.अ.निधीच्या रचनेत यामुळे **समर्थ भारत आंदोलनास** उपयुक्त ठरणारे ग्रामीण गट तयार होतील.

३.२ **प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता लागणारी वित्तीय साधने :**

३.२.१ 'मा क्षे अ नि' यशस्वी अंमलबजावणी करता, त्यात सहभागी झालेल्या व्यक्तिंना नवी आव्हाने पेलण्याकरीता आणि अडचणींवर मात करण्यासाठी सातत्याने त्यांची कार्यक्षमता वाढवावी लागेल. पंचायतींची ही क्षमता वाढविण्यासाठी 'मा क्षे अ नि ' मार्फत प्रतिवर्ष रू. २५० कोटीचा निधी उपलब्ध केला जाईल. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला रु १ कोटी या दराने देशातील सर्व अविकसित जिल्ह्यांना हा निधी देण्यात येईल. याशिवाय इतर कारणांकरताही क्षमता वाढविण्यासाठी जिल्ह्याच्या विकासनिधीतून वेगळ्या निधींची तरतूद खालीलप्रमाणे करण्यात येईल.

३.२.२ क्षमता वृध्दीचे विविध घटक आणि त्यांना 'मा क्षे अ नि' द्वारा उपलब्ध असलेल्या अनुदानांचे स्त्रोत (मार्ग) हे खालील तालिकेत दिले आहेत.

**तक्ता क्र. १**

| अ. न. | क्षमतावृध्दी घटक | उपघटकांचे वर्णन | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| अ | ग्राम पंचायतीच्या स्तरावर नियोजन व अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची तरतूद. | खालील परिच्छेद क्र.३.२३ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे पंचायत स्तरावर कार्यकर्त्यांची वाढ करता येईल.<br>पंचायती व नगरपालिका कार्यकर्त्यांच्या संख्येत खालील शर्तीनुसार वाढ करता येईल.<br>**अ)** ही रक्कम पंचायती व नगरपालिकांच्या विद्यमान सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार देण्याकरता वापरु नये. | जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या एकूण विकास निधीच्या ५ टक्के |

| अ.न. | क्षमतावृध्दी घटक | उपघटकांचे वर्णन | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| | | **ब)** ज्या ठिकाणी आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची उणीव भासेल त्या ठिकाणी या निधीच्या सवलतीचा लाभ मिळेल.<br><br>**क)** राज्य शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार पंचायती व नगरपालिका यांनी नव्या कर्मचाऱ्यांची भरती करावयाची आहे.<br><br>**ड)** नव्याने घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे पगार चुकते करण्याची जबाबदारी पंचायतींनी यथावकाश घ्यावयाची आहे. त्याकरता केंद्रीय तथा राज्य, वित्त आयोग अंतर्गत हस्तांतरीत केलेल्या अनुदानांचा वापर करावा अथवा पंचायतींनी त्यांच्या महसुली उत्पादनातून ही तूट भरुन काढावी. | |
| ब | नियोजन आणि अंमलबजावणी विशेषतः विकेंद्रीत नियोजन प्रक्रियेस ग्रामसभा आणि पंचायत राज संस्था स्तरावर आवश्यक असणा-या साधन व्यक्ती यासाठी तांत्रिक सहाय्य किंवा तशी कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन देणे | **अ)** माध्यमिक पंचायत पातळीवर किंवा त्याहून खालच्या पातळीवर विस्तार अथवा संसाधन केंद्र सुरू करण्याकरता वित्तीय तरतूद, प्रशासनातील विविध विकास विभागात काम करणारे अनुभवी कर्मचारी किंवा मान्यताप्राप्त तज्ज्ञ यांना एकत्रित करून त्यांचे पंचायती वा नगरपालिकांना मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याकरता केलेली तरतूद, तज्ज्ञ व्यक्तींच्या सेवा मिळविण्या करता केलेली आर्थिक तरतूद.<br><br>**ब)** साधन व्यक्तींच्या तसेच बाह्यसेवा माध्यमातून व्यावसायिक सेवा उपलब्ध करणे | क्षमता वृध्दीसाठी उपयोजलेल्या रु.२५० कोटींच्या निधीतून |

| अ. न. | क्षमतावृध्दी घटक | उपघटकांचे वर्णन | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| क | जेथे आवश्यक असेल तेथे कार्यालयीन इमारतीसह सर्व कार्यालयिन सुविधा उपलब्ध करणे आणि ही कार्यालयी, रस्ते, दूरध्वनी, वीज पुरवठा आणि इंटरनेट सुविधांनी जोडणे | पंचायतीच्या कामकाजासाठी आवश्यक भौगोलिक सुविधांसाठी लागणाऱ्या खर्चाच्या ३० टक्के रक्कम ही पंचायतींच्या उत्पन्नाच्या इतर माध्यमातून उभी करावी. | विकास निधीतील अनुदानाचा वापर करणे |
| | | संगणक व त्यांना लागणारी आवश्यक साधनसामुग्री मिळविणे, ब्रॉड बँडची सुविधा प्राप्त करणे आणि पंचायत पातळीवर उपयोगी पडणारी सॉफ्टवेअर वापरण्याचे प्रशिक्षण देणे. | २५० कोटी रूपये क्षमता वृध्दी निधीतून. |
| | | सर्व पंचायतींना टेलिफोन सुविधा उपलब्ध करून देणे. | केंद्रीय दूरध्वनी विभागा मार्फत पंचायतींना टेलिफोन सुविधा मिळवून देण्याचा प्रयत्न करणे. |
| ड | आवश्यक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे. | ***परिशिष्ट क्र. ३*** मध्ये उल्लेख केलेल्या राष्ट्रीय क्षमता बांधणी आराखडयामध्ये निर्देशित यर्थाथदर्शी आराखडया प्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.<br><br>***परिशिष्ट क्र. ३*** मध्ये वर्णन केलेल्या 'मदत केंद्राची' (Help Line) स्थापना आणि त्या कार्यान्वित ठेवण्याची यंत्रणा. विद्यमान टेलिफोन सहाय्यक सेवा पुरवणाऱ्यांना टेंडर मागवून ही 'मदत सेवा केंद्रे' चालविण्यास द्यावीत. | रू.२५० कोटीचा क्षमता वृध्दी निधी |

| अ. न. | क्षमतावृध्दी घटक | उपघटकांचे वर्णन | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| इ | आर्थिक मागासलेपणाचा शोध घेणारे अभ्यास व सर्वेक्षण. | राष्ट्रीय पंचायत समग्र माहीती केंद्र यामध्ये नोंद होण्याकरीता संगणकातर्फे माहीती भरून पाठवणे.<br><br>अंतराळविभाग आणि नॅशनल इन्फर्मेशन सेंटर यांच्या माहीतीच्या आधारे, स्थानिक नियोजनाकरता उपयुक्त असलेल्या विविधस्तरीय प्रणाली (जि. आय एस) तयार करणे. | २५० कोटी रूपये क्षमता वृध्दी निधी |
| फ | जमा खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी व त्या जतन करण्यासाठी, लेखा व परिक्षणाची निर्मिती | | २५० कोटी रूपये क्षमता वृध्दी निधी |
| ग | पंचायती आणि जिल्हा नियोजन समित्या यांच्या योजना तयार करण्याकरता व त्यांचे एकत्रित संकलन करण्याकरता सहाय्य मिळविणे. | | २५० कोटी रूपये क्षमता वृध्दी निधी |

३.२.३ प्रत्येक पंचायतीमध्ये समाजकार्य करणाऱ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धी करण्यासाठी प्राधान्याने भर देणे. :- सामाजिक क्षमता व सामर्थ्य वाढविण्यासाठी ग्रामपंचायतीस प्रशिक्षित कर्मचारी मिळवून देण्यावर ‘मा क्षे अ नि’ प्रकल्पात विशेष भर देण्यात येईल. त्या उद्दिष्टाकरता पंचायतींनी खाली दिलेल्या स्वरूपाची कारवाई करावी.

अ) **कृषि विस्तार सेवेसाठी प्रशिक्षित स्थानिक कर्मचारी :**
शेती, जलव्यवस्थापन, पशुपालनविकास, हंगामानंतर कृषि व्यवस्थापन आणि कृषि-व्यापार उद्योग यासंबंधी खेड्यातील रहिवाशांना माहीती व ज्ञान करून देण्यासाठी शेती विषयक योग्य अभ्यास असलेला अष्टपैलू व्यक्तित्वाचा कर्मचारी निवडावा. ही निवड स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत व्हावी.

ब) **महिलांचे सबलीकरण करणासाठी स्थानिक व्यक्ति वा स्वयंसेविका :-**
महिलांची साक्षरता, छोट्या प्रमाणावर महिलांच्या बँका व वित्तीय संस्था या कार्यांचे नेतृत्व व संघटन करणारी एक व्यक्ति नियुक्त करण्यात यावी. या कामासाठी

पंचायतीत निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींची निवड 'महिला संघटक' म्हणून केल्यास जास्त बरे होईल.

स्वयंसहाय्यता गटाचे (Self-Help-Group) संघटन करणे, निरक्षर असल्यास पंचायतीच्या मार्फत चालणाऱ्या साक्षरतावर्गात नाव नोंदवणे आणि साक्षरता वर्गात शिकवण्याचे काम करण्याची तयारी असलेल्या साक्षर महिलेस ते काम सोपविणे, ही कामे या संघटक व्यक्तीकडून व्हावीत ही अपेक्षा आहे. सरकारकडून साक्षरतेसाठी आवश्यक असलेली ३ प्राथमिक पुस्तके आणि महिलांचे हक्क समजावून देणारी ४ थी पुस्तिका उपलब्ध करून देण्यात येतील. साक्षरतावर्ग चालू असताना बचत आणि पतपुरवठा या सेवा मिळण्यासाठी काही महिलांच्या गटांनी पतसंस्था चालू करण्यास उत्तेजन द्यावे. वर्षाअखेरीस एक सार्वत्रिक परीक्षा घेवून साक्षरतेसंबंधी खात्री करून ज्या व्यक्तीने साक्षर करण्याचे काम केले त्या व्यक्तिला साक्षर झालेल्या प्रत्येक निरक्षरागणिक शंभर रूपयांचे मानधन देण्यात येईल. १० कोटी महिलांना साक्षर करणे, राष्ट्रातल्या एकूण महिलांचे ५ लाख स्वयंसहाय्यता गट तयार करणे, या सामाजिक चळवळीतून महिलांच्या सक्षमीकरणाचे काम करणाऱ्या क्रियाशील महिला कार्यकर्त्यांची नेतृत्व गुण असलेली संघटीत फळी निर्माण करणे ही या प्रकल्पाची प्रमुख उद्दीष्टे आहेत.

**क) स्थानिक पातळीवर प्रशिक्षित अभियंता तयार करणे :-**

स्थानिक लोकांना जुजबी, कामचलाऊ अभियांत्रिकी बांधकामे करण्याची क्षमता देणे. वीजपुरवठा, वीजेची उपकरणे यांची दुरूस्ती, हातपंप तसेच शेतकामासाठी वापरण्यात येणारा पंपसेट यांची दुरूस्ती करणे ही व अशा प्रकारची किरकोळ दुरूस्तीची कामे करण्यात कुशल अशी किमान एक व्यक्ति प्रत्येक खेडयात असावी या दृष्टीने प्रशिक्षण सोयी उपलब्ध करणे.

**ड) व्यावसायिक नियोजनाकरिता सहाय्य :-**

हातमाग, हस्तकला आणि ग्रामीण उद्योग यांच्यातील स्थानिक लोकांचे कौशल्य वाढविण्यासाठी, प्रारंभीच्या दोन वर्षात अनुभवी व निष्णात कारागीरांचे मार्गदर्शन मिळवण्यासाठी, स्थानिक संस्थांनी मध्यस्थ म्हणून काम करावयाचे असून त्यायोगे मा.क्षे.अ.नि. मार्फत निधीतून नियोजन व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यावसायिकांचे सहाय्य घेता येणे शक्य होईल. खेड्यातील परंपरागत उद्योगांचे आधुनिकीकरण व व्यावसायिकीकरण करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर हातमाग व हस्तकला उद्योगांच्या प्रशिक्षण केंद्राची निवड हेरून ठेवली आहे. कलात्मक रेखाकृति (डिझाईन्स) आणि कौशल्याचे उन्नयन साधण्यासाठी विद्यमान व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या दर्जेदार (मॉडेल्स) संस्थांचे सहकार्य मिळवणे ही या प्रकल्पा पाठीमागची भूमिका आहे.

३.२.४ **वर उल्लेख केलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण** :- मा.क्षे.अ.निधीतून पंचायत पातळीवर अशा कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर खर्च करता येईल. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे नियोजन हे राज्य पातळीवर ठरविता येईल; तसेच परिशिष्ट ३, परिच्छेद क्र. २.३१ मध्ये उल्लेख असलेला अभ्यासक्रम शिकविण्याकरता स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या विद्यमान अभियंते, कृषिवैज्ञानिक, कृषि व पशुसंवर्धन विभागातील अधिकारी आणि खाजगी तसेच सहकारी संस्थामधील तज्ज्ञ यांची नियुक्ती करावी.

३.३ **प्रशिक्षण कार्यक्रम** :- स्थानिक पातळीवर क्षमता वृध्दीकरीता उपयुक्त असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे खाली दिली आहेत. (संदर्भ भाग ड, तालिका क्र.१)

अ) पंचायती आणि नगरपालिकांमधील निर्वाचित प्रतिनिधींना त्यांच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडण्याकरता उच्च दर्जाचे अद्ययावत ज्ञान आणि कौशल्य मिळवून देणे.

ब) पंचायतींना सोपवलेली कामे, परिणामकारकरीतीने पार पाडण्याकरता पंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या किंवा त्यांच्याशी निकटचा संबंध असणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांना तयार करणे.

क) स्वयंसहाय्यता गट आणि वस्ती पातळीवरील गट मंडळे, संघटना या सारख्या दबाव गटांच्या सामर्थ्यात  वाढ करून त्यांच्या अधिक सहभागाने ग्रामसभेच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे.

परिशिष्ट ३ मध्ये उल्लेख असलेल्या केंद्रीय पंचायत राज्य मंत्रालयाने तयार केलेल्या ‘राष्ट्रीय सामर्थ्य उभारणी’ कार्यक्रमाच्या चौकटीच्या ढोबळ परिमितीत बसणाऱ्या खास राज्य व जिल्हा स्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यूहनीती व योजना या राज्य सरकारांनी करावयाच्या असून त्याकरता केंद्रीय पंचायतराज मंत्रालयाचे सुयोग्य सहाय्यही उपलब्ध होईल.

वरील घटकांचा विचार करुन केंद्रीय पंचायतराज मंत्रालयाच्या सहकार्याने व तांत्रिक मार्गदर्शनाखाली ‘राज्य क्षमतावृध्दी यथार्थदर्शी आराखडा’ पुढील ५ वर्षाकरिता तयार करावयाचा आहे. या कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन व अंमलबावणी प्रभावीपणे होण्यासाठी प्रमुख (नोडल) यंत्रणा म्हणून विशेषतः ‘राज्य ग्रामीण विकास संस्था’ (SIRD) ची निवड करावी.

सदर कार्यक्रमाचे सनियंत्रण व अंमलबजावणी  प्रभावीपणे व्हावी म्हणून उच्च पातळीवरची एक समिती (High Power Committee) नियुक्त करण्यात यावी व त्या समितीकडून पंचवार्षिक योजनेच्या मसुद्याला मान्यता द्यावी. या योजनेत भांडवली व महसूली खर्चाचा समावेश करावा.

**पंचायत राज मंत्रालयाकडून खालील शर्तींनुसार राज्यांना दरवर्षी निधी पुरवण्यात येईल :-**

अ) राज्य पातळीवरील उच्च स्तरीय समितीने मान्यता दिलेला आराखडा प्राप्त झाल्यानंतर.

ब) योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य पातळीवर किती व कोणत्या कारणांकरता निधी वेगळा ठेवून घेण्यात येईल, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी तो कशा प्रकारे वितरीत केला जाईल. यासंबंधीचा खुलासा केल्यानंतर,

क) यथार्थदर्शी आराखडयाअंतर्गत प्रत्येक वर्षाचा आराखडा व त्यामध्ये प्रत्येक घटकासाठी केलेली तरतूद दर्शविल्यानंतर.

**३.४ प्रशिक्षण कार्यक्रमाच्या फलनिष्पत्तीचे मूल्यांकन नोंदणी व्यवस्था (दफ्तर) आणि नियंत्रण :-**

पंचायतराज मंत्रालयाने नियुक्त केलेल्या संस्थांकडून प्रशिक्षण कार्यक्रमाचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन स्वतंत्रपणे करून घेण्यात येईल.

११ व्या योजनेतील शेवटच्या तीन वर्षात (म्हणजे २००९-२०१२) आर्थिक सामर्थ्य उभारणीचा कार्यक्रम या संपूर्ण कार्यक्रमाचा प्रमुख भाग म्हणून चालूच राहील पण या तीन वर्षात कार्यक्रमाचे नियंत्रण व मूल्यांकन यांवर विशेष भर देण्यात येईल.

# प्रकरण ४ : 'मा.क्षे.अ.नि.' प्रकल्पाची कार्यवाही

## ४.१ पंचायत स्तर अंमलबजावणी यंत्रणा :

४.१.१ घटनेच्या भाग (क्ष्र्) व भाग (क्ष्र्-ऋ) प्रमाणे निर्माण केलेल्या पंचायती, नगरपालिका व जिल्हा नियोजन समिती यांनी सदर कार्यक्रमाचे व्यवस्थापन करावयाचे आहे. याकरीता पंचायत व नागरी पातळीवर कोणतीही विशेष मंडळे, व्यवस्थापन समित्या, संस्था यांची नियुक्ती करू नये. सदर कार्यक्रमांचे पर्यवेक्षण, व्यवस्थापन व संनियंत्रण अधिक चांगले करण्याकरता कायदेशीर तरतुदीप्रमाणे विशेष अधिकार लाभलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज संस्थांच्या 'स्थायी समित्यांकडे'च ही कामे सोपवावीत. याव्यतिरिक्त, याबाबतीत राज्य सरकारने खालील उपाय योजावेत.

४.१.२ संबंधित कार्यक्रमाच्या परिस्थितीत येणारे क्षेत्रनिर्धारण लक्षात घेवून पंचायती व नगरपालिका यांनी त्याची अंमलबजावणी सुयोग्य रीतीने करावी. वित्तीय अधिकार केंद्रे व त्यावर अवलंबून असलेली दुय्यम दर्जाची केंद्रे यांच्यातील भिन्नतेचे तत्व लक्षात घेवून उच्च दर्जाच्या पंचायतीने उदा. : जिल्हा पातळीची वा माध्यमिक पातळीची पंचायत यांनी त्यांच्या मंजुरीच्या अधिकाराच्या किमान मर्यादेपेक्षा कमी खर्च असलेल्या कामास ही मंजुरी देवून त्यास आवश्यक असलेली रक्कम ही छोट्या ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करावी. (उदाः रू. २ लाखापेक्षा कमी रक्कम असलेल्या कामांना मंजुरी देता येत नसल्यास व कामाचा खर्च रू. दीड लाख रूपये असेल तर मोठ्या स्तरावरच्या पंचायतीने आपली पृष्ठ मर्यादा (Floor Limit) ओलांडून सदर निधी छोटया पंचायतीस उपलब्ध करून द्यावा. पंचायती वा नगरपालिका यांच्या कार्यक्षेत्राच्या कक्षेबाहेरच्या कामांकरता जिल्हा नियोजन समितीने सरकारच्या कोणत्या विभागाकडून वा यंत्रणेमार्फत निधी मिळू शकेल या संबंधीचा निर्णय घेवून तो निधी पंचायतीस सुपुर्द करून कार्यक्रमाची अंमलबजावणी पंचायतीमार्फत करून द्यावी.

## ४.२ राज्यपातळीवरची मंजूरी :

४.२.१ याकरिता मागास क्षेत्र अनुदान निधी जिल्हयातील विकास कामांचा आराखडा तसेच प्रशिक्षण आराखडा यांना मान्यता देऊन अंमलबजावणी सुलभ होण्यासाठी राज्य सरकारमार्फत राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये विकास आयुक्त तसेच नियोजन, पंचायत राज्य विभाग, नगरविकास तसेच विकास कामांची अंमलबजावणीमध्ये सहभाग असलेल्या इतर विभागांचे सचिव, केंद्रीय पंचायत राज्य मंत्रालयाचे प्रतिनिधी व नियोजन आयोगावरील राज्य नियोजन सल्लागार इ. प्रतिनिधींचा समावेश असावा. प्रमुख कार्यान्वयीत विभागाचे सचिव (नोडल विभाग) हे सदर उच्चाधिकार समितीचे सदस्य सचिव असतील.

४.२.२ या नोडल विभागाने 'मा.क्षे.अ.नि.' प्रकल्प राबविणाऱ्या जिल्ह्यांमधील सर्व पंचायतीसंबंधीची संपूर्ण माहिती व आकडेवारी संगणकाद्वारे अद्ययावत स्वरूपात उपलब्ध करावी. या

पायाभूत माहिती मध्ये 'मा.क्षे.अ.नि.' द्वारा पंचायतींना उपलब्ध झालेल्या विकासनिधीची बँक खाती तसेच पंचायतीने प्रकल्पनिधीचा योग्य उपयोग केल्याचे प्रमाणपत्र यासंबंधीच्या नोंदीही यात असाव्यात.

**४.३ विकासनिधीचे उद्देश :**

४.३.१. जिल्ह्याच्या समग्र विकासात ज्या ठिकाणी पैशाची तूट भासते ती भरून काढण्याकरिता 'मा.क्षे.अ.नि.' द्वारा उपलब्ध विकासनिधीचा उपयोग करावा. घटनेच्या ११ व्या व १२ व्या अनुसूचि (schedule) ज्या बाबी पंचायती व नगरपालिका यांना सोपविण्यात आल्या आहेत त्याकरिता लागणारा खर्च या निधीतून करावा. स्वागत कमानींचे बांधकाम, धार्मिक इमारती किंवा धार्मिक संस्थांच्या आवारात केलेली बांधकामे किंवा तत्सम प्रकारच्या बाबींवर या निधीतून खर्च केला जाऊ नये. परिशिष्ट क्र. ४ मध्ये अनुसूचित जाती व जमाती याचे विकास विषयक उपक्रम तपशीलवार दिलेले आहेत.

४.३.२. **महत्वाकांक्षी कार्यक्रमाशी निगडीत स्थानिक संसाधनांमधीत तूट भरून काढणे**.

स्थानिक विकासास अनुकूल अशी संरचना करताना ज्या त्रुटी भासतील त्या भरून काढण्याकरीता मा.क्षे.अ.निधीतून राष्ट्रीय महत्वाकांक्षी प्रकल्पांसाठी पैसा उपलब्ध करावा. भारत निर्माण योजनेच्या स्थानिक संरचनामध्ये सर्वसाधारणपणे खालील गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवावे.

अ) राष्ट्रीय पातळीवर उपलब्ध केलेल्या गुंतवणूकीतून जिथे भरीव विद्युतीकरण करणे शक्य नाही अशा ग्रामिण भागात विद्युतीकरण करणे. या ठिकाणी पंचायत राज संस्थांना राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेत तसेच कृषी पंप संचातील गुंतवणूकीत वाढ करण्यासाठी प्रोत्साहीत केले जाऊ शकते.

ब) ज्या डोंगरी व आदिवासी भागात प्रचलित पंपसेट किंवा नळाच्या द्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करता येणे अशक्य आहे. त्या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यासाठी योग्य तंत्राचा स्वीकार करून उदा. वजनाने प्रभावित (Gravity-Fed) पाणी साठवण व्यवस्था तसेच स्वच्छ विहीरीतून (Sanitary Wells) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा. 'मा क्षे अ नि'द्वारा मिळणाऱ्या निधीतून नळाच्या द्वारे पाणीपुरवठा किंवा पूर्वीच्या पाणीपुरवठा योजनेमध्ये सुधारणा करण्यासाठी पंचायतींना प्रोत्साहन द्यावे.

क) ज्या ठिकाणी नवी घरे बांधण्याच्या भारतनिर्माण प्रकल्पात कमतरता भासेल त्या ठिकाणी 'इंदिरा आवास योजनेतर्फे 'गृहनिर्माण कार्यक्रमाचा विस्तार करावा. जर एखाद्या जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्यातील घरांची समस्या पूर्णपणे नाहीशी करण्याचे ठरवले आणि पंचायतीनेही या गोष्टीस अग्रक्रम दिला तर ग्रामीण भागात घरांकरता 'मा क्षे अ नि' चा वापर केला जाऊ शकतो.

मा.क्षे.अ.निधिचे वरील भारत निर्माण योजनेतील ध्येय उदा. ग्रामीण रस्ते, ग्रामीण दुरध्वनीकरण आणि लघु सिंचन प्रकल्प साध्य करण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (पी.एम.जी.एस.वाय) जि.ओ.आय. - वायएसओ निधी आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा यातील (लघुसिंचन व सिंचनचारी कामे) यामार्फत करता येईल.

**४.४ विकास अनुदानांच्या उपयोगा करीता प्रस्ताव :**

*या प्रस्तावामध्ये खालील गोष्टींची सविस्तर माहिती असावी :*

अ) विकासाची नवी दृष्टि अंगिकारणे तसेच जिल्ह्याच्या विकासाच्या उद्दीष्टांचा अग्रक्रम ठरवणे हे लक्षात घेवून प्रत्येक जिल्हा, तालुका गट आणि ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध निधीचे सुयोग्य वाटप करण्याकरता आवश्यक निकष ठरविणे.

ब) केंद्रीय सहकार्याच्या योजनासहित जिल्ह्याला विविध मार्गांनी जे निधी उपलब्ध होतात त्यांचे तपशील.

क) पंचायती आणि नगरपालिका यांना पुरेशी वित्तीय साधने उभी करण्याकरता राज्यसरकारने आर्थिक अधिकार बहाल करण्याकरता उचललेली पावले तसेच पंचायतींना त्यांचे स्वतःचे खर्च भागविण्यासाठी उत्पन्न वाढीकरता उत्तेजन देणे.

ड) राज्य सरकारांनी पंचायतींना प्रशासकीय व तांत्रिक सहाय्य देण्याकरता केलेल्या उपाययोजना तसेच ते सहाय्य मिळविण्यासाठी कंत्राटी किंवा बाहेरील व्यावसायिकांची मदत घेणे.

**४.५ खाली दिलेल्या तालिका क्र. २ मध्ये जिल्ह्यांना निधी मिळविण्यासाठी आवश्यक अटी कोणत्या त्या नमूद केल्या आहेत.**

**तक्ता क्र. २**

| **कालावधी** | **निधी मंजूर होण्यासाठी अटी** |
|---|---|
| २००६-०७ कार्यक्रमाचे प्रथम वर्ष | सदर मार्गदर्शक सूचनांना अनुसरून क्षमता वृध्दी निधी प्रत्येक जिल्ह्यास वितरीत केला जाईल. कार्यक्रमाच्या उच्चाधिकार समितीने मंजूरी दिलेला, जिल्हा नियोजन समितीने तयार केलेला संपूर्ण सर्व समावेशक प्रथम वर्ष योजना आराखडा सादर केल्यास, अशांना अग्रक्रमाने विकास अनुदाने दिली जातील. |
| २००७ - ०८ | अनुदान प्राप्त करण्याकरता विहीत नमुन्यात ज्या जिल्ह्यांचे अर्ज येतील त्यांना अनुदानाचा १ ला हप्ता विनाशर्त मिळू शकेल. अनुदानाचा दुसरा हप्ता खालील अटींची पूर्तता झाल्यास दिला जाईल. |

| कालावधी | निधी मंजूर होण्यासाठी अटी | |
|---|---|---|
| | अ | प्रकल्पाच्या वस्तुनिष्ठ व वित्तीय प्रगतीचे अहवाल सादर करणे. |
| | ब | मागील वर्षी उपलब्ध झालेल्या निधीपैकी प्रारंभीची शिल्लक त्या निधीच्या ४० टक्क्यांपेक्षा जास्त नसावी. या मर्यादेपेक्षा जितकी रक्कम शिलकीमध्ये अतिरिक्त असेल ती अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यातून वजा करुन उर्वरित रक्कमच दिली जाईल |
| | क | जिल्ह्याच्या प्रकल्पविषयक जमाखर्चाचे परीक्षण करताना चार्टर्ड अकौंटट/ऑडिटर यांनी बँकेचे रिकन्सिलेशन सर्टिफिकेट, तसेच विविध उपक्रम राबविणाऱ्या यंत्रणा/संस्था यांचेही हिशेब तपासावे. तसेच अग्रिमाचा उल्लेख खर्च असा न करता मागील वर्षाच्या जमाखर्चाच्या तपासणीचा अहवाल तसेच प्रत्यक्षात कोणती कामे पूर्ण झाली त्यांचा अहवाल सादर करावा. |
| | ड | परिशिष्ट ५ मध्ये दिलेल्या विहीत नमुन्याप्रमाणे केलेल्या अर्जात अनुदान मिळाल्यापासून १ वर्षाच्या कालावधीत अनुदानाचा योग्य वापर केल्या बद्दलचे प्रमाणपत्र द्यावे. |
| | इ | अनुदान अन्य कारणाकरता वापरलेले नाही तसेच त्यात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही याचा निर्वाळा देणारे प्रमाणपत्र. |
| | फ | जी कामे पूर्ण झालेली नाहीत त्यांच्या विद्यमान स्थितीबद्दल व त्यांच्या विषयी कोणती कारवाई चालू आहे यांचा खुलासा देणे. |
| | ग | घटनेच्या कलम २४३ झेड डी. प्रमाणे तसेच त्यातील ९ वा (नववा) भाग जिल्ह्यास लागू पडत असल्यास, जिल्ह्यामध्ये नियोजन समितीचे गठन झाले आहे याची ग्वाही देणे. |
| | ह | कार्यक्रमाची सुरळीतपणे अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने वेळोवेळी याव्यतिरिक्त घातलेल्या अटींचे पालन करणे. |
| २००८-०९ व पुढील वर्षे - प्रथम हप्ता. | मागील वर्षानंतर दुसरा हप्ता ज्या जिल्हयांना वितरीत झाला आहे अशा जिल्हयांना कोणत्या अटीविना वितरीत करावा. | |
| | मागील वर्षात मिळणारा अनुदानाचा दुसरा हप्ता, उपरोक्त अटींची पूर्तता न झाल्यामुळे, पुढची वर्षे ज्या जिल्ह्यास मिळू शकला नसेल, त्याने अटींची पूर्तता झाल्याची हमी देवून त्या हप्त्याच्या हप्ता अनुदानाची रीतसर मागणी नव्याने करावी. | |
| | अनुदानाचा दुसरा हप्ता मिळतांना मागील वर्षात ज्या अटी घातल्या होत्या त्या पुऱ्या करता आल्या नाहीत, त्यांची पुर्तता झाल्याचा निर्वाळा देऊन अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्याकरता नव्याने प्रस्ताव सादर करावा. | |

## ४.६ अनुदान वितरण यंत्रणा :

सर्व अनुदाने राज्य सरकारांच्या 'एकत्रित निधी' मध्ये (Consolidated fund) हस्तांतरीत केली जातील. १२ व्या वित्त आयोगाच्या आदेशानुसार या ' एकत्रित निधीमधून राज्य सरकारांनी त्यातील जी अनुदाने पंचायती व नगरपालिकांना द्यावयाची आहेत, ती १५ दिवसांच्या आत त्यांच्या बँकखात्यात हस्तांतरीत करावी. हे हस्तांतरण करताना पंचायतराज मंत्रालयाच्या अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या तुकडीने सूचना केल्याप्रमाणे, राज्य सरकारांनी अनुदाने थेट पंचायती व नगरपालिकांच्या बँकखात्यात जमा करावी, तसेच संबंधित बँकांकडून पंचायतींना अनुदानाच्या रक्कमा रोख स्वरूपात ताबडतोब मिळतील अशी व्यवस्था करावी. पंचायत राज मंत्रालयास राज्य सरकारांनी त्यांच्या राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या बँक खात्यासंबंधी तपशीलवार माहिती पुरवावी.

## ४.७ अनुदान वितरण :

संबंधित पंचायतींनी जी मंजूर कामे सुरू केली असतील ; त्यांच्या निर्णयानुसार त्या कामाकरता झालेल्या खर्चाची पूर्ण वा हप्त्याने देणी देताना, यासंबंधीच्या आखून दिलेल्या कार्यालयीन पध्दत व शिस्त (Procedure) यांना अनुसरून ही देणी चुकती करावी, योजनेची कार्यवाही करणाऱ्या ज्या शासकीय यंत्रणांनी, पूर्वी मिळालेल्या अनुदानांच्या खर्चाचे हिशेब तसेच अनुदानांच्या योग्य उपयोग झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात कसूर / दिरंगाई केली असेल अशा संस्था कामासाठी अनुदाने मिळण्यासाठी अपात्र ठरवण्यात याव्यात. एका जिल्ह्याला मिळालेली अनुदाने, दुसऱ्या जिल्ह्याकडे हस्तांतरीत करण्यास अनुमती नाही.

## ४.८ बँक खाती उघडण्याबाबत :

संबंधित पंचायती व नगरपालिका यांनी यांची हा निधी राष्ट्रीकृत बँका किंवा पोस्टातच ठेवावा. 'मा.क्षे.अ.नि.' प्रकल्पामार्फत मिळणारी रक्कम 'मा.क्षे.अ.नि.' नावाचे स्वतंत्र बँक खाते काढून त्यात जमा करणे हे जास्त सोईचे. ही अट सक्तीची नाही. मात्र त्यासाठी स्वतंत्र रोख हिशेबपुस्तक ( ) ठेवणे गरजेचे आहे.

## ४.९ ठेवींवर मिळणाऱ्या व्याजाचा विनियोग (Utilization) :

मा.क्षे.अ.नि. ठेवींवर बँकाकडून जमा झालेल्या व्याजाच्या रकमा या त्या योजनेसाठी मिळणाऱ्या अतिरिक्त साधने या स्वरुपात समजून त्यांचा विनियोग मा वि अ नि च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करावा.

## ४.१० निधी काढणे :

राज्य पंचायतराज कायद्यात नमूद केलेल्या वित्त व लेखा पध्दती यांच्या नियमानुसार प्रचलित पध्दतीनुसार पंचायती व नगरपालिका यांनी बँक खात्यातून रक्कमा काढाव्या. विभागीय आदेश व नियमावली या नुसार कार्यवाही करून घेणाऱ्या शासकीय यंत्रणांनी झालेल्या कामांची रक्कम देण्याकरता धनादेशाचाच (चेक) वापर करावा ; रोकड रकमा बँकेखात्यातून काढण्यापेक्षा कटाक्षाने

धनादेशाचाच वापर करणे, उचित आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांच्या कक्षेबाहेरच्या अन्य कोणत्याही कारणाकरता वा उद्देशाकरता, बँक खात्यातून पैसे काढण्यास परवानगी नाही.

**४.११ हिशेब ठेवणे :**

प्रत्येक पंचायत व नगरपालिका यांनी त्यांना मिळालेल्या अनुदानांचा चोख हिशोब ठेवण्याची जबाबदारी पार पाडावयाची आहे. जिल्ह्याच्या पातळीवर त्यातील सर्व पंचायतींचा एकत्रित हिशोब आणि तपासणी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील कोणत्याही शासकीय यंत्रणेस 'मा.क्षे.अ.नि.' कार्यक्रमाचे हिशोब ठेवण्यासाठी पंचायती व नगरपालिका यांना राज्यसरकारमार्फत पुरेसे कर्मचारी व आर्थिक साधने पुरवण्यात येतील. पंचायत समिती स्तरावर अशा सहाय्याचा एकत्रित साठा सुसज्जपणे ठेवावा. पंचायती व नगरपालिका यांच्या वार्षिक हिशेबात या कार्यक्रमाकरता झालेल्या खर्चाची नोंद करावी, पंचायतराज आणि नगरपालिका या संबंधी असलेले प्रस्थापित कायदे व नियम यांना अनुसरून राज्यातील सर्व पंचायती व स्थानिक स्वराज्य संस्था यांचा या कारणाकरता झालेला एकत्रित खर्च मंजुरीसाठी राज्याच्या विधान सभेकडे सादर करावा.

**४.१२ लेखा परीक्षण :**

प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक वित्तीय वर्षअखेरीस या योजनेनुसार झालेल्या वास्तव व वित्तीय कामकाजाचे परीक्षण करण्यात यावे. राज्य सरकारने राज्याच्या प्रमुख लेखापरीक्षकाने अधिकृतपणे मान्यता दिलेल्या स्थानिक निधी लेखाधिकारी किंवा सनदी हिशेबतपासनीस यांच्याकडूनच हे तपासणीचे काम करुन घ्यावे. परिक्षकांनी दिलेला अहवाल तसेच त्यांनी परीक्षण करुन केलेल्या सूचना/शिफारसी याप्रमाणे कोणती शासकीय कारवाई पूर्ण झाली त्याचा अहवाल हे अनुदानाचा दुसरा हप्ता मिळणेकरता केलेल्या प्रस्ताव अर्जासोबत सादर करावे. कारवाई केल्यासंबंधीच्या अहवालाची (ए. टी. आर) अधिकृत भलावण हिशेबपरीक्षकांकडून मिळवावी.

**४.१३ जिल्हा पातळीवर आढावा समिती :**

पंचायत समिती स्तरापर्यंत ग्रामपंचायतींनी त्यांच्या कामाचा आढावा घ्यावा. जिल्हा नियोजन समितीने जिल्हा पातळीवर आढावा समिती स्थापन करावी, त्यांचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समितीचे सभापती तसेच नगराध्यक्ष यांची नियुक्ती करावी. समितीचे सदस्य कालांतराने बदलते असावेत ; समितीमध्ये ८-१० सदस्यांपेक्षा जास्त सदस्य नसावेत. या समितीने पंचायतींनी तयार केलेले प्रगती अहवाल तपासावेत.

**४.१४ कामांच्या परीक्षणाचे वेळापत्रक :**

कामांच्या गुणवत्ता नियंत्रणाकरता एक वेगळी यंत्रणा असावी. उच्चाधिकार समितीने या यंत्रणेच्या कामाची व शिफारसींची वेळोवेळी तपासणी करावी.

**४.१५ ग्रामस्तरावरील पर्यवेक्षण आणि सामाजिक परीक्षण (Social Audit) :**

समाजातील जागरूक वर्गाकडून योजनेच्या कामाचे परीक्षण घडवून आणण्याकरता राज्यसरकारांनी ग्रामसभा, वॉर्ड सभा (मोहोल्ला कमिटी), प्रभाग समित्या (एरिया कमिटी) यांनी सामाजिक परिक्षण कसे करावे. या संबंधी मार्गदर्शक सूचना द्याव्यात.

उपक्रम चालू आहेत अशा जागी फलक लावून त्यावर चालू असलेल्या उपक्रमाचे नाव, त्याला मिळणाऱ्या अनुदानाचा उगमस्त्रोत, उद्देश इ. माहीती द्यावी. जेणेकरून स्थानिक सर्वसामान्य लोकांना योजनेविषयी योग्य माहीती होईल. प्रत्येक उपक्रम प्रकल्प व उपाययोजना ही केव्हा सुरू झाली ती तारीख व ती पूर्ण करावयाची ठरवून दिलेली तारीख यांचाही पंचायतींनी जाहीर फलक लावून देणे आवश्यक आहे.

पूर्ण झालेल्या कामांचे योग्य परीक्षण करण्याकरीता अधिकृत वेगळी मार्गदर्शक पुस्तिका पंचायत राज मंत्रालयामार्फत संबंधितांना पुरविण्यांत येणार आहे.

**४.१६ प्रगती अहवाल :-**

विहीत नमुन्यातच प्रगती अहवाल सादर करावेत.

# परिशिष्ट २

# परिशिष्ट २
# ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळातील जिल्हा नियोजनाकरता मार्गदर्शिका

विषय :- ११ व्या पंचवार्षिक योजनेत जिल्हा नियोजना करिता मार्गदर्शिका

## १ प्रस्तावना :-

नियोजनबध्द विकास प्रक्रियेच्या सुरवातीपासून म्हणजेच १९५० पासून स्थानिक गरजा आणि उपलब्धता असलेल्या विशेष तरतूदीवर आधारित स्थानिक एकात्मिक विकास नियोजनावर भर देण्यात आला आहे. मात्र अनेक अहवाल आणि अभ्यासात अशा प्रकारच्या नियोजनाची काही तुरळक आणि एकांगी उदाहरणेच आढळतात. आत्ता पर्यंत बहुतांशी विकास हा विभागवार योजना आणि एकसूत्री कार्यक्रम यातूनच केला गेला. यातून हवे तसे परिणाम साधता आलेले नाहीत आणि स्त्रोतांचा अपव्यय मात्र झाला. एकाच साचाच्या क्षेत्रीय प्रकल्प व कार्यक्रमांवर विकासयोजनात भर दिला गेल्याने, साधनसामुग्रीचा अपव्यय तर झालाच पण त्यातून इष्ट असे लाभही झाले नाहीत. ७३ व्या व ७४ व्या घटनेतील सुधारणांमुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हास्तरीय पंचायत जिल्हा परिषद तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांना त्यांच्या स्थानिक कार्यक्षेत्रांचा विकास करण्याकरता स्वायत्तता देण्यात आली आणि या सर्वांच्या स्थानिक स्वरूपाच्या योजनांचा अंतर्भाव जिल्हा पातळीवर जिल्ह्याच्या समग्र योजनेत करण्याचा आदेश देण्यात आला. घटनेचा हा अधिकार अंमलात येऊन १४ वर्षे उलटल्यावरही काही राज्यांचे अपवाद वगळता फारच थोडी प्रगती दिसून येते.

जिल्हा नियोजन प्रक्रियेचा समावेश ११ वी पंचवार्षिक योजना (२००७-१२) आणि २००७-०८ चे वार्षिक नियोजन या कालावधीत करण्याचे ठरविले आहे. यासाठी पंचायतराज मंत्रालयाने वर्ष २००५ मध्ये तज्ञांचे एक पथक तयार केले होते. या पथकाने तयार केलेला अहवाल मार्च २००६ मध्ये सरकारला सादर करण्यात आला. हा अहवाल पंचायत राज विभाग आणि नियोजन आयोग यांनी मान्य करून एप्रिल २००६ मध्ये सर्व राज्यांना परिपत्रकाद्वारे कळविला आहे. त्यात तज्ज्ञ समितीच्या अहवालाच्या ३ ऱ्या प्रकरणाकडे विशेष लक्ष द्यावे अशी सूचनाही केली आहे. या परिपत्रकामध्ये राज्यांनी ११ वी पंचवार्षिक योजना व २००७-०८ चे वार्षिक नियोजन कसे करावे या संबंधी काही पायऱ्या सुचविल्या आहेत.

## २ जिल्हा नियोजन आराखडा :

जिल्हा नियोजन म्हणजे उपलब्ध असणारे स्त्रोत (नैसर्गिक, मानवी आणि आर्थिक) आणि विविध विभागांच्या जिल्हा आणि त्याखालील स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांनी राबविलेल्या योजना आणि कार्यक्रम लक्षात घेऊन स्थानिक विकासासाठी केलेले नियोजन. यासर्व मार्गांनी उपलब्ध साधनसामुग्री व त्याचा विविध कारणांसाठी दर्शविलेला उपयोग यांच्या एकत्रित नियोजनांस जिल्हा आराखडा असे संबोधले जाते. जिल्हा विकास आराखड्यामध्ये अंतर्भूत करावयाच्या तीन महत्वाच्या बाबी :

⇨ ग्रामपंचायतींनी त्यांच्यावर सोपवलेले कार्यक्रम आणि त्यांनी स्वतःच्या उत्पन्नातून राज्य /केंद्र सरकारच्या योजनांची केलेली अंमलबजावणी तसेच तत्सम कामासाठी असलेल्या तरतूदी विचारात घेऊन तयार केलेला आराखडा;

⇨ नगरपालिकांनी त्यांच्यावर सोपविलेली विकासाची कामे पार पाडण्याकरिता योजना करावयाची असून, ज्या राष्ट्रीय व राज्यांच्या योजना त्यांना कार्यवाहीत आणताना त्यांच्या स्वतःच्या साधनांचा उपयोग करावयाचा आहे, तसेच त्या उद्दीष्टांकरता अन्य यंत्रणाकडून खास निर्देश करून साधने उपलब्ध झाली असतील अशा योजनांसहीत त्यांची स्वतःची योजना तयार करावी.

⇨ ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांनी तयार केलेल्या आराखडयांचे राज्याने सदर जिल्ह्याच्या भौगोलिक कक्षेत राबवण्यासाठी तयार केलेल्या आराखड्यामध्ये एकत्रीकरण.

उपरोक्त तिन्ही गोष्टींचा योग्य विचार करून जिल्हा नियोजन समितीने एकत्रित योजना तयार करावी. जिल्हा योजना एकांगीपणे तयार करता येऊ शकत नाहीत. म्हणून स्थानिक अर्थव्यवस्थेत विविध अशासकीय कार्यक्रमांची दखल घेऊन योजना तयार करणे उचित होईल.

**अशासकीय उपक्रम :-**

⇨ स्वयंसहाय्यता गट (एस. एच. जी.), सहकारी संस्था या सारख्या लोकसमूहांनी तयार केलेला आराखडा.

⇨ राष्ट्रीकृत वा खाजगी बँकेच्या स्थानिक शाखा, नाबार्ड, सहकारी बँका व इतर वित्तीय संस्था यांच्या द्वारे तयार केलेला आराखडा.

⇨ आंतरराष्ट्रीय संघटना व स्थानिक स्वयंसेवी सेवाभावी संस्था आणि व्दिस्तरिय सहाय्यकारी यंत्रणा यांनी तयार केलेला आराखडा.

⇨ ज्यांचा प्रभाव सरकारी उपक्रमांवर होण्याची शक्यता असते अशा खाजगी संस्थाच्या योजना किंवा ज्यांना सरकारकडून मिळणारा प्रतिसाद /सहाय्य आवश्यक असते कारण; या प्रतिसादामुळे त्यांनी निवडलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामकाज व सेवा यांना लाभ होतो, अशा संस्थांनी तयार केलेला आराखडा.

**३ राज्यपातळीवर उचलावयाची पाऊले :**

राज्यसरकार (राज्य नियोजन आयोग/नियोजन मंडळ/नियोजन विभाग) यांनी तातडीने खालील प्रमाणे पावले उचलावीत.

a विभिन्न पातळीवरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना विकास कामे सोपविण्याची प्रक्रिया पूर्ण करणे.

b घटनेमध्ये नमूद केल्यानुसार ‘जिल्हा नियोजन समिती’ (DPC) गठीत करणे. या समितीमध्ये ८० टक्के सभासद हे स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामीण व नागरी) मधील

लोक प्रतिनिधीमधुन निवडणूकीव्दारे तर उर्वरित २० टक्के सदस्य हे राज्य सरकारतर्फे विविध तज्ञांमधून नामनिर्देशित करावेत.

c विभाग ४ मध्ये खाली दिल्याप्रमाणे जिल्हा नियोजन समिती आणि स्थानिक स्वराज्यसंस्था यांना मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

d राज्य स्तरांवरील आराखडयापैकी स्थानिक स्वराज्य संस्थाना मिळणा-या निधीचे सूत्र ठरविणे व त्यानुसार पुढील ५ वर्षामध्ये अथवा प्रथम वर्ष (२००७-०८) मिळणा-या विभागवार व बंधमुक्त निधीचे ढोबळ स्वरुप ठरविणे.

e केंद्रीय पातळीवरची स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध होण्याची वित्तीय साधने उदा. ः केंद्रीय सहाय्य असलेल्या योजना, (स्किम्स), विशेष तरतूदी, अनुदाने, वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार मिळणारे विकास निधीतील वाटे या संबंधीची माहिती स्थूल मानाने संबंधितांस द्यावी.

f राज्यातील जिल्ह्यांच्या विकास योजना तयार कराव्या तसेच सर्व जिल्ह्यांच्या योजनांची संक्षिप्त संकलित माहिती, राज्यसरकारने भाग ४ मध्ये निर्देशित केलेल्या नमुन्यानुसार भरून केंद्रास द्यावी, त्यासोबत राज्य सरकारने ११ व्या पंचवार्षिक योजनाकाळात तसेच २००७-०८ या वार्षिक योजनेच्या काळात राज्यांना हव्या असलेल्या वित्तीय साधनांच्या मागणींचे प्रस्ताव द्यावेत.

**४ जिल्हा आराखडा तयार करणे. :**

ग्रामस्तरावर नियोजन करण्याकरिता नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीच्या अहवालातील तिसऱ्या प्रकरणात विशद केलेल्या विविध उपाय योजनांच्या अनुरोधाने जिल्हा योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी सुचविलेल्या पध्दतीचा अवलंब करावा. (परिशिष्ट क्र.१)विकासाची विद्यमान स्थिती आणि साधने, तसेच क्षमतेची उपलब्धता यांचा विचार करता राज्याराज्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर भिन्नता आढळते. नियोजन प्रक्रिया सुरू करताना परिपूर्णता किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञान यांची वाट पहाण्याची आवश्यकता नाही. अंतरिक क्षमता वाढविण्याकरता काही वेगळी पाऊले उचलली जाऊ शकतात.

***खालीलप्रमाणे टप्पे सूचविण्यात येत आहेत.***

अ) प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेस उपलब्ध असलेली सर्व माहीती व आकडेवारी एकत्रित करून द्यावी. राज्य सरकारच्या विविध यंत्रणा, विभाग, तसेच जिल्हा सांख्यिकी मंडळ यांचेकडून सहाय्य अपेक्षित आहे. परिशिष्ट क्र. २ मध्ये जिल्हा योजनेकरता आवश्यक असलेल्या माहितीचे तपशील व त्याकरता भरावयाचा तक्ता देण्यात आला आहे.

ब) सदर माहितीच्या आधारे पुढील १०-१५ वर्षाकरीता जिल्हा किंवा जिल्ह्यातील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था यांचा सहभाग लक्षात घेवून, यथार्थदर्शी आराखडा तयार करणे. जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थेशी व इतर प्रमुख विकासानुकुल केंद्राशी संवाद / चर्चा करून जिल्हा यर्थाथदर्शी आराखडा (व्हिजन डॉक्युमेंट) मसुदा तयार करावयाचा आहे. सदरहू दस्तऐवजात जिल्ह्यातील आर्थिक मागासलेपण, विकासकार्यातील उणीवा व अडथळे यांना जबाबदार असलेली कारणे व परिस्थिती याचा स्पष्टपणे उल्लेख करावयाचा आहे. त्यात खालील गोष्टींचा समावेश असावा.

- कृषि व संलग्न क्षेत्र
- जल स्त्रोतांची उपलब्धता आणि विकास
- उद्योग - विशेषतः परंपरागत लघुउद्योग यामध्ये अन्न प्रक्रिया उद्योगांचाही समावेश करावा.
- स्थानिक साधन सामुग्री यामध्ये वीजपुरवठयाचाही समावेश करावा.
- पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता
- साक्षरता, शालेय शिक्षण
- आरोग्य व वैद्यकीय सोयी सुविधा / दारिद्रय निर्मूलन आणि मुलभूत गरजा
- लिंगभेदभाव व बालके
- सामाजिक न्याय/अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती - अपंगत्व असलेल्या व्यक्ति इ.

क) 'विकास दृष्टीकोनाचा मसुदा' तयार करताना (तसेच त्यातील प्रस्तावांची छाननी करणे.) जिल्हा नियोजन समितीस मदत करण्यासाठी तांत्रिक सहाय्य देणाऱ्या समूहाचे गठन करावे. या मध्ये विभागातील अधिकाऱ्यांना (शक्य असेल तिथे) त्यांच्यावर अतिरिक्त जबाबदारी देऊन किंवा निवृत्त अधिकारी किंवा स्थानिक शिक्षण संस्था किंवा प्रस्थापित अशासकीय संस्था यांचा समावेश करता येईल. अशा प्रकारचे तांत्रिक सहाय्य नगरपालिका पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांना देखील देता येईल.

ख) विकास मसुदा तयार करण्याची मोहीम घेतल्यास मसुदा दोन महिन्यात तयार होऊ शकतो.

ग) जर जिल्हा हे विकास नियोजनाचे एकक असेल तर यथार्थदर्शी आराखड्यामध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या तुलनात्मक जमेच्या बाजू उदा :(तंत्रशिक्षण संस्था, पर्यटन, कृषी- उद्योग, सेवा उद्योग, इ. ची उपलब्ध्दता) यांचा खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी उपयोग होऊ शकेल.

घ) यथार्थदर्शी आराखड्याचा आधार घेवून तसेच आर्थिक - सामाजिक आणि स्थानिक लोकांच्या सहभागाची प्रक्रिया लक्षात घेवून जिल्ह्याच्या प्रमुख गरजांचा व उद्दीष्टांचा प्राधान्यक्रम, आगामी पाच वर्षाच्या कालावधी करिता, जिल्ह्याच्या पाच वर्षाच्या योजनेत ठरविला जावा. खालील पध्दतीने हे काम व्हावे.

- ग्रामसभेत एकमताने अग्रक्रम दिलेल्या गरजा लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने त्यांचा विकास आराखडा तयार करावयाचा आहे आणि पंचायत समितीला तसा सल्ला / सूचना देता येतील. स्थानिक पातळीवर राबविता येतील असे कार्यक्रम आणि योजनांचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखड्यात करावा. ज्या योजना दोन किंवा अधिक ग्रामपंचायती एकत्र येऊन राबवू शकतात त्या पंचायत समितीकडे वर्ग कराव्यात आणि त्यांचा पंचायत समिती विकास आराखड्यात अंतर्भाव करावा.

- ग्रामपंचायतीच्या या सूचनांच्या आधारे व आपल्या गरजांचा अग्रकम लक्षात घेऊन, पंचायत समित्यांनी त्यांची 'विकास योजना' तयार करावी. यात जे प्रकल्प व विकासकामे पंचायत समिती पातळीवर पूर्ण होऊ शकतील त्यांचा पंचायत समिती विकास आराखड्यात समावेश करावा. जे प्रकल्प व विकास कामे एकापेक्षा अधिक पंचायत समिती पातळीवर होऊ  शकतील त्यांचा 'जिल्हापरिषद योजनेत' समावेश करावा.

- ग्रामपंचायत योजना, पंचायत समिती योजना आणि जिल्हा परिषद योजना या सर्वांचा जिल्हा नियोजन समितीने, एकत्रित जिल्हा योजनेत अंतिम स्वरुपात समावेश करावा.

- याच प्रकारची प्रक्रिया नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अंमलात आणता येईल. जिल्हा योजनेचा प्रशासकीय भाग म्हणून प्रत्येक नगरपालिकेने केलेल्या स्वतंत्र सूचनांचा विचार जिल्हा योजनेत करावा.

ड) परिच्छेद क्र. ६ मध्ये वर्णन केलेल्या विविध पातळींवरच्या योजना तयार करण्याच्या कामाला कमी वेळेचे बंधन असावे. ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभाला शिल्लक असलेला अवधी लक्षात घेता विविध जिल्हा योजना व राज्य योजना यांचे एकत्रीकरण करण्याकरताही वेळेचे बंधन असावे.

च) मान्यता प्राप्त विकास कामे आणि केंद्रपुरकृत महत्वाकांक्षी योजना तसेच खास कार्यक्रम यांचे नियम व अटी लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या योजनांचे प्रस्ताव पाठवावेत.

छ) परिच्छेद क्र. २ मध्ये नोंदलेली क्षेत्रे उदा. कृषि, जलसिंचन, उद्योग इ. वर आधारीत उत्पादन, रोजगार, संरचना आणि मानवी विकास यामध्ये अपेक्षित वाढ व सुधारणा या संबंधीचा अंदाज यांचा  विकास आराखड्यात अंतर्भाव असेल.

ज) उपरोक्त परिच्छेद ६,७,८, व ९ नुसार संबंधित स्थानिक संस्थांनी आपले योजना प्रस्ताव तयार करताना बाहेरुन सहाय्य मिळणारे प्रकल्प, केंद्रीय पुरस्कृत प्रकल्प, जिल्हा प्रशासकीय विभागांच्या स्वतंत्र योजना या कशा प्रकारे कार्यान्वीत होतील याचाही आढावा घ्यावा.

जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रात जिल्हा योजनेमार्फत प्रत्यक्ष पार पडू शकणारी कामे आणि राज्य योजनेव्दारा होऊ शकणारी कामे यांचेकडे योग्य ते लक्ष पुरवावे. जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रात राज्य योजनेकडून जी साधने वा निधि उपलब्ध केला जाईल व राज्य सरकारकडून जी कामे राबविली जातील अशा कामांची साधने व निधि स्थानिक संस्थांच्या नियोजन आराखडयामध्ये दर्शविण्यात यावीत.

झ) जिल्हा योजनेतील स्थानिक संस्थांचे घटक भागात खालील स्त्रोतांतून निर्माण होतील

- स्थानिक पातळीवर स्वतःचे असलेले विकासाचे स्त्रोत
- विकासकामांकरता राज्य वित्त आयोगाकडून हस्तांतरीत झालेली अनुदाने
- १२ व्या केंद्रीय वित्त आयोगाकडून राज्यांना मिळालेली अनुदाने
- स्थानिक योजनांकरता मिळालेली अनिर्बंधित अनुदाने
- स्थानिक पातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी उपलब्ध झालेली केंद्र पुरस्कृत योजनांची अनुदाने
- स्थानिक पातळीवर राबविण्याकरता राज्य नियोजनातून मिळालेली अनुदाने
- स्थानिक पातळीवर राबविण्यासाठी उपलब्ध झालेला बाहेरुन सहाय्य असलेल्या योजनांतर्गत निधी.
- सामुदायिक वर्गणी करुन उभे केलेले निधीं.

ट) ग्रामविकास आराखडा आणि नागरी विकास आराखडा या दोन प्रवाहांचे तसेच जिल्हयातील विभाग निहाय आराखडे यांचे एकत्रीकरण करुन जिल्हा नियोजन समिती जिल्ह्याचा वार्षिक आणि विकास आराखडा तयार करेल.

ठ) राज्य नियोजन आयोग / मंडळ / विभाग उपरोक्त मार्गदर्शक सूचना देऊन जिल्हा योजनेचा आराखडा कसा असावा तसेच त्या आराखडयासोबत जोडण्यात येणारे माहिति तक्ते यासंबंधी संबंधितांना मार्गदर्शन करतील.

**५ पाच राज्यांच्या ११ व्या योजनेच्या प्रस्तावांचे सादरीकरण :**

- राज्याची ११ वी पंचवार्षिक योजना आणि २००७-०८ ची वार्षिक योजना यांच्या प्रस्तावाचा एक भाग म्हणून राज्याच्या विविध जिल्हा योजनांची संक्षिप्त माहिती, गोषवारा द्यावा.

- स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या सशक्तीकरणाची सद्यःस्थिती आणि विकास आराखडा तयार करण्यासाठी उपयोजलेल्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती या योजनेच्या प्रस्तावा सोबत जोडावयाची आहे.
- राज्य योजना प्रस्तावा सोबत पाठवण्यात येणारे माहिती - रकाने (Forms) तसेच परिशिष्ट ३ मध्ये दिलेल्या विहित रकान्यांमध्ये सारांश रुपाने निवेदने (Statements) सादर करावीत. (वार्षिक योजना तसेच पंचवार्षिक योजनांसोबत पाठविण्यात येणारे माहिती तक्ते (Forms) बहुधा सारखेच असतात.)

- राज्य योजनेच्या एकूण खर्चापैकी राज्यातील जिल्हा आराखडयामध्ये होणाऱ्या खर्चाचे शेकडा प्रमाण ४० टक्क्यांच्या आसपास असावे.

**सही - अवतारसिंग साहोटा**
**संचालक (SP-Coord)**
**२५-०८-२००६**

केंद्रशासित प्रदेश व राज्यांच्या नियोजन सचिवांसाठी

***प्रती :-***

- प्रधान सल्लागार / मार्गदर्शक / नियोजन मंडळाच्या विविध विभागांचे प्रमुख.
- स्वीय सचिव उपाध्यक्ष / सदस्य / सदस्य सचिव.

***प्रत :-***

- सचिव, पंचायत राज मंत्रालय, कृषीभवन, नवीदिल्ली.

*(टीप : राज्यांच्या एकूण खर्च केंद्रीय सहाय्य योजनांचा राज्यात झालेला खर्च राज्यांचा एकूण गोळाबेरीज खर्च)*

## *पंचायतींच्या सर्व स्तरावरच्या जिल्हा योजना आणि जिल्हा उप-योजनांची निर्मिती*

३.१ एखाद्या स्थानिक क्षेत्राची एकात्मिक पध्दतीने, लोकसहभागातून सुसंगत पध्दतीने विकासाची संकल्पना तयार करणे हे जिल्हा नियोजनाचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्याच्या समग्र विकासाचा विचार करताना पंचायत व नगरपालिका यांना नियोजन प्रक्रियेतील मुलभूत घटक मानून, स्थानिक पातळीवरच्या सर्व योजनांचे एकत्रीकरण करणे हे विकासाच्या वाटेवरचे पहिले पाऊल आहे. ही व्दीलक्षी (two way) आदान प्रदान प्रक्रिया असून यामध्ये जिल्हा हा स्थानिक नियोजनामध्ये प्रमुख घटक आहे.

३.२ प्रशासकीय विभागांमार्फत सुरु असलेल्या विविध योजना व कार्यक्रम, त्यासंबधी दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुरुप स्वतंत्र व स्वयंपूर्ण नियोजन प्रक्रिया यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात जिल्हा नियोजनाची संकल्पना क्षीण (Dilute) झाली आहे. ही मानसिकता बदलण्यासाठी नियोजन म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवरील नियोजन अशाप्रकारे याकडे पहावे लागेल. त्याचप्रमाणे विभागाच्या विकास योजनांच्या प्रयत्नांना ‘कार्यक्रम’(Programme) असे संबोधावे. अशा रीतीने योजना (Plan) म्हणजे अनेक प्रकल्प व कार्यक्रम जे परस्परनिर्भर असतात, त्या सर्व कार्यक्रमांचे एकत्रित स्वरुप म्हणजे आराखडा (Plan) हिंदीत यांचे स्पष्टीकरण द्यावयाचे झाल्यास, अनेक क्षेत्रीय कार्यक्रम (Programme) मिळून एक योजना (Plan) होते. क्षेत्रीय कार्यक्रम हे परस्परांशी संबंधित व पूरक तसेच एकमेकांवर अवलंबून असतात. योजना किंवा कार्यक्रम याकरता वापर केलेल्या साधनांचा अपव्यय होत नाही याची खात्री करुन घेणे. यामुळे उपलब्ध साधन सामुग्री मध्ये आपल्या गरजा कशा पद्धतीने बसवता येतील याचा पुढे आणि मागे असा दुतर्फा विचार करण्यास लाभधारकास भाग पडेल. निश्चित अशा संरचनेच्या / आराखड्याच्या अभावामुळे नियोजनाच्या कामात दिरंगाई होण्याचा संभव आहे. परंतु नोकरशाहीची उतरंड आणि न बदलता येणारे कडक आदेश यांमुळे नियोजनाच्या प्रयोगातून आवश्यक सहभाग असणाऱ्या घटकांना बाहेर ठेवण्याचा धोका संभवतो. योजनेच्या मान्यतेपूर्वी (Approval) अनावश्यक कार्यपध्दती टाळून सहभागी घटकांचा एकमेकांतील संवाद, विचारविनिमय, सल्ला-मसलत यांचे मार्ग खुले ठेवणे गरजेचे आहे.

३.३ विकेंद्रित नियोजनाच्या प्रक्रियेत, अनेक पाऊले उचलण्याचा क्रम ठरवला जावा असे तज्ज्ञ गटाचे मत आहे. विकासाचा दृष्टीकोन तसेच उपलब्ध साधनसामुग्रीचा आढावा घेणे याकरतासुध्दा विकेंद्रीकरण थेट तळागाळापर्यंतच्या स्तरावर असणे अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या एकूण प्रक्रियेत अभिप्रेत आहे. स्थानिक पातळीवर नियोजनाची प्रक्रिया सुरु करुन वरच्या पातळीवरच्या नियोजनात तिचा समावेश होणे या क्रमाने केंद्रीय योजना तयार व्हावी. विकासाच्या प्रक्रियेत सहभाग घेणाऱ्या सर्व घटकांनी प्रमुख निकडीच्या गरजा व उद्दिष्टे ठरविण्यात आपआपल्या वाटयाचा हक्क वापरावा. पंचायतीच्या निर्वाचीत प्रतिनिधींचे, प्रातिनिधीक स्वरुप (Profile) चेहरामोहरा कसा आहे अशा प्रकारचे प्रश्न या संदर्भात महत्वाचे आहेत.

***उदाहरणार्थ*** : पंचायतीतील लोकनियुक्त प्रतिनिधींमध्ये ४० टक्क्यांपेक्षाही अधिक प्रमाणावर महिला प्रतिनिधी निवडून आल्या असतील किंवा मागासवर्ग व जमाती यांना राखीव असलेल्या जागांपेक्षा, अधिक मागासवर्गीय निवडून आले असतील तर स्थानिक विकासाच्या दृष्टीकोनामध्ये फार मोठा

बदल व प्रभाव पडणे अटळ आहे. पंचायत राज्यामुळे महिलांना विकास विषय व दृष्टीकोनाचा विचार करणे, प्रशासनाकरता सत्ता राबविणे या संधि प्राप्त झाल्या आहेत. नियोजन प्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे हेही श्रेयस्कर आहे. जिल्हा नियोजन समितीने या खालच्या पातळीवरच्या योजनांचाही जिल्हा योजनेमध्ये अंतर्भाव करणे ही विकेंद्रीकरणाच्या जमेची बाजू आहे. या प्रकरणात विकास दृष्टीकोनाच्या विचारांचे विकेंद्रीकरण तसेच स्थानिक विकासाचे विकेंद्रीकरण यांचा समावेश आहे. यापुढच्या प्रकरणात योजनांचे पुनर्गठन व एकत्रीकरण तसेच जिल्हा नियोजन समितीची कार्ये यासंबंधीचे तपशील आहेत.

## ३.४ जिल्हा विकासाच्या विचार व दृष्टिकोनाचे संवर्धन :

३.४.१ आगामी १०-१५ वर्षात अपेक्षित असणाऱ्या विकासासंबधीचा दूरगामी विचार करुन तळागाळातील व्यक्तिंना विकास प्रक्रियेत सामावून घेणारा दृष्टीकोन ( ) निर्माण करण्याच्या दृष्टीने वर्ष २००६-२००७ मधील प्रारंभीच्या काळात प्रत्येक जिल्ह्यात विशेष भर देण्यात यावा. अगदीच सोप्या भाषेत सांगायचे तर लोकसहभागी नियोजनाच्या प्रत्येक टप्प्यात हा दृष्टीकोन निर्माण होतो. आपल्या गावच्या निकडीच्या गरजा कोणत्या, तसेच कोणत्या नव्या गरजा उद्‌भवणार आहेत, त्या गरजांची पूर्ति केव्हा व कशी होईल तसेच जी ध्येये व उद्दिष्टे सफल होऊ शकतील ती कोणती याचा अंदाज, या गोष्टींचा सम्यक विचार ग्रामपातळी पासून होतो. येथे उपलब्ध योजना आणि कार्यक्रमांचा त्यावर प्रभाव पडणार नाही याची काळजी आपण घ्यायची आहे. ही स्थिती त्याचे स्वतंत्र विकास होण्यास पोषक नसते. विकासाचा दृष्टीकोन घडविताना ध्येये व ती साध्य झाल्यास मिळाणारे संभाव्य लाभ यांचा विचार उपयुक्त होतो तसेच त्याबरोबर ‘मानवी विकासाचे निर्देशांक’ संरचना व साधनसामुग्रीचा विकास आणि उत्पादक क्षेत्रांमधील संभाव्य विकास या तीन बाबींचाही विशेष अभ्यास होणे गरजेचे आहे. अशा प्रकारची लोकसहभागातून घडलेली विकासदृष्टी विकसित करण्याची प्रक्रिया ही विकासास पोषक अशी सांघिक कार्यप्रेरणा वाढवेल आणि सध्याची प्रक्रिया विभागवार योजना करण्याची जी प्रचलित प्रक्रिया आहे तिला बाजूस सारेल अशी आशा आहे.

३.४.२ आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, समाजिक न्याय आणि मूलभूत किमान गरजांची उलब्धतता या मुलभूत विकासाच्या निर्देशांकांना महत्व देऊन विकासाची दिशा व दृष्टीकोन ( ) ठरविण्यात यावा. विशिष्ट कालावधीत त्यासंबंधीच्या विकासाची पातळी उंचावेल याचा विकास दृष्टीकोन ठरविताना पंचायतींनी विचार करावा.विकास दृष्टीकोन तयार करताना दिलेल्या काल मर्यादेत टप्प्याटप्याने करावा. उदाहणार्थ ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा साक्षरता कमी असेल, त्याकरता १ ल्या टप्प्यात ती राष्ट्रीय सरासरीपर्यंत आणणे आणि दुसऱ्या टप्प्यात साक्षरतेचे अपेक्षित व आदर्श प्रमाण गाठावे. याचप्रकारे शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता यांच्या सरासरींचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवावे. महिला व दुर्बल घटक यांच्या विकासाकडे खास लक्ष देऊन त्यांना नियोजनाच्या कार्यात नेतृत्व करता येईल अशी क्षमता निर्माण करावी. सद्य स्थितीत महिलांचा नियोजन आणि

अंमलबजावणी आणि निधींची तरतूद म्हणजे विभागवार योजनेत त्यांच्यासाठी काही राखीव निधी ठेवणे होय. महिलांकरिता राखीव अनुदाने ठेवणे यापेक्षा पंचायत योजना तयार करण्यात महिलांसाठी निश्चितपणे पुढाकार असणे यामुळे विकास दृष्टीकोन निर्माण करण्याच्या प्रक्रियेत समानता येईल. खुल्या गट-चर्चांमध्ये महिलांची मते व दृष्टीकोन समजावून घेणे या करता नियोजनापूर्वी सर्वेक्षण करण्यात यावे. केवळ सामाजिक विकास क्षेत्रच नव्हे तर खेडयातील साधनसंरचना, सामुदायिक मालकीच्या जमिनींचा उपयोग, नैसर्गिक साधने आणि रोजगार या क्षेत्रीय विकास समित्यांमध्ये महिलांचा सहभाग व पुढाकार असावा. परंपरने 'मूक' राहिलेल्या तसेच समाजापासून वेगळे काढलेल्या दलित व महिला यांचा सर्वार्थाने योजनेत सहभाग मिळवा म्हणून त्यांची क्षमता वाढविण्याकरता विशेष प्रयत्नांची गरज आहे. पंचायती आणि जिल्हा योजनांमध्ये महिलांचे दृष्टीकोन व विचार समाविष्ट केले जावेत तसेच त्यात त्यांचा पुढाकारही असावा या करता निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींची जाळी विणली जावी म्हणजे त्यातून नियोजन प्रक्रियेला योग्य दिशा मिळण्यासाठी महिलांचा सामुदायिक दबाव वाढू शकेल. जिल्ह्यातील क्षमतावृध्दी कार्यक्रमामध्ये 'महिलांचे सबलीकरण' ही सर्वमान्य मध्यवर्ती भूमिका असेल आणि महिलांनी सुचविलेले विकासाचे अग्रक्रम हे विशेष आदरभावाने इतरांनी मान्य करावे तसेच महिलांच्या सबलीकरणाची संकल्पनाही इतरांनी योग्यप्रकारे जाणून घ्यावी. जिल्ह्याचा विकास दृष्टीकोन विकसित करताना नियोजनाच्या प्रक्रियांमध्ये महिला व दलित यांच्या प्रमुख सहभागाच्या प्रक्रियांनाही योग्य तो वाटा मिळावा.

३.४.३ जिल्ह्यातील साधन सामुग्रीच्या विकासाकरता, जिल्ह्याच्या परिस्थितीशी सुसंगत असलेली 'भारत निर्माण कार्यक्रमाची' उद्दिष्टे स्विकारावी. जिल्ह्यातील उपलब्ध मानवी व नैसर्गिक साधनसामग्रीचा विचार करुन, योजनाकाळात जिल्ह्यामध्ये कोणत्या प्रकारचे उत्पादन वाढण्याचा संभव आहे, याचा 'उत्पादनविषयक दृष्टीकोन' ठरवितांना विचार व्हावा. नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर करुन अन्न व कृषि उत्पादन, शेतजमिनी आणि त्यांची सुधारणा, जलसिंचन आणि पाणी मिळण्याची निश्चिती याचाही बारकाईने अभ्यास व्हावा. राष्ट्रीय, राज्य सरकारे तसेच खाजगी संस्थांच्या विकास प्रयत्नांमुळे होणाऱ्या बदलांना, स्थानिक जनतेचा संभाव्य प्रतिसाद कसा असेल यांचा विकास दृष्टीकोनात विचार करावा.

३.४.४ मानवी विकासाचे निर्देशांक या संबंधीची मूलभूत उद्दिष्टे देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये आतापावेतो गाठली गेली आहेत. अशा जिल्ह्यांमध्ये, पुढचा टप्पा म्हणून, पायाभूत सुविधा, साधन सामुग्री व आर्थिक विकास, परंपरागत उद्योगांचे आधुनिकीकरण आणि लोकांच्या पारंपारिक कौशल्यांना तंत्रज्ञानाची जोड देणे याकडे विकास-दृष्टीकोनाची पुढची पायरीम्हणून लक्ष केंदित करावे लागेल.

## ३.५ पंचायती व इतर स्थानिक संस्थांमध्ये चर्चेच्या माध्यमातून विकास दृष्टीकोनाची उत्क्रांती :

३.५.१ जिल्हयाच्या दृष्टीकोनात सर्वांचा वाटा असणे जरुरीचे आहे. जिल्ह्याचा दृष्टीकोन ठरविताना वॉर्डसभा व ग्रामसभा यांचा सहभाग मिळण्याकरता त्यांना योजनाप्रक्रियेत सामील करुन घ्यावे. प्रत्येक स्थानिक रहिवाश्यास संधि देऊन अत्यावश्यक गरजा कोणत्या तसेच विकास दृष्टीकोन कसा असावा या संबंधीची त्यांची मते जाणून घेण्यासाठी 'सहभागी नागरिक-सर्वेक्षणे' घेऊन योजना तयार करण्याचा कार्यक्रम राबवावा.

३.५.२ जिल्हा विकास दृष्टीकोन मसुद्यास भरपूर प्रसिध्दी देण्यात यावी. सर्व ग्रामपंचायती तसेच यांच्या नेत्यांच्या गटस्तरावर कार्यशाळा घेऊन त्यांच्यामध्ये यासंबंधीची जागरुकता जाणीव ( ) निर्माण करण्याकरता जिल्हा नियोजन समित्यांनी जिल्हाभर विकास दृष्टीकोण समजावून देण्याकरता व प्रसृत करण्याकरता या व अशा अनेक साधनांचा वापर करावा. विकास दृष्टीकोनाची पुस्तिका नाममात्र किंमत ठेवून लोकांना खरेदी करण्यासाठी उपलब्ध करावी तसेच तिचा सारांश संबंधित कार्यालयांमध्ये लोकांसाठी खुलेपणाने सर्वत्र उलब्ध करावा.

## ३.६ जिल्ह्यातील उपलब्ध साधनांचा समांतर आढावा घेण्याचा (Parallet Stock Taking) प्रयोग :

३.६.१ जिल्ह्यातील लोकांच्या परिस्थितीचे मूल्यांकन तसेच उपलब्ध असलेली संसाधने, नैसर्गिक, सामाजिक व वित्तीय साधने यांचा समांतर आढावा, विकासाचा दृष्टीकोन विकसित करण्याच्या प्रक्रियेकरता घ्यावा. त्याकरता सदरहू विकासाच्या घटकासंबंधीची पूर्ण माहिती व आकडेवारी संकलित करावी. तिचे विश्लेषण व मूल्यांकन अगदी साध्या सोप्या पध्दतीचे असावे. या आढाव्याची, वर्णनाची व स्पष्टीकरणाची एकच सर्वसाधारण पध्दत असावी. या तज्ज्ञ गटाने (मार्गदर्शक सूचना तयार करताना) माहितीसाठयाचा नियोजनाकरता पाया कसा तयार करावा, तो अद्ययावत् ठेवण्याकरता आवश्यक सूचना, दुसऱ्या ठिकाणी केल्या आहेत. माहितीचा आढावा घेण्याचे काम करताना 'पायाभूत माहिती' (Database) हे अत्यंत बहुमोल साधन असते. केंद्रीय नियोजन मंडळाने राष्ट्रीय मानवी विकास अहवाल २००१ तयार करतांना 'विकास (रडार) निदर्शक' ही संकल्पना वापरली आहे. आरोग्य, शिक्षण, दारिद्रय निर्मूलन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, घरे इ. यांच्या बाबतीत एखाद्या नियोजन करणाऱ्या घटक संस्थेने काय साध्य केले हे चित्रमय पध्दतीने दाखवणे म्हणजे 'विकास-रडार' यांचा उपयोग करणे. एखादा कालखंड संपल्यावर दुसऱ्या कालखंडात झालेल्या प्रगतीकरता वेगळी चित्रे द्यावी लागतील. (DR) विकासनिदर्शकांचा उपयोग माहितीचा आढावा घेणे व विकास दृष्टीकोन ठरविणे एवढाच नसून विकासाची व्याप्ती, परिमिती, यांची मोजणी करुन संबंधित संस्थेस तिच्या प्रगतीचा दाखला म्हणूनही उपयोगी पडतील. संगणकाच्या सहाय्याने अफाट प्रमाणावरची माहिती व आकडेवारी संकलित व संग्रहित करता येत असल्यामुळे राज्य सरकारांनी राज्य महसूल खात्यांच्या वर्गवारीनुसार राज्यातील सर्व पंचायतींची समग्र यादी व माहिती उपलब्ध केल्यास, ग्रामपंचायतीच्या पातळीवरचे 'विकास-

निदर्शक' (DR) तयार करता येतील. माहितीचा आढावा घेण्याच्या कामाचा भाग म्हणून विकास निदर्शक स्थापन करावेत अशी ठाम शिफारस येथे करण्यात येत आहे.

**३.६.२ राज्य व जिल्हा स्तरांवर (HDR) तयार करणे :**

अनेक राज्यांनी मानवी विकास साधनांबाबतीचे (HDR) अहवाल तयार केले असून त्यांच्या आधारे त्यांच्या 'विकास - योजना' तयार करण्यात आल्या आहेत. असे अहवाल जिल्हा पातळीवरसुध्दा एकाच पध्दतीचा वापर करुन तयार करावेत आणि त्यांचा वापर जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करण्याकरिता करावा अशी सूचना आहे.

**३.६.३ माहिती संकलन कामाचे वेळी खालील तदनुषंगिक बाबींचा विचार करावा :-**

- विविध योजना राबविण्याऱ्या अधिकाऱ्यांकडून सरकारने पुरविलेल्या सेवासंबंधीची आकडेवारीसहीत माहिती मिळवून, एकूण राज्य व वित्तीय प्रगती व कामगिरी किती झाली याचा निश्चित आढावा घेणे.

- सामाजिक व वैयक्तिक ऐवज, पंचायतस्तरांवर कसे प्रत्यक्षात वापरले गेले त्यांची पडताळणी करणे.

- पूर्वीच्या योजनेतील शिल्लक निधी आणि प्रकल्पपूर्ती करता आवश्यक असलेला निधी यासंबंधी निश्र्चित अंदाज घेणे.

- सेवापुरवठा क्षेत्रांमध्ये ब-याचदा शासनाच्या प्रयत्नांना खाजगी क्षेत्रांकडून सहकार्य मिळते किंवा सहभाग मिळतो. अशा प्रकारची शक्यता सुध्दा जिल्हयांमध्ये पडताळून पहावी.

- जिल्ह्यातील वित्तीय साधनांच्या साठयाचा आढावा घेतांना जिल्हास्तरावर केलेल्या पतयोजनांचा (Credit Plans) प्रारंभी अभ्यास करून नियोजन कार्याकरता किती प्रमाणावर पतपुरवठा उपलब्ध झाला त्याचे मापन करणे यालाच पूरक म्हणून स्वयंसहाय्यतागट (SHG) आणि सूक्ष्मवित्त (Micro Finance) या यंत्रणांचे योगदान किती झाले याचाही अभ्यास करावा.

**३.६.४ पंचायतीच्या स्वतःच्या महसूलवाढीच्या सक्षमतेचा आढावा घेणे :-**

पंचायती त्यांचे बळावर स्थानिक उत्पन्न किती प्रमाणावर वाढवू शकतात या गोष्टीच्या अभ्यासाकडे आढावा घेतेवेळी, नियोजन करताना व ते राबविताना दुर्लक्ष होते. अकराव्या व बाराव्या वित्त आयोगांनी यासंबंधी केलेल्या शिफारसी देशभर प्रत्यक्ष राबविण्याकरीता ठाम स्वरुपाचा प्रयत्न अद्याप झालेला नाही. अनेक राज्यांनी स्थानिक कर बसवण्याचे अधिकार स्थानिक संस्थांना कायद्याने बहाल केले असून त्या करांचे संकलन/ वसुली या व्यवहारांकडे राज्य सरकार पुरेसे लक्ष पुरवित नाहीत. पंचायतींना उत्तेजन दिल्यास वा त्यांचे सक्षमीकरण केल्यास पर्यायी करउत्पन्न वाढविण्यात त्याउत्साही व कार्यक्षम असतात असा

अनुभव आहे. करपात्र मिळकतींचे वर्गीकरण, भिन्न वर्गांना आकारलेला प्रगतीशील कर, मिळकतींची मोजदाद, कर स्वेच्छेने भरणाऱ्या व्यक्तींची हमीपत्रे (Self Declaration) या संबंधी योग्य ती पाऊले उचलल्यास, स्थानिक पातळीवर पैसा उभा राहू शकतो या वस्तुस्थितीवर नियोजन प्रक्रियेत विशेष भर देण्यात यावा. व्यक्तीने स्वतःचा कर किती भरावयाचा याची आकडेमोड सहज करता यावी यादृष्टीने नियमांची चौकट तयार झाली, तर स्वतः स्वेच्छेने कर भरणे आणि पंचायतींचे करेतर (Non - Tax Revenue) उत्पन्नही वाढवणे या गोष्टींचा नियोजनपूर्व आढाव्यात समावेश करावा. राज्याराज्यांमध्ये या संबंधीच्या कायद्याच्या तरतुदींमध्ये भिन्नता असली तरी, ज्या राज्यांनी पंचायत पातळीवर त्यांच्या करपध्दतीत सुधारणा यशस्वीरित्या घडवून आणल्या असतील, त्यांची धोरणे व व्यवहार यांचा अभ्यास करणे, याविषयी उपयुक्त ठरेल.

**३.७ स्थानिक पातळीवर नियोजनाकरता उपलब्ध साधने किती यासंबंधी सूचना देणे :-**

विविध पातळीवरच्या योजनांना उपलब्ध असलेल्या साधन सामुग्री बाबत माहिती पुरवणे हा नियोजनातील एक आवश्यक भाग आहे. योजने करता एकूण पैसा किती उपलब्ध होईल याची अचूक किंवा संपूर्ण माहिती देता येणे शक्य नसले तरी, केंद्रीय सहाय्य योजना (C.S.S.) बाहेरुन सहाय्य मिळणाऱ्या योजना (Externally assisted) राज्य योजना निधी या निश्चित मार्गांनी किती निधि उपलब्ध होईल याची माहिती देता येईल. स्थानिक विकासासाठी उपलब्ध आमदार आणि खासदार निधींचीही माहीती, याशिवाय स्थानिक योजनांना दिलेले मुक्त निधि (Untied Funds) यांचाही उपयोग करुन घेता येईल. वर्ष २००६-०७ मध्ये, पंचायतपातळीवर विविध मार्गांनी एकूण किती निधि उपलब्ध होईल यासंबंधीचा वाजवी व अचूक अंदाज करावा अशी तज्ञ गटाची / नियोजन आयोगाची सूचना आहे व त्याकरता पुरेसा कालावधीही आहे. वर्ष २००६-०७ मध्ये नियोजन मंडळ तसेच राज्यसरकार यांचेकडून पूर्वसूचना दिल्या जाव्या म्हणजे सूचना मिळाल्यापासूनच्या १ वर्षाच्या कालावधीत संबंधितांना यासंबंधीची कार्यवाही पुरी करता येईल.

**३.८** उपलब्ध साधन सामुग्रीचा आढावा घेऊन त्यावर आधारित स्थानिक नियोजन आराखडा तयार करणे. अशाप्रकारे प्रयत्न काही राज्यामध्ये विशेषतः केरळ राज्यामध्ये केले जात आहेत. त्याचेही अनुकरण इतर राज्यांमध्ये करण्यात यावेत.

३.८.१ विकासाचा दृष्टीकोण सुनिश्चित करुन तसेच संबंधित उपलब्ध माहितीचा आढावा घेतल्यावर जिल्हा नियोजन समितीला संपूर्ण जिल्ह्याच्या विकासाची रणनीती ठरविता येईल. तसेच त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांना त्यांच्या स्थानिक योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना देता येतील. केंद्रीय पंचवार्षिक योजनाच्या कालावधीतच जिल्ह्याच्या विकासाची पंचवार्षिक योजना तयार करुन कार्यान्वित करण्यासाठी दर पाच वर्षांनी एकदा, जिल्हा नियोजन समितीने आपल्या योजना अद्ययावत कराव्या हा या मार्गदर्शक सूचनांचा प्रमुख उद्देश आहे. ही योजना तयार करताना स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक क्षेत्रीय विकासाची वेगळी व सुयोग्य रणनीती ठरवावी. ही योजना तयार

करताना ग्रामीण भागासाठी तालुका हा घटक तर नागरी भागासाठी शहर हा घटक प्रमाणभूत मानावा.

३.८.२ प्रत्येक पंचायतीच्या पातळीवर नियोजन प्रक्रिया कशी असावी यासंबंधी या प्रकरणाच्या पुढील भागात विवेचन दिले आहे. 'तळाकडून कळसाकडे' नियोजन प्रक्रिया असावी या तत्त्वावर भर देऊन प्रथम ग्रामपंचायतीच्या पातळीवरील आराखडा पूर्ण झाल्यानंतर, पंचायत समिती आणि अखेर जिल्हा पातळीवर या क्रमाने नियोजन करावे.

**३.९ ग्रामपंचायत पातळीवरचे 'सहभागी नियोजन' :-**

३.९.१ लोकांचा संपूर्ण सहभाग निश्चितपणे मिळावा या दृष्टीने ग्रामपंचायत पातळीवरच्या नियोजन प्रक्रियेकरता खालील सूचना दिल्या आहेत.

**३.९.२ ग्रामसभा आणि प्रभाग सभा :-**

ग्रामपंचायत पातळीवरचे नियोजन योग्यरितीने होण्यासाठी, ग्रामसभा अधिक क्रियाशील झाल्या पाहीजेत. गावातल्या सर्व लोकांना त्यात प्रवेश व वाव देऊन सभा खुल्या वातावरणात व्हाव्या. ग्रामसभेत वॉर्ड सभा, महिला गट सभा यांचे प्रतिनिधित्व असावे म्हणून त्या सभा घेण्यासाठी अनेक राज्यांनी मार्गदर्शक सूचना व यंत्रणा तयार केल्या आहेत. असे असले तरी, वस्तुस्थिती ही आहे की- ग्रामसभा फार थोडया होतात, दिरंगाईने होतात आणि दुर्बल व लाभांपासून वंचित असलेल्या सामाजिक घटकांची उपस्थिती त्यात नगण्य असते. ग्रामसभा व वॉर्डसभा यातील यांची उपस्थिती व सहभाग वाढविण्याकरता, मोहिमेच्या धर्तीवर (campaign) ती यशस्वी करण्यासाठी खालील उपाय सुचविले आहेत.

- पंचायतींनी सदर सभांच्या तारखा आगाऊ निश्चित कराव्यात.

- ग्रामसभा व वॉर्डसभा यांचे आराखडा तयार करण्यात कोणते महत्त्वाचे योगदान व जबाबदारी आहे त्या संबधी सार्वजनिक ठिकाणी फलकांवर (नोटीसा) सूचना देऊन तसेच छापील पत्रके वाटून पुरेशी जनजागृती करावी. या कामात रस असणा-या स्वयंसहाय्यतागटांशी संपर्क साधून त्यांना वॉर्ड व ग्रामसभांना उपस्थित राहण्याकरता आमंत्रण द्यावे.

- सदर सभांची माहिती स्थानिक भागातील कार्यरत स्वयंसेवी संघटना, ग्रंथालये, शाळा, अंगणवाडया, सहकारी संस्था यांना द्यावी.

- राष्ट्रीय सेवा योजना, नेहरु युवक केंद्र, स्वयंसेवक, एन.सी.सी. (राष्ट्रीय छात्र सेना) आणि विधायक कार्यात रस असणारे महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे मार्फत जनजागृतीची मोहीम राबवावी.

- वार्डामधून निवडून गेलेल्या सदस्याने त्याच्या सहका-यांसमवेत घरा-घरात भेटी देऊन माहिती द्यावी.

- वॉर्ड सभांचे कामकाज पध्दतशीरपणे चालविण्याकरीता गामपंचायतीने सर्वानुमते एक पुरुष व स्त्री व्यवस्थापक नेमावेत व गट व स्थानिक पातळीवर जे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात त्यात सहभागी होणेसाठी त्यांची निवड करावी.

- ग्रामसभा किंवा वॉर्डसभा चालू असता छोटे गट पाडून त्यांच्या गट चर्चांना वाव द्यावा.

- अशा सभांचे उपस्थिती पत्रक, जमल्यास फोटो तसेच सभेत मान्य झालेले प्रस्ताव व ठराव यांच्या बारकाईने व कसोशीने दफ्तर नोंदी करणे हे उपयुक्त होईल.

३.९.३ **नागरिकांचे सहभागी सर्वेक्षण :-**

नियोजनाचे मुलभूत साधन म्हणजे ‘माहिती’.प्रत्येक भौगोलिक विभागातील परिस्थिती आणि त्या विभागातील  लोकसंख्या यांची आकडेवारी क्वचितच मिळते. नियोजनात लोकांचा सहभाग हवा असेल तर ग्रामपंचायतीतील रहिवाशांचे सर्वेक्षण करुन त्यांचे संबंधी बरीच माहिती त्यांचेकडून मिळविली तर अशी ‘माहितीचा साचा’ (डाटा बेस) करुन उपयुक्त होतो. स्थानिक रहिवाशांची समग्र माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेत ग्रामपंचायतींना त्यांच्या स्वतःच्या सशक्तीकरणाची जाणीव होईल. नियोजनाची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरु होण्याआधीच, स्थानिक लोकांच्या सहभागाला अनुकूल अशी वातावरण निर्मिती होते. ग्रामपंचायतींनी माहिती संकलित करण्याचे प्रारुप ठरवून काम केल्यास त्याचे खालील परिणाम होतील.

- ग्राामपंचायतीने संकलित केलेल्या ‘माहिती साठ्यावर’ तिचीच मालकी राहील.

- नियोजनाची मूलभूत चौकट विकसित करता येईल तसेच लोकांचा पुढाकार आणि त्यांनी सुचविल्या गेलेल्या नवीन कार्यक्रमांना उत्तेजन मिळेल.

- माहिती संकलन कार्यात निवडून आलेल्या लोक प्रतिनिधींना सामील करुन घेता येईल. ग्रामपंचायत सदस्य आणि त्यांचे साक्षर मदतनीस यांनी सर्वेक्षणाचे काम करणे श्रेयस्कर.

- माहिती संकलन हा एक वेळ साजरा करावयाचा उत्सव नसून ती सतत चालणारी प्रकिया आहे कारण मिळवलेली माहिती कालांतराने पुन्हा अद्ययावत व अचूक करावी लागते.

- माहिती व योजना यांच्यातील परस्परसंबंध कळावयाच्या आधीच ग्रामपंचायतींना सर्वेक्षणात जे आढळले त्या अनुषंगाने आवश्यक काम सुरु करता येईल.

३.९.४ नैसर्गिक साधनसामुग्रीच्या माहितीचा साठा :- नैसर्गिक साधनांची माहिती संकलित करण्याच्या शास्त्रीय पध्दती या आधीच उपलब्ध झाल्या आहेत. बऱ्याचदा (GIS) (भौगोलिक माहीती व्यवस्था) च्या सहाय्याने विद्यमान पध्दतीने उपलब्ध केलेली माहिती सीडी CD स्लाईडस्च्या सहाय्याने ग्रामपंचायतीस माहिती उपलब्ध करुन देता येईल.

**३.९.५ ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध साधनांचा आढावा घेणे. :-**

या कार्याचे महत्व आधीच विशद केलेले असून, ग्रामपंचायत पातळीवर त्या संबंधीचे काम करताना खालील गोष्टींकडे लक्ष पुरवावे.

- कर, सेवाशुल्क आणि लोकवर्गणी या माध्यमातून स्थानिक उत्पन्नाची साधन वाढविणे.
- सेस, 'बांधा वापरा व हस्तांतर करा', समाजवर्गणी अशा नाविण्यपूर्ण मार्गाने उत्पन्न वाढविणे.
- समाजातील दानशूर व्यक्तींकडून, परदेशी निवासी भारतीय खाजगी कंपन्या आणि स्वयंसेवी संघटना यांचेकडून मदत मिळवणे, शासकीय उपलब्ध निधीमध्ये अशा प्रकारे प्रयत्न केल्यास अतिरिक्त निधी मिळवून विकासाची कामे अधिक प्रमाणावर व गतीने करणे.

**३.९.६ माहीती संकलित व साठा करण्याकरता 'माहिती तंत्रज्ञानाचा वापर :**

ग्रामपंचायत पातळीवर निर्णय करण्याची क्षमता व गुणवत्ता वाढविण्याकरता माहीतीतंत्रज्ञानाचा साधन म्हणून उपयोग केला गेला पाहिजे. अनेक साध्या-सोप्या प्रक्रीया उदा.ः प्रत्येक कुटुंबास त्याच्या ओळखीकरता एक प्रमाणित क्रमांक ओळख म्हणून (नंबर) देणे. जेणेकरून त्या कुटुंबासंबंधीची अधिक माहीती एकत्र गुंफता येवून त्या कामाची मूल्यवृध्दि होते.

**३.९.७ चांगल्या प्रशासनाची लोकांना हमी देणे :-**

ग्रामपंचायतीची स्वतःच्या गृह व्यवस्थापनाची योजना ही तिच्या संपूर्ण योजना कार्यक्रमातील, प्रमुख भाग होय. विकेंद्रीत नियोजन व त्याची कार्यवाही करण्यासाठी एकूण 'कामाचा भार' किती आणि तो उचलण्यासाठी पुरेशी साधने व सिध्दता आहे की नाही यांचे तपशील स्पष्ट केले पाहीजेत. अधिक चांगल्या प्रशासनाकरिता पुरेसे कर्मचारी कशा रितीने मिळविता येतील याचा आढावा घेता येईल. गृहव्यवस्थापनामध्ये तातडीने कोणत्या गोष्टी कराव्या त्याचा अग्रक्रम येणेप्रमाणे.

- दफ्तरनोंदी अद्ययावत करणे.
- ऐवजांच्या नोंदीचे पुस्तक पूर्ण करणे. (Asset Register)

- संस्था आणि अधिकारी यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणारी आदर्श प्रमाणके. (Standards)
- पैशाचा अपव्यय आणि उधळपट्टी कमी करण्याचे उपाय
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी साधनांची जमवाजमव करण्याच्या पध्दती.
- कायद्याने सक्ती केलेल्या आवश्यक कामांची अंमलबजावणी सुधारण्याचे इतर उपाय.

**३.९.८ योजनेकरीता आवश्यक अशी पुरेशी साधने मिळविणे. :-**

ग्रामपंचायतींना विविध गरजांची पूर्ती करण्यासाठी योग्यपणे खर्चांच्या तरतुदी करण्याचे स्वातंत्र्य असणे, ही यामागची आदर्श कल्पना आहे. मात्र विकासाच्या या टप्प्यात स्थानिक विकास नियोजनात निधींच्या स्त्रोतांमध्ये असलेली विविधता लक्षात घेतली पाहिजे. साधनांचा शक्य तितका उत्तम उपयोग व्हावा. या साठी प्रयत्नशील असले पाहीजे. म्हणूनच एकदा का निधींचे स्त्रोत निश्चित झाले की त्याचे पूर्णपणे मुक्त निधी (Untied Funds) अंशतः मुक्त निधी (याठिकाणी लवचिक निर्णयांना वाव आहे.) आणि मार्गदर्शित (Tied) निधी या तीन प्रकारात वर्गीकरण करणे योग्य होईल. निधींच्या शर्ती आणि गरजांची प्राधान्यश्रेणी यांचा मेळ घालण्यासाठी या वर्गीकरणाची मदत होईल. त्यानुसार जे निधी विशिष्ट कारणांसाठी आहेत त्यांचा उपयोग अगोदर करून, मुक्त निधींचा गरजेनुसार नंतर उपयोग करावा. पंचायत पातळीवरच गरजांची प्राधान्यक्रम ठरवल्यानंतर, प्रत्येक गरजेचा संबंध निधीच्या उगम प्रवाहाशी जोडण्याची प्रक्रिया करताना खालील टप्याटप्याने कार्यवाही करावी.

- ***पहिला टप्पा*** - गरजांचे वर्गीकरण :- रहाण्यासाठी घर, मुलांना शाळेत पाठवणे, पोषक आहार, रस्ते, आरोग्यसेवा या व अशा अनेक गरजा लोकांशी चर्चा केल्यास समजून घेता येतील. निधीचा स्त्रोत कोणताही असला तरी यातील प्रत्येक गरज ही ढोबळपणे वर्गीकरण करता येईल.

- ***दुसरा टप्पा*** - लाभासाठी अनुदान दर्शविणे. :- गरजांचे वर्गीकरण झाल्यानंतर विशिष्ट बाबींसाठी दिलेल्या अनुदानातून त्यापैकी कोणत्या गरजांची पूर्ती होऊ शकते. अशी अनुदाने व संबंधित गरजा यांचा ताळमेळ बसवावा.

- ***तिसरा टप्पा*** - अंशतः मुक्त अनुदानांचा वापर :- अंशतः मुक्त अनुदाने ही मुख्यतः विशिष्ट हेतूंकरता दिलेली असूनही त्यातील काही भाग इतर कार्यक्रमांकरता वापरण्याची मुभा असते. उदाः ग्रामीण रोजगार योजना व केंद्रीय व राज्य वित्त आयोगांकडून मिळालेल्या अनुदानातून काही मर्यादेपर्यंत इतर कार्यक्रमांकरता लागणाऱ्या खर्चामधील तूट भरून काढता येते.

- ***चवथा टप्पा*** - पुर्णतः मुक्त अनुदानांचा वापर :- पुर्णतः मुक्त अनुदानांचा वापर करणे. हा अंतिम टप्पा आहे. त्यामध्ये राज्य व जिल्हा यांच्या उत्पन्नाचे स्वतःचे मार्ग, राज्यांची

सामान्य व मुक्त अनुदाने, राज्य वित्त आयोगाची अनुदाने (SFC) यांचा समावेश होतो. श्रमदान यासारख्या चलनेत्तर(Non-Monetory) योगदानांचाही विकास कामांकरता तितकाच उपयोग होऊ शकतो तसेच संपूर्णपणे व भागशः मुक्त अनुदानांचाही.

**३.९.९ गरजेनुसार आराखडयामध्ये सुधारणा करणे.:-**

अनेक कारणांनी केलेल्या योजनेमध्ये बदल करणे अनिवार्य ठरते. नियोजन आराखड्याची बदलानुरुप लवचिकता असणे आवश्यक आहे. म्हणजे एखाद्या प्रदेशात सर्वसामान्य विकास आणि तंत्रज्ञानातील बदल यांच्या प्रभावानुसार ज्या नव्या संधी निर्माण होतात त्यांना योग्य प्रतिसाद देवून, त्यांच्याशी जुळवून घेवून, त्या संधीचा वापर करून घेणे गरजेचे असते. एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे काही अपूर्ण योजना सोडून देवून ताबडतोबीचे सहाय्य व पुनर्वसन यावर लक्ष केंद्रीत करावे लागते. सध्याच्या औपचारीक नियोजन यंत्रणेत आपत्ती निवारण कार्यासाठी राखीव निधींची वेगळी तरतूद नाही; एवढेच नव्हे तर पुन्हा पुन्हा उद्‌भवणाऱ्या कमी पर्जन्य मानामुळे निर्माण होणारे दुष्काळ व पाण्याचे दुर्भिक्ष, ही मंदगतीने पण सातत्याने येणारी संकटे निवारण करण्याकरता पंचायत योजनेत वाव नाही. अशा आपत्ती आल्यास तेच काम पुन्हा पुन्हा करावे लागणे तसेच योजनांच्या कामाला खीळ बसण्याची शक्यता असते. म्हणूनच स्थानिक पातळीवर आराखडा तयार करताना संभाव्य आपत्ती निवारणाच्या योजनांचाही नव्या व्यवस्थेमध्ये समावेश करावा लागेल. योग्य अशा सामाजिक परीक्षण यंत्रणेने (सोशल ऑडीट) आपत्ती निवारण कार्यक्रमांचे नेतृत्व व नियंत्रण करण्याची गरजही निश्चितपणे भासेल.

३.९.१० ग्रामपंचायत पातळीवर नियोजनाचा क्रम आणि प्रक्रिया :- ग्रामपंचायत स्तरांवरील पाच वर्षाचा आराखडा तयार करण्याचा कालावधी हा राष्ट्रीय स्तरावरील पंचवार्षिक आराखडा कालावधीशी सुसंगत असल्यामुळे वार्षिक आराखडया मधूनच प्राधान्य क्षेत्र व विकास योजनाची क्षेत्रे निश्चित होतील. दूरगामी नियोजन प्रक्रियेमुळे प्रत्येक पंचायत स्तरावरील एकुणच विकासाचे चित्र अधिक स्पष्ट होईल. तसेच ग्रामस्थांना नियोजनासाठी शासन स्तरावरुन निधी किती व कसा उपलब्ध होईल हे अधिक स्पष्ट होईल. एकदा पंचवार्षिक योजना तयार झाली की त्यातील प्रत्येक वर्षाच्या वार्षिक योजनेची निश्चिती करणे सोपे जाईल. ग्रामपंचायतींना उपलब्ध असलेले मर्यादीत मनुष्यबळ लक्षात घेता, विविध विकासप्रकल्प आणि कार्यक्रम तयार करण्यासाठी त्यांना सहाय्य व मार्गदर्शनाची गरज भासणे अटळ आहे. मात्र असे सहाय्य घेतले तरी विकासासंबंधीचे निर्णय ग्रामसभेने स्वतःच घेतले पाहीजेत. विकासाच्या योजना, त्यातील प्रकल्प व कार्यक्रम त्यांचे अग्रक्रम ठरवणे या गोष्टी करण्यासाठी ग्रामसभेच्या पातळीवर विकास बैठका व कार्यशाळा आयोजित करणे आवश्यक आहे.

**३.१० ग्रामपंचायत पातळीवरच्या विकास आराखडयाचे सर्वसाधारण प्रारूप (Formats)** : ग्रामपंचायत सदस्य व गावकरी या सर्वांना विकास आराखडा समजणे आवश्यक आहे यावर भर देणे

आवश्यक आहे. ग्रामपंचायत पातळीवरच्या योजनेचे स्वरूप सविस्तर आणि सोपे असावे. अनेक उत्तम व्यावहारीक उदाहरणे लक्षात घेवून आदर्श व शक्य होईल असे स्वरूप खाली दिले आहे.

- विकासदृष्टीकोन (Vision)
- गावकऱ्यांचे ढोबळ स्वरूप (Citizen's Profile)
- नैसर्गिक साधनसामग्री आणि उपलब्ध सोयीसुविधा स्वरुप (Natural Profile)
- वित्तीय साधनांचे स्वरुप
- दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम
- महिलांना समान न्याय कार्यक्रम
- अनुसुचित जमातींच्या विकासाचा विशेष कार्यक्रम
- सामाजिक न्याय /सुरक्षितता कार्यक्रम
- अंमलबजावणी
- संनियंत्रण व मूल्यमापन .

## ३.११ पंचायत समिती पातळीवरच्या नियोजनाची प्रक्रीया :

३.११.१ पंचायत समिती पातळीवरच्या योजनेची प्रक्रीया व प्रारूप हे सर्व साधारणपणे ग्रामपंचायतींकरता सुचविले आहे तसेच असावे. परंतु पंचायत समिती पातळीवरचे 'विकास दृष्टिकोन' (Vision) आणि गटपंचायतींच्या विकास कार्यक्रमांचे आराखडे (Vision Plan) यावरच पंचायत समिती पातळीवरच्या नियोजनाचे घटक अवलंबून असतील. पंचायतीचे प्रमुख काम म्हणजे ग्रामपंचायत पातळीवरच्या नियोजनाच्या वेगवेगळ्या टप्यांमधील अडचणी दूर करून आवश्यक त्या सोई सवलतीं उपलब्ध करणे होय. योजना प्रक्रियेतील पंचायत समितींची प्रमुख कामे (Tasks) खालील प्रमाणे.

- ग्रामपंचायत पातळीवर सूचविलेल्या प्रक्रियेनुसार लोकसहभागीय पध्दतीने गट पातळीवरच्या कार्यक्रमांचा आराखडा तसेच दोन किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या योजनांमध्ये परस्परांवर अवलंबून असलेल्या बाबी यांचा एकत्रित विचार करून पंचवार्षिक आणि वार्षिक योजना तयार करणे.

- बहुशाखीय (Multi-Disciplines) तंत्र तज्ज्ञांचे मार्गदर्शक समूह तसेच अशासकीय स्वयंसेवी संस्था (एन जी ओ) यांचे पंचायतींचे नियोजन कार्य व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सहाय्य मिळविणे.

- विविध पंचायतींमधून शिक्षक, अभियंते, गावातील तलावाचे व्यवस्थापक, सामाजिक वनीकरणातील पर्यवेक्षक, अंगणवाडी पर्यवेक्षक आणि पंचायत समिती स्तरावरचे आरोग्यसेवा निरीक्षक अशा व्यक्तींची तजवीज आणि व्यवस्थापन करणे.

- दोन भिन्न गावांना जोडणा-या रस्त्याची योजना किंवा अनेक गावांनी एकत्रित येवून सर्वांना उपयुक्त होईल अशी सिंचनाची योजना आणि एका गावच्या पंचायतीच्या कक्षेबाहेरच्या कामासंबंधीचा अभिप्राय देण्याचे कामही या स्तरावर अपेक्षित आहे.

## ३.१२ जिल्हा पातळीवरची नियोजन-प्रक्रिया :-

३.१२.१ घटनात्मक आदेशानुसार गठन झालेल्या जिल्हा नियोजन समित्यांची रचना, घटक सदस्य तसेच कामे याबाबतीत प्रकरण ४ मध्ये विस्ताराने विवेचन दिले आहे. विविध पंचायत स्तरावर योजना तयार करण्याच्या कामात मदत / मार्गदर्शन करणे तसेच त्या सर्वांच्या योजनांच्या आराखड्यांचे एकत्रिकरण करणे ही समितीची प्रमुख जबाबदारी आहे.

३.१२.२ उपलब्धी समोर ठेवून विकास कार्यक्रमांचे आराखडे तयार करणे, एकूण नियोजन प्रक्रीयेत समन्वय साधणे, निम्न स्तरावरील पंचायतींची क्षमता बांधणी करणे आणि त्यांना तांत्रिक सहाय्य मिळवून देणे ही जिल्हा आराखडा करण्यात जिल्हा पंचायतींची (जिल्हा परिषद) प्रमुख भूमिका आहे. ब-याचदा जिल्ह्यामध्ये विकासाच्या दृष्टीने विषमता व असमतोल आढळतो. जिल्ह्यातील मागास क्षेत्राचा संतुलित विकास करण्याची जबाबदारी जिल्हा पंचायतींची आहे. मागास भागांकरता खास विकासाच्या उपयोजना आणि त्याकरता असलेल्या राखीव अनुदानांचे विशेष कार्यक्रम यांचेकरता तुलनेने जास्त निधीची तरतुद करताना या मार्गदर्शक सुचनांनुसार कारवाई करावी. महिलांचे प्रश्न, अनुसुचित जमातींकरता असलेल्या उप योजना आणि मागासवर्गीयांच्या विकासाकरता विशेष घटक योजना यांचेकडे विशेष लक्ष पुरवून जिल्हा पातळीवरचा आराखडा तयार करावा.

३.१२.३ जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरता आवश्यक असणाऱ्या अनेक बाबी या जिल्ह्याच्या परिक्षेत्राबाहेरील असतात, अशा बाबींकडे जिल्हा आराखडयामध्ये विशेष लक्ष पुरविणे गरजेचे आहे. जिल्हा पातळीवर हे सर्व प्रश्न सोडवणे शक्य नसते म्हणून हे प्रश्न सोडविण्याचे मार्ग व उपाय जिल्हा आराखडयामध्ये सुचवायचे आहेत. जिल्हा पंचायत आराखडयामध्ये सोडवायचे प्रश्न खाली दिलेले आहेत. देशातील ज्या २०० मागास जिल्ह्यात दारिद्रय ही एक असाध्य अशी समस्या आहे, त्या जिल्ह्यांमध्ये या प्रश्नांची सोडवणूक करण्याची गरज प्रकर्षाने आहे.

३.१२.४ **शेतजमीन विषयक प्रश्न** :- जमीन कसण्यासंबंधी व मालकी संदर्भात कायदेशीर प्रश्न अनेक हेच सातत्याने चालू रहाणाऱ्या व कधीही न संपणाऱ्या दारिद्रयाच्या प्रश्नाच्या मुळाशी आहेत. जमिनींच्या सर्वेक्षणात मागे पडलेली कामे, ज्यांना त्या जमीन कसण्याचा वा मालकीचा हक्क ७/१२ च्या उताऱ्यात नाही त्यांना तो लिखित स्वरूपात कायदेशीररित्या पक्का करून देणे, बेकायदेशीररित्या ज्या जमिनीपासून कसणाऱ्यांना वंचित केले गेले आहे ; अशा जमिनींची रीतसर नोंद करणे, १९९६ च्या पेसा कायद्यान्वये ग्रामपंचायतींना बहाल केलेल्या अधिकारान्वये ज्या जमिनी मूळ मालक/ वहीवाटदार यांच्याकडून हिरावल्या गेल्या त्या पुन्हा त्यांचेकडे सुपूर्द करणे, सरकारी यादींमध्ये समाविष्ट नसलेल्या ( ) जमिनी

संबंधात असलेले समान समांतर कायदे, परंपरागत झूम/ पोडू प्रकारच्या सामुदायिक नियंत्रण व मालकीच्या जमिनी, झाडे लावणे, पशुपालन यांच्या संवर्धनाचे कार्यक्रम, हे व अशा प्रकारच्या जमिनींच्या वापरासंबंधीचे प्रश्न सोडवून जिल्हा आराखडयामध्ये उपलब्ध नैसर्गिक साधनांचा स्वयंपूर्ण व सातत्याने उपयोग करून घ्यावयाचा आहे.

३.१२.५ **वन जमिनीबाबत प्रश्न :-**

यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो :

- वनक्षेत्रातील गावांचे महसुली गावांमध्ये रुपांतराची प्रक्रिया पूर्ण करणे. भारत सरकारच्या निर्देशनानुसार पूर्वीच्या व्याप्त मालकीचे व इतर हक्कासंबंधीचे तंटे सोडविणे.

- ज्यांचे तंटे सोडविण्यात अडचणी आहेत अशांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविणे.

- वन क्षेत्रातील व्याप्त क्षेत्रांचे नकाशे संबंधित ग्रामसभा, वनविभाग व महसूल विभाग यांनी प्रमाणित करणे.

जुन्या ग्रामपंचायतीच्या स्वरूपात पुनर्वसन, १९८० च्या पूर्वी जंगलात चालणाऱ्या व्यवसायांचे नियमितीकरण, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जंगलातल्या जमिनींच्या मालकी व कसण्याच्या हक्कासंबंधीचे दावे, ज्यांचे वन्यजीवनातील व्यवसाय कायद्याने नियमित होवू शकत नाहीत; त्यांच्या जगण्याकरता आवश्यक असलेल्या व्यवसायाचे पुनर्वसन, नव्याने भूसंपादन केलेल्या जमिनींची नोंद करणे, संबंधित ग्रामसभानी, वनविभाग व महसूल विभाग यांनी अधिकृतपणे तयार केलेले गावाचे नकाशे करणे .

३.१२.६ **पत पुरवठा व सरकारी कर्जविषयक प्रश्न** :- या संबंधात खालील गोष्टीचा पुढाकाराने समावेश असेल. :-

- अनुसुचित जाती व अनु जमाती तसेच दुर्बल घटक यांच्या एकूण कर्ज / देणी यासंबंधीचा आढावा घेणे.

- मोठ्या क्षेत्रीय बहुउद्देशीय सहकारी संस्था (LAMPS) यांची पुनर्रचना व पुनरूज्जीवन तसेच अनुसुचित जाती व जमाती, दुर्बल घटकांना कर्जे उपलब्ध करून देण्याकरता प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्थांना दिलेली प्रत्यक्ष लक्ष्ये (Targets).

- ज्या व्यक्तींकडे कोणतेही मौल्यवान ऐवज नाहीत, साधने नाहीत आणि जे सर्वस्वी त्यांची गुजराण करण्याकरता शेतीवर अवलंबून असतात अशांना जमीन खरेदी करण्याकरता दीर्घमुदतीची कर्जे मिळवून देण्याकरता खास व्यवस्था करणे.

- शेतीत पिकणा-या सर्व उत्पादनांना तसेच जंगलातले किरकोळ उत्पादन यांना आधारभूत किंमती (Support) मिळवून देण्याकरता केलेले प्रभावी उपाय.

- जीवनावश्यक वस्तू पुरविणारी सार्वजनिक वितरण व्यवस्था मजबूत करणे. त्याकरता स्थानिक उत्पादनातून वेगळा काढलेला राखीव शिलकी धान्यसाठा, त्या साठ्यात बाहेरून टाकलेली भर वाढवून स्थानिक पातळीवरची तूट नाहीशी करणे ह्या गोष्टी करणे गरजेचे आहे.

**उपजिविके विषयक प्रश्न :-**

स्थानिक परिस्थितीनुसार ग्रामपंचायत पातळीवर रोजगार विषयक कामाचे नियोजन *राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी* योजनेव्दारे ग्रामपंचायत पातळीवर करुन पुरेशी काम सेट-फ-वर तयार ठेवणे व ही योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी योग्य ती पावले उचलणे आवश्यक आहे.

३.१२.७ **प्राथमिक आरोग्य सेवा आणि पोषणविषयक प्रश्न :**
यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

- आदिवासी विभागातील मद्य व नशा वाढवणारे पदार्थ यांचे बाजार व दुकाने बंद करणे तसेच परंपरागत पेयांची उत्पादन व विक्री यावर ग्रामपंचायतींचे संस्थात्मक नियंत्रण वाढवणे.

- राष्ट्रीय प्रमाणानुसार आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करण्याची हमी.

- त्याकरता लागणारे प्रशिक्षित व्यावसायिक अंशतः व्यावसायिक, यांची मंजूर झालेल्या जागांकरता गरज पडल्यास स्थानिक लोकांमधून भरती करणे.

- सर्व बालकांना संपूर्ण प्रतिकारक्षम हमी देणे, आरोग्य सेवा देऊ शकणाया मान्यता प्राप्त व्यावसायिकांकडून सुरक्षित बाळंतपणाची निश्चिती करणे. लहान अर्भकांची शुश्रूषा करणे, शिक्षित कर्मचारी, सांसर्गिक रोगांवर उपचार करणारे, आवश्यक तो औषधांचा साठा करणे, आरोग्य उपकेंद्राची व्यवस्था करणे. ही कामे निश्चितपणे होणे गरजेचे.

- सर्व गरोदर स्त्रिया तसेच लहान अर्भकांची वाढ करणा-या माता, ग्रामीण भागातील कुपोषित बालके तसेच शाळांमध्ये शिकणारी सर्व मुले यांना पोषक आहार व्यवस्थितरित्या मिळण्याची परिणामकारक व्यवस्था करणे.

३.१२.८ प्रशासन अधिक बळकट करणे, अधिकारांचे वाटप करून नियोजन करणे, तक्रार निवारण केंद्राचे काम चोखपणे पार पाडण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे, विकासाला अनुकूल सुविधा निर्माण करणे, सेवांविषयक स्थितीत बदल घडवणे तसेच या सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करणे या सर्वांचा योग्य विचार जिल्हा आराखडयामध्ये झाला पाहीजे. आराखडयामध्ये सध्या जास्त मोठ्या सोयी सुविधा उपलब्ध

करण्याची योजना, ही जिल्हा आराखडयाचा महत्वाचा भाग म्हणून हवा. रस्त्यांच्या सुविधा, वस्त्यांचे, खेड्यांचे विद्युतीकरण, दारिद्रय रेषेच्या खाली असणाऱ्या गरीबांच्या घरांचे विद्युतीकरण या 'भारत निर्माण' कार्यक्रमात भर दिल्या जाणाऱ्या गोष्टींचा आंतर पंचायत योजना किंवा पंचायत समिती पातळीवरच्या आराखडयामध्ये समावेश करून, जिल्हा आराखडा ही तयार करावा.

३.१३ कोणताही श्रेणी भेदभाव (hierarchical) न पाळता स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत सर्व स्तरांवरच्या पंचायत संस्थांमध्ये योग्य तो समन्वय / सद्‌भाव असणे अत्यावश्यक आहे. वित्तीय दुय्यमता तत्व (Principle of Finacial Subsidiarity) पालन करुन एखादी जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती निर्दिष्ट पातळी पेक्षा कमी रकमेला काम मंजूर करुन अंमलबजावणीसाठी त्या कामाचे हस्तांतर ग्रामपंचायतीकडे करु शकते. यामधून काम मंजूरीपेक्षा काम अंमलबजावणीची पातळी अधिक स्पष्ट होईल. यानुसार, जी कामे ग्रामपंचायत स्तरांवर होणे आवश्यक आहेत, अशी कामे जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करता येतील तसेच वरिष्ठ पंचायत स्तरांवर घ्यावयाची कामे ग्रामपंचायतीमार्फत वरिष्ठ पंचायतीकडे देणे सुलभ होईल. याशिवाय कार्यक्षम नियोजनाकरिता सर्व ग्रामपंचायतींनी एकत्र येऊन समूह स्थापन करणे गरजेचे आहे. ज्या राज्यांमध्ये अत्यंत लहान व विखुरलेल्या स्वरुपाच्या ग्रामपंचायती आहेत अशांना ही बाब विशेषतः लागू होते. यामुळे विविध पंचायती तीनही स्तरावर अथवा सम पातळीवर एकत्र येण्याची किंवा समन्वयाची भावना / प्रक्रिया वाढीला लागेल. नियोजन प्रक्रियेची जबाबदारीची प्रक्रिया प्रत्येक स्तरांवर 'करार पध्दती' (contract) अथवा सहमती करारपत्राच्या माध्यमातून वाढीला लागेल असा विश्वास आहे.

३.१४ ग्रामपंचायतींशी सल्लामसलत करूनच पंचायत समितीने नियोजन करावे असा दंडक आणि मूलभूत नियम असावा. ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सर्व सदस्यांची ग्राम पंचायत समिती व जिल्हा पंचायतींनी सभा आयोजित करून त्यांच्याशी औपचारीक सल्लामसलत व चर्चा करण्याचा उपक्रम आवश्यक आहे. जिल्हा पंचायतींच्या बाबतीत, जिल्ह्यातील साऱ्या पंचायतींच्या सरपंचांची / (सभापतींची) आणि त्यांच्यासमवेत जिल्हा आणि गट पंचायतीत निवडून आलेल्या सर्व लोकप्रतिनिधींची सभा घेतली जावी, आणि त्या सभेत विकासाची जी संरचना दिलेली आहे त्यावर विस्तृत चर्चा होणे आवश्यक आहे. काही योग्य ते बदल करून प. बंगालमध्ये या संबंधात जी व्यवस्था उत्क्रांत झाली आहे ती स्विकारण्याचा विचार व्हावा. पंचायतीराज २००३ च्या कायद्यान्वये अशी सुधारणा करण्यात आली की जेणेकरून प्रत्येक पंचायत समिती करिता एक 'तालुका-तहसील संसद' असावी आणि त्या संसदेचे सदस्य म्हणून तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये निवडून आलेले सदस्य आणि तालुका पंचायत समितीत निवडून आलेले सर्व सदस्य यांचा समावेश असावा. मासीक व एक वार्षिक अशा प्रतिवर्षी किमान दोन सभा 'तालुका संसदेने' आयोजीत कराव्या. १० टक्के किमान उपस्थिती सभेचे कामकाज करण्यास आवश्यक असावी. आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबविणे व सामाजिक न्यायाची खात्री देण्याची सुस्थिती निर्माण करणे, वार्षिक योजना तयार करणे, अर्थसंकल्प तयार करणे ही कामे करण्याकरता व त्यासंबंधी सल्ला देण्याकरता तालुका सदस्यांना अधिकार द्यावे. संसदेच्या या कामांमुळे तालुका पंचायतीचे काम अधिक चांगल्या प्रकारे होणे या

सहभागाने शक्य होईल. तालुका संसदेत झालेल्या चर्चा, शिफारसी आणि निरीक्षणे व संमत झालेले ठराव, हे मिळाल्यापासून किमान १ महिन्याच्या आत तालुका पंचायत समितीने त्यासंबंधी निर्णय करण्यासाठी सभा आयोजीत करण्याचे बंधन आहे. याच व्यवस्थेप्रमाणे जिल्हा नियोजन समितीस मार्गदर्शन करण्यासाठी 'जिल्हा संसद' काम करते. या संसदेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे प्रधान (सरपंच), सभापती, उपसभापती, सहकारी सभापती आणि सर्व पंचायत समितींचे कार्याध्यक्ष - स्थायी समितीचे सदस्य तसेच जिल्हा परिषदेत निवडून आलेले सदस्य यांचा समावेश आहे.

**३.१५** जिल्हा व तालुका पातळीवर विकासात प्रत्यक्ष सहभागी घटक उदाः शेतकरी, व्यापारी, उद्योजक, श्रमिक, गरीब, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिक याना जाहीर प्रसिध्दी देवून सल्लामसलत करावी.

**३.१६ आराखडा निश्चितचे वेळापत्रक :-**

योजनेला अंतिम स्वरूप देण्याचे वेळापत्रक ११ वी पंचवार्षिक योजना तयार करण्यासाठी राज्यांनी त्यांचे वेळापत्रक वर्ष २००६-०७ यापासून सुरू करावे. नियोजन यंत्रणेच्या विविध टप्प्यांमध्ये कोणती कामे पूर्ण करावयाची त्याचा आराखडा खालील तक्त्यात दिलेला आहे. यातील तारखा या केवळ सूचक म्हणून दिलेल्या आहेत; राज्यांनी स्थानिक गरजांच्या संदर्भात तारखांमध्ये किरकोळ स्वरूपाचा बदल करण्यास हरकत नाही. मात्र ज्या ढोबळ स्वरूपाच्या महिना व वर्षाच्या मुदती दिल्या आहेत त्यांचे बंधन लक्षात घेवूनच कार्यक्रमांची पूर्ती करावयाची आहे. ११ व्या योजनेच्या आरंभापूर्वी जिल्ह्याचा 'विकास दृष्टीकोन मसुदा' तयार होणे आवश्यक आहे, वेळापत्रकाचा मूळ उद्देश असून २००७-१२ ही पंचवार्षिक योजना आणि २००७--०८ ची वार्षिक योजना या काळात कोणती कामे पूर्ण करावयाची ती खालील वेळापत्रकात दिली आहेत.

| **अ. क्र.** | **कार्यक्रम** | **पूर्तिचा अवधी किंवा तारिख** |
|---|---|---|
| १ | राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समित्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि निमंत्रक सदस्यांची राज्यपातळीवरची कार्यशाळा | मे २००६ |
| २ | विकास दृष्टीकोन आणि दूरदर्शी योजना तयार करण्याकरता क्षेत्रीय उप समित्यांची या 'मार्गदर्शक सूचनांविषयी'चर्चा करण्याकरता जिल्हा नियोजन समितीने १ ली सभा आयोजीत करणे. | जून २००६ |
| ३ | जिल्हा विकास दृष्टीकोन ठरवणे. | जुलै २००६ |
| ४ | जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्याच्या दृष्टीकोनाला मान्यता देणे तसेच सर्व स्थानिक संस्थांना कळविणे. | |
| ५ | जिल्हा पातळीवरच्या कार्यशाळा | ऑगस्ट २००६ |
| ६ | तालुका (गट) पातळीवरच्या कार्यशाळा | ऑगस्ट २००६ |
| ७ | मार्गदर्शक सूचनांचा विचारविनिमय करणे आणि कार्यवाही करण्याची जबाबदारी असलेले कार्यवाही समूह (Working | सप्टेंबर २००६ |

| | | |
|---|---|---|
| | group) ठरविणे याकरता स्थानिक स्वराज्य संस्थांची सभा | |
| ८ | स्थानिक संस्थांनी त्यांचे विकास दृष्टीकोन ठरवणे. | सप्टेंबर २००६ |
| ९ | स्थानिक संस्थांच्या सर्वसाधारण सभांमध्ये त्याला मंजूरी | ऑक्टोबर २००६ |
| १० | ग्रामसभा/वॉर्डसभा आयोजित करणे. | ऑक्टोबर, नोव्हेंबर २००६ |
| ११ | विकास परिसंवाद | नोव्हेंबर, डिसेंबर २००६ |
| १२ | कार्यवाहक समूहांनी (Working Groups) स्थानिक संस्थांच्या पंचवार्षिक योजना अंतिम स्वरूपात ठरविणे. | जानेवारी २००७ |
| १३ | स्थानिक संस्थांच्या अंतिम पंचवार्षिक योजनांचे एकत्रीकरण/ संघटन | जानेवारी २००७ |
| १४ | स्थानिक संस्थांनी त्यांच्या पंचवार्षिक योजना जिल्हा नियोजन समितीस सादर करणे. | जानेवारी २००७ |
| १५ | स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींची आणि जिल्हा नियोजन समितीची मान्यता | फेब्रुवारी २००७ |
| १६ | योजनांना मंजूरी देणे. | मार्च २००७ |
| १७ | जिल्ह्याच्या आणि स्थानिक संस्थांच्या पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना २००७-०८ यांचा दूरदर्शी विकास कार्यक्रम करणे. | मार्च २००७ |

मानवी विकासासंबंधीची स्थिति, उपलब्ध असलेली साधनसामुग्री यासंबंधी प्रास्ताविक माहिती देऊन त्यानंतर प्रत्येक शासकीय विभागाने कोणती कामे पार पाडावयाची त्यासंबंधीची प्रकरणे देणारे केरळ हे एकमेव राज्य असून, त्या राज्याने ग्रामपंचायत पातळीवरच्या योजनांचे तपशीलवार विवेचन देऊन नियोजन - व्यवस्थेला परिपूर्ण स्वरुप दिले आहे.

# परिशिष्ट - २

# जिल्हा आराखडयातील प्रमुख प्रस्तावित बाबी

| अ.क्र. | निर्देशांक | माहितीचा संभाव्य स्त्रोत |
|---|---|---|
| | **सर्वसाधारण निर्देशांक** | |
| १ | लिंगभेदानुसार लोकसंख्या, त्यातील सर्वसाधारण व मागासवर्गीयांचे प्रमाण, मागासवर्गीय लोकसंख्येतील स्त्रीपुरूष,वयोगटांनुसार लोकसंख्येचे वर्गीकरण, सामाजिक गटांनुसार वर्गीकरण आणि प्रत्येक भिन्न गटातील स्त्री पुरुषांचे प्रमाण | जनगणना अहवाल २००१ |
| २ | एकूण ग्रामपंचायतींची संख्या, एकूण निर्वाचित सदस्यांची संख्या,निर्वाचित सदस्यातील स्त्री पुरुष प्रमाण, निर्वाचित सदस्यांचे सामाजिक गटातील वर्गीकरण, मागे झालेल्या निवडणुकीचे वर्ष | पंचायत विभाग |
| ३ | तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती (साधनांचा आराखडा) आणि पाणी पुरवठयाचे मार्ग | पंचायत विभाग, वन विभाग, जलसंधारण विभाग. |
| ४ | गेल्या पाच वर्षातील नैसर्गिक आपत्तींचा तडाखा बसलेल्या व्यक्तीचें एकूण लोकसंख्येतील शेकडा प्रमाण | पंचायत विभाग |
| | **शैक्षणिक कामगिरीचे निर्देशांक** | |
| १ | महिला आणि दुर्बल सामाजिक वर्ग यांचे व एकूण साक्षरतेचे प्रमाण | जणगणना अहवाल २००१ |
| २ | शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्यांची एकूण टक्केवारी शाळाबाह्य मुलांची टक्के वारी | DISE, NIEPA |
| ३ | विद्यार्थी : शिक्षक प्रमाण, प्रशिक्षित शिक्षकांचे शेकडा प्रमाण सदरप्रमाणे प्राथमिक-माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थातील वेगवेगळी | DISE, NIEA |
| ४ | प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या | DISE, NIEA |
| ५ | कला व विज्ञान महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था, व्यावसायिक शिक्षण संस्था यांच्या एकूण संख्या | शिक्षण विभाग |
| ६ | शाळा व निवासस्थान यामधील अंतर (२ कि.मी. २ ते ५ कि.मी. आणि ५ कि. मी. पेक्षा जास्त) | शिक्षण विभाग |
| | **आरोग्य विषयक कामगिरी** | |
| १ | जन्मप्रमाण, मृत्युप्रमाण आणि बालमृत्युप्रमाण | जिल्हा नागरी निंदणी यो. / जिल्हा संख्यिकी विभाग |

| अ.क्र. | निर्देशांक | माहितीचा संभाव्य स्त्रोत |
|---|---|---|
| २ | वयोगटानुसार स्त्री पुरुष लोकसंख्येची प्रमाणे | जनगणना - २००१ |
| ३ | सार्वजनिक आरोग्य किंवा तालुका आरोग्य उपकेंद्रचा सेवा उपलब्ध असलेली लोकसंख्या | आरोग्य विभाग |
| ४ | (एकात्मिक बालविकास प्रकल्प) च्या सेवा उपलब्ध असलेली जनसंख्या | महिला बाल कल्याण विभाग |
| ५ | आरोग्य सेवकांची संख्या, (अंगणवाडी) सेवक संख्या | आरोग्य विभाग / म. बा. वि |
| ६ | आरोग्यसेवा केंद्र व उपकेंद्रगणिक उपलब्ध असलेल्या डॉक्टरांची तसेच समांतर वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची संख्या | आरोग्य विभाग |
| ७ | सरकारी व खाजगी हॉस्पिटलांची संख्या तसेच खाजगी दवाखान्यांची संख्या | आरोग्य विभाग |
| ८ | आरोग्यकेंद्र, उपकेंद्र आणि (क्ष्क्क्च) केंद्र यामध्ये मंजुर झालेल्या जागांची आणि प्रत्यक्षात नियुक्त झालेल्या व्यक्तींची संख्या | आरोग्य विभाग |
| | **उत्पन्न आणि दारिद्रयविषयक निर्देशांक** | |
| १ | बीपीएल गणनेनुसार (२००२) दारिद्रयरेषेखालील असलेल्या कुटुंबांची संख्या त्या कुटुंबांची सामाजिक वर्गगटांनुसार संख्या | ग्रामीण विकास विभाग |
| २ | दारिद्राचे स्वरुप - पक्की घरे नसलेल्या कुटुंबाची संख्या, जमीन मालकीनुसार, शेतकरी कुटुंबाची वर्गवारी - व्यवसाय - शैक्षणिक गुणवत्ता, कर्जाचा भार, मालकीचेवज, बीपीएल आणि जनगणनेने स्विकारलेल्या गटवारीनुसार (कोडींग) | ग्रामीण विकास व पंचायत विभाग |
| ३ | श्रमिक बालकांची (बालमजूर) संख्या | ग्रामीण विकास / मजूर विभाग |
| ४ | उगवलेली महत्त्वाची पिके, पीकवार क्षेत्र, महत्त्वाच्या पिकांचे दर हेक्टरी / एकरी सरासरी उत्पादन / जलसिंचनाखालचे क्षेत्र व कोरडवाहू क्षेत्र यांची प्रमाणे | कृषि विभाग |
| ५ | १९९८-२००५ मधील आर्थिक गणनेत (.....) नोंदलेल्या उद्योगांची संख्या, त्यातील श्रमिकांची संख्या, राष्ट्रीय उद्योग केंद्राकडून (.....) उपलब्ध झालेली श्रमिक विषयक माहिती | आर्थिक गणना<br>DIC DATA |
| ६ | रोजगार मिळालेल्यांची संख्या, बेरोजगारांची संख्या, शिक्षित बेकारांची संख्य ाव त्यांचेमधील स्त्री-पुरुषांचे प्रमाण | पंचायत / ग्रामीण विकास विभाग |
| ७ | भूमिहिन श्रमिकांची संख्या व शेतमजुरांची संख्या व त्यामधील स्त्रीपुरुषांचे प्रमाण | पंचायत / ग्रामीण विकास विभाग |
| ८ | दारिद्रय रेषेखालील लोकांचा दरडोई उपभोग खर्च | पंचायत / ग्रामीण विकास विभाग |

| अ.क्र. | निर्देशांक | माहितीचा संभाव्य स्त्रोत |
|---|---|---|
| ९ | कुशल व अकुशल कामगारांचे वेतन दर | पंचायत / ग्रामीण विकास विभाग |
| १० | अन्न-सुरक्षा-सार्वजनिक वितरण व्यवस्थेकडून मिळणाऱ्या वस्तू, त्यांच्या किंमती तसेच बाजारातील त्या वस्तूंच्या किंमती, उपभोक्त्यांच्या दृष्टीकोनानुसार उपलब्ध वस्तूंची गुणवत्ता | अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| | **संस्थांना इतर सोयी सुविधा** | |
| १ | तालुका केंद्र आणि खेडे यांना जोडणारा पक्का रस्ता - अथवा कच्चा / वा अर्धा पक्का रस्ता | ग्रामीण विकास विभाग, पंचायत विभाग |
| २ | जिल्हा केंद्र ते जवळचे गाव यांची अंतरे - रेल्वे स्टेशन, बसअड्डा, पोलीस ठाणे यांची अंतरे | ग्रामीण / नियोजन विभाग |
| ३ | विद्युतीकरण न झालेल्या खेडयांची शेकडेवारी | ग्रामीण विकास / पंचायत |
| ४ | शेती बाजार केंद्राचे व खेडयापासूनचे अंतर | पंचायत विकास |
| ५ | व्यापारी बँका / ग्रामीण प्रादेशिक बँका / सहकारी बँकाची संख्या | सहकार विभाग |
| ६ | सावकारांचे अस्तित्व होय किंवा नाही | सहकार विभाग |
| | **कृषी व संलग्न क्षेत्र** | |
| ७ | संबंधित प्रमुख उत्पादनाच्याबाबी | कृषि / ग्रामीण विकास विभाग |
| | **उद्योग परंपरागत / लघु** | |
| ८ | संबंधित उद्योगांकडून उत्पादन होणाऱ्या प्रमुख वस्तू व सेवा | उद्योग विभाग |

वर उल्लेख केलेल्या विभागा व्यतिरिक्त जिल्हा संख्यिकी विभाग, राज्य आणि केंद्र राज्य नियोजन आयोग / मंडळ / विभाग आवश्यक असणारी माहिती संकलित करण्या करीता मदत करतील.

नागरी आणि ग्रामीण स्वराज्यसंस्थांना क्षेत्रवार खर्चाच्या तरतूदी करण्या करता स्वतंत्र लेखापत्रके (स्टेटमेंट) तयार करणे.

# परिशिष्ट - ३
# ग्रामीण स्थानिक संस्थांची योजना

| क्र | विभाग | स्थानिक संस्थेची स्वतःची योजना | योजनेची कार्यवाही करणारी यंत्रणा | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | राज्य योजना | केंद्रीय सहाय्य योजना | बाहेरुन सहाय्यकारी असलेले निधी | एकूण | |
| | | | १ | २ | ३ | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

# परिशिष्ट ३

## राष्ट्रीय क्षमता वृध्दी कार्यक्रमाचे स्वरूप व आराखडा

## राष्ट्रीय क्षमता वृध्दी कार्यक्रमाचे स्वरूप व आराखडा - पंचायती राज निर्वाचित लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी / अधिकारी यांचेकरिता उपयुक्त

पंचायती राज मंत्रालय
भारत सरकार

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रकरण १ : | आराखडा निर्मितीचा परिचय आणि मुलभूत तत्व |
| प्रकरण २ : | आराखड्यातील घटक व त्यांचे परिवहन व वितरण |
| प्रकरण ३ : | अंमलबजावणी व तज्ज्ञ साधन व्यक्ती |
| प्रकरण ४ : | आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीची जमवाजमव |
| प्रकरण ५ : | कार्यक्रमाचे व्यवस्थापन, मूल्यमापन आणि महत्वाच्या कागदपत्रांचे जतन |
| प्रकरण ६ : | कार्यवाहीकरता लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक करणे. |

# प्रकरण १ प्रशिक्षण आराखड्याची ओळख आणि मुलभूत तत्वे

**प्रास्ताविक**

**१.१** घटनेच्या ११ व्या यादीत,२९ बाबींचा उल्लेख करून त्यासंबंधीचे सर्वाधिकार व जबाबदाऱ्या पंचायतीकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत. पंचायतींकडे कोणती कामे सोपवायची,याकरिता देशातील बहुतेक राज्यांनी 'राज्य पंचायती राज कायदे व नियम'संमत करून ती 'पंचायतीची प्रकरणे'असा निर्देश करून त्यांनवर सोपविलेली आहेत. तथापि हे काम अधिक प्रभावीपणे पूर्ण करून घेण्याची गरज आहे. आपल्याला सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या अधिक परिणामकारक रितीने पार पाडण्यासाठी, पंचायतींच्या क्षमता वाढविण्याची गरज भासते. पंचायतींकडे अधिकार हस्तांतरीत न करणे, तसेच त्याचे सशक्तीकरण न करणे यांचे समर्थन करण्याकरता 'प्रशिक्षण अभाव' ही सबब सांगणे चालूच राहते.जबाबदाऱ्या पार पाडण्याची कृती ही स्वतःच प्रशिक्षण पर्याप्त पद्धति होऊ शकते ही वस्तुस्थिती चांगल्या प्रकारे अवगत व मान्य झाली आहे.

**१.२** प्रशिक्षण कार्यात वाढ करून,त्याकरिता प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा पुरेसा पुरवठा करणे,तांत्रिक मार्गदर्शन आणि इतर प्रकारचे सहाय्य पंचायतींना उपलब्ध करणे या गोष्टींनी पंचायतींच्या सामर्थ्यात वाढ होण्याकरता घटनेच्या ९ व्या भागात केलेल्या तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पंचयतीत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी व अधिकारी तसेच स्थायी समित्यांचे कार्याध्यक्ष आणि अधिकारी यांना प्रशिक्षण देवून त्यांची क्षमतावृध्दी करण्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी, डिसेंबर २००४ मध्ये जयपूर येथे राज्यपातळीवरच्या पंचायतराज विभागांच्या मंत्र्यांची गोलमेज परिषद घेण्यात आली आणि त्या परिषदेने सुचविलेल्या कार्यक्रमांची सूचना लक्षात घेवून राष्ट्रीय क्षमतावृध्दी कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला.

**१.३** क्षमता बांधणी ही कार्य, कार्यकर्ते आणि निधी यांच्या पूर्वी असावी की नंतर या प्रश्नाची उकल हेच या आराखड्याचे उद्दीष्ट होय.

१.४ **राष्ट्रीय आराखड्याची उद्दीष्टये क्षमता वृद्धी, राष्ट्रीय क्षमता बांधणी आराखड्याची मुलभूत तत्त्वे. :**

अ) निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना त्यांची विकासकार्यक्रमांची व्यवस्थित अंमलबजावणी, सक्षम कारवाई करण्याकरिता त्यांना विचार करण्याची क्षमता मिळवून देणे, प्रशासकीय दैनंदीन कर्तव्ये पार पाडण्याकरिता आवश्यक अलेस कौशल्य या गोष्टी पंचायतीत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना मिळाव्या याकरिता त्यांच्या ज्ञान व कार्यक्षमता यात वाढ करणे.

ब) महत्वाच्या १) तांत्रिक सल्लागार व प्रशिक्षक या भूमिकेतून अधिक चांगले काम करणे. २) आदर करणे, अधिक ग्रहणक्षम होणे आणि लोकप्रतिनिधींच्या मुलभूत स्तरावरील अनुभवातून शिकणे, यासाठी पंचायत स्तरावरील महत्वाच्या अधिका-यांना प्रशिक्षण देणे.

क) गावातील गरीब, लोकसहभागी नियोजनातून पुढे आलेल्या त्यांच्या मागण्या, नियोजन आराखड्याच्या अंमलबजावणीचे सम्नियंत्रण आणि महितीचा अधिकार आणि सामाजिक लेखा जोखा यांचा वापर करुन त्यांची पंचायत तयार करण्यासाठी ग्रामसभेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करणे.

ड) प्रसार माध्यमे, राजकीय पक्ष, कायदे प्रतिनिधी, नागरी सेवाभावी संस्था, आणि नागरीक यांच्या मध्ये पंचायत राज व्यवस्थेला कार्यक्षम स्थानिक सरकार म्हणून प्रबळ करणे आणि स्विकारण्यासाठी जागृती घडवणे.

**१.५ आराखड्याची मूलभूत तत्वे :**

अ) क्षमता बांधणी आराखड्याची अंमलबजावणी ही सातत्यपूर्ण आणि चिरकाल प्रक्रिया आहे. ज्याचे दिर्घकालीन बदल आणि विकास हे उद्दीष्ट आहे.

ब) आराखड्यातील प्रशिक्षणाचा भर हा माहितीपेक्षा प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी यांच्यातील अंतर शिक्षणावर आहे.

क) प्रशिक्षणाने सर्वच प्रश्नांची समर्पक उत्तरे मिळतातच असे नाही ; पण अशा प्रशिक्षणाने प्रशिक्षणाार्थींना त्यांच्या आजूबाजूच्या परिस्थितीचे विश्लेषण करणे, त्यासंबंधी चिंतन करणे, स्वतःचा विचार करून त्यांच्या प्रश्नांची योग्य उत्तरे मिळवण्याची क्षमता वाढते हे लक्षात घेतले पाहीजे.

ड) परस्पर शिक्षण, एकत्रीकरण आणि चर्चा / वाद - विवाद या गोष्टी बहुअंगी आणि अंतरहिन प्रशिक्षण वातावरणातच सर्वोत्कृष्ट पध्दतीने घडतात.

इ) प्रशिक्षणाचा लाभ घेणाऱ्या व्यक्तींचे सामान्य ज्ञान व त्यातील विविधता यांचा आदर केला जावा. प्रशिक्षणात मागासवर्ग, मागासजाती व महिला यांच्या गटातून येणाऱ्यांकडे विशेष लक्ष पुरवावे.

फ) प्रशिक्षण चालू असताना गरजेपेक्षा जास्त बोलणाऱ्या तसेच इतरांवर ऐट गाजवणाऱ्या व्यक्तींनाच फारसा वाव न मिळू देता सर्व व्यक्तींना समान सहभाग घेता यावा अशी काळजी घ्यावी.

ग) प्रशिक्षकांच्या संघाचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व शेरेबाजी टाळणारा असावा. प्रशिक्षणार्थींना स्वतःचा विचार करण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रशिक्षकांची भूमिका मित्र, समुपदेशक तसेच सहाय्यकाची असावी.

ह) प्रशिक्षणाची प्रक्रिया आणि व्यवस्था ही निर्वाचित लोकप्रतिनिधी बाबतच्या वस्तुस्थितीला अनुसरुन आणि सोयिस्कर असली पाहिजे.

इ) लाभार्थींनी चटकन त्यांची भूमिका निश्चित करुन कार्य हाती घेण्यासाठी दिलेल्या कालमर्यादेत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करणे हेच कार्यक्रमाचे उद्दीष्ट असले पाहिजे.

ज) पेसा या क्षेत्रातील प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक जमातींची संस्कृति व त्यांच्या गरजा लक्षात घेवून तयार करावा.

क) सूत्रबध्द प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रभाव कितपत झाला याचे सातत्याने मूल्यांकन करून त्याच्यामध्यें गरजे प्रमाणे आराखड्यामध्ये सुधारणा करीत जावे.

**१.६ कार्यक्रमाचे लाभार्थी -**

**सूत्रबध्द कार्यक्रम खालील लोकांपर्यंत पोहोचावा.**

**अ) निवडून आलेले लोक प्रतिनिधी** : या मध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचे सदस्य, अध्यक्ष (सरपंच, सभापती, अध्यक्ष) उपाध्यक्ष (उपसरपंच, उपसभापती, उपाध्यक्ष) आणि विषय समित्यांचे अध्यक्ष यांचा समावेश होतो.

**ब)** पंचायती बरोबर काम करणारे शासकीय अधिकारी व कर्मचारी या अधिकाऱ्यांचे प्रमुख वर्गीकरण येणेप्रमाणे :

- पंचायत सचिव (सेक्रेटरी)
- उप - अभियंते
- अंगणवाडी कर्मचारी
- प्राथमिक आरोग्य सेवक
- सार्वजनिक आरोग्य सेवक
- कर वसुली कारकून तसेच पंचायत कार्यालयीन कारकून/सेवक
- कृषि विस्तार अधिकारी
- शिक्षक व शैक्षणिक प्रशासन सेवक

क) बचत गट, समाजसेवी संस्था इ. सारखे दबाव गट.

ड) नव निर्वाचित लोकप्रतिनिधी आणि उच्च पातळीवरचे शासकीय खात्यातून / विभागातून निवडून आलेले लोक प्रतिनिधी यांना पंचायतीचे सहाय्यक असल्याची जाणीव करुन द्यावयाची आहे. या बरोबरच आमदार, खासदार, राजकीय नेते आणि प्रसार माध्यमे या सारख्या योजना निर्माण करणाऱ्या लोकांना देखील त्यांनी

ग्रामपंचायतींच्या विकासाला पूरक असणारे वातावरण निर्माण करण्यासाठी जाणीव करुन देणे गरजेचे आहे.

# प्रकरण २ रे
# क्षमता बांधणी आराखड्याचे घटक

## २.१ *प्रास्ताविक:*

प्रशिक्षणात पुरा करवयाचा अभ्यास आणि प्रशिक्षण कार्यक्रम रबविण्याचे टप्पे हे खाली तक्ता क्र.१ मध्ये नमूद केले आहे.

**तक्ता क्र. १**

| क्र. | उद्दीष्टे | अंतरक्रियेचे स्वरुप | अंतर्भूत करावयाचे विषय (संक्षिप्त) | वर्ग | कालावधी | पूर्णत्वासाठी द्यावयाचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| भाग १ | पंचायत राज व्यवस्थेची कार्यपध्दती समजून घेणे आणि अंमलबजावणी करणे यासाठी मानसिकता बाणवणे | प्रशिक्षण १ (अ) मूलभूत अभ्यासक्रम / प्रशिक्षण | पंचायत राज व्यवस्थेची ओळख | पंचायतीचे निर्वाचित सदयस्य : सुमारे २२ लाख<br><br>पंचायत राज अधिकारी व कर्मचारी : सुमारे ८ लाख | ४ दिवस | निवडणूकां नंतर २० दिवसांचे आत. |
| | | प्रशिक्षण १ (ब) मूलभूत व्यावहारीक अभ्यासक्रम / प्रशिक्षण | अंतर्गत व्यवस्था, लेखा शास्त्र, सामाजिक लेखा, माहितीचा अधिकार, पंचायतींची वसूली | पंचायतीच्या सर्व स्तरातील निर्वाचित नेते आणि विषय समित्यांचे अध्यक्ष (५ प्रति पंचायत) सुमारे १० लाख<br>पंचायत राज अधिकारी व कर्मचारी : सुमारे ५ लाख | ४ दिवस | निवडणूकी नंतर २० आठवड्यात (मुलभूत प्रशिक्षण अंतर्भूत करुन, प्रत्येक कार्यालयीन व्यक्तीला ८ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल. |

| क्र. | उद्दीष्टे | अंतरक्रियेचे स्वरुप | अंतर्भूत करावयाचे विषय (संक्षिप्त) | वर्ग | कालावधी | पूर्णत्वासाठी द्यावयाचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रशिक्षण १ (क) व्यवहारीक साक्षरता प्रशिक्षण | ज्यांना कार्यकारी साक्षरता गरजेची वाटते | निरक्षर आणि अर्ध साक्षर निर्वावित सदस्य सुमारे ८ लाख) | १ महिना किंवा आवश्यकते नुसार शक्यतो गाव पातळी वरच | ६ महिने |
| भाग २ | नियोजन आणि अंमलबजावणी साठीची मुलभूत कौशल्ये वृध्दींगत करणे | प्रशिक्षण २ (अ) विभाग केंद्रीत प्रशिक्षण कार्यक्रम | पंचायतींच्या सेवा पुरवठा आणि विकास कार्यक्रमांची क्षमता वाढविणाऱ्या महत्वाच्या कार्याचा आढावा | निर्वाचित लोक प्रतिनिधी : सुमारे २२ लाख पंचायत राज संस्थांशी संबंधित अधिकारी व कर्मचारी : सुमारे ८ लाख | किमान ६ दिवस ( ३ - ३) दिवसांचे दोन टप्पे | निवडणूकीनंतर ४० आठवड्यात |
| | | प्रशिक्षण २ (ब) संगणक प्रशिक्षण | मूलभूत संगणक कौशल्यांचे, पंचायत स्तरावर आवश्यक असणाऱ्या निवडक सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण | प्रत्येक पंचायतीतून किमान २ व्यक्ती सुमारे ५ लाख | स्थानिक व्यवस्थेसह किमान ६ दिवस | ५२ आठवड्यात |
| भाग ३ | चर्चा आणि माहितेचा संकलनातून | ३ (अ) ग्रामसभा मोहीम / शिबिर | जाणीव जागृती / निर्मिती | ग्रामसभा, अशासकिय संस्था, बचत गट आणि समाजसेवी संस्था | आठवड्यातून किमान ३ दिवस | सर्व ग्राम पंचायती वर्षातून किमान एकदा तरी |

| क्र. | उद्दीष्टे | अंतरक्रियेचे स्वरुप | अंतर्भूत करावयाचे विषय (संक्षिप्त) | वर्ग | कालावधी | पूर्णत्वासाठी द्यावयाचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | दृढीकरण / एकत्रीकरण | ३ (ब) पंचायत राज दुरचित्रवाणी आणि आकाशवाणी कार्यक्रम | | मोठ्या प्रमाणावर लोक | आठवड्यातून किमान ३ दिवस | संपूर्ण भारत |
| | | ३ (क) पंचायत राज पत्र | | पंचायत राज्यांचे घटक आणि वर्गणीदार | महिन्यातून एकदा | सर्व पंचायती |
| | | ३ (ड) निर्वाचित लोक प्रतिनिधींचे जाळे तयार करणे | अनुभवांचे आदान प्रदान करणे | निर्वाचित लोक प्रतिनिधी सुमारे २२ लाख | | निवडणूकीनंतर १ वर्षात |
| | | ३ (इ) वार्षीक उजळणी प्रशिक्षण | | निर्वाचित लोक प्रतिनिधी सुमारे २२ लाख | किमान ४ दिवस | उरलेल्या ४ वर्षा साठी वर्षातून एकदा |
| | | ३ (फ) नमुना म्हणून निवडलेल्या पंचायतींना भेटी | प्रत्यक्ष क्षेत्रावर प्रशिक्षण | पंचायतीचे किमान १० लाख निर्वाचित नेते | प्रत्येकी प्रवासा व्यतिरिक्त १ पूर्ण दिवस | प्रत्येक वर्षी किमान २ अभ्यास दौरे |
| | | ३ (ग) पंचायत समिती / तालुका स्तरावरील सुविधा केंद्र | पंचायत स्तरावरील नियोजन आणि अंमलबजावणी साठी पूर्णवेळ सहकार्य / | पंचायतीचे निर्वाचित लोकप्रतिनिधी सुमारे २२ लाख | प्रत्येक कामाच्या दिवशी | २० आठवड्यांनी, सदस्यांचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण संपल्या |

| क्र. | उद्दीष्टे | अंतरक्रियेचे स्वरुप | अंतर्भूत करावयाचे विषय (संक्षिप्त) | वर्ग | कालावधी | पूर्णत्वासाठी द्यावयाचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३ (ह) माहिती केंद्र | सहकार्य / मदत | | प्रत्येक कामकाजाच्या दिवशी किमान १६ तास | प्रशिक्षण संपल्या नंतर |
| | | ३ (ई) प्रमाणपत्र अभ्यासक्रम | प्रगल्भ आणि शैक्षणिक अभ्यास | इच्छुक लाभार्थी | ६ महिने | प्रत्येक राज्यातून सुमारे १० व्यक्ती |

२.२
२.२५१

**२.२५२ सहभाग असलेले उपग्रह संचालित प्रशिक्षण :**
'स्त्रो' संस्थेने एक उपग्रहीय स्त्रोत (Channel) पूर्णपणे सहभागी प्रशिक्षणाकरता खास वेगळा असा पुरविला आहे. त्याच्या साहय्याने काही विशिष्ट केंद्रावर प्रशिक्षणार्थीकरता कार्यक्रम प्रक्षेपित केला जातो. अशा केंद्राकडे उत्तरादाखल बोलण्याची सुविधा (Talk back facility) खास टेलिफोनमार्फत किंवा उपग्रही स्त्रोताच्या सहाय्याने उपलब्ध झाल्यामुळे, प्रमुख केंद्राच्या स्टुडिओमध्ये व्याख्यान देणाऱ्या तज्ञ व्यक्तींना प्रश्न विचारून प्रशिक्षणार्थीना जिवंत संवाद ((Live dialogue)) साधता येतो. त्या प्रश्नांना तज्ज्ञ व्यक्तींने दिलेली उत्तरे सर्व दूरच्या केंद्राचे जाळयात (Network) असलेल्या केंद्रामध्ये ऐकता व पाहता येतात. वक्ता व श्रोता यांचे समोरासमोर संभाषण तर होतेच पण दोघेही एकमेकांना पाहू शकतात. या पध्दतीमुळे दर्शन - श्रवण या संयुक्त माध्यमाने, तसेच या क्षेत्रात तरबेज असलेल्या तज्ज्ञांच्या ज्ञानाचा लाभ गाव - पातळीवर झाल्याने प्रशिक्षणाचा एक अभिनव मार्ग खुला झाला आहे. या माध्यमाचा प्रभाव एकाच वेळी अनेक केंद्रातील मोठया संख्येच्या प्रशिक्षणार्थीना होतो. स्थानिक श्रोत्यांच्या गरजा लक्षात घेऊन प्रशिक्षणाचा वेगळा असा खास कार्यक्रमही करता येतो. पंचायत कार्यात नेहमी येणाऱ्या अनुभवांना चित्रांच्या सहाय्याने, तसेच मनोरंजन खेळांच्या (Games) सहाय्याने श्रोत्यापर्यंत पोहोचवून प्रशिक्षणाचा कार्यक्रम रंजकपणे व प्रभावीपणे सादर करता येतो. अशा कार्यक्रमाचा मनावरील प्रभावही दीर्घकाळ टिकतो. या जमेच्या या गोष्टी लक्षात घेऊन या कार्यक्रमाचे स्वरूप निश्चित करताना तो देशभरच्या सर्व राज्यात उपलब्ध व्हावा याकरिता उपग्रहीय प्रक्षेपणाच्या तंत्राचे प्रशिक्षण, त्याला लागणारी संपूर्ण संरचना व साधनसामग्री उदाहरणार्थ उपग्रह स्टुडिओ, प्रक्षेपण - मिळण्याची केंद्रे (Reception Center), दूरदर्शन संच, उपग्रहीय तबकडया, टेलिफोन, वीजेचा अखंडीत पुरवठा आणि ही रचना उभारण्याकरिता लागणारी नागरी बांधकामाची कामे; या सर्व सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

**२.२५३ स्थानिक पातळीवर समोरासमोर दिलेले प्रशिक्षण :**

पंचायत सदस्य व अधिकारी यांना दिलेले मूलभत प्रशिक्षण हे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात अथवा पंचायत समितीच्या कार्यालयातच आयोजित केले जावे. सरकारने सध्या उपलब्ध केलेल्या विस्तार प्रशिक्षण केंद्राच्या जाळयाचा प्रशिक्षणाकरिता उपयोग करून घ्यावा. कार्यालयात जागा सोईची नसल्यास शाळेची इमारत किंवा समाज केंद्रांचा प्रशिक्षण वर्गाकरिता उपयोग करावा.

स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष ( दृकश्राव्य कृत्रिम माध्यमाव्यतिरिक्त ) या क्षेत्रातील तयारीचे तज्ञ प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी यांच्या प्रशिक्षणाकरता परंपरागत व्याख्यान - चर्चा यांचा वापर करावा. एका अभ्यासक्रमाकरिता किमान ५ वेगवेगळया तज्ञांची नियुक्ती केल्यास प्रशिक्षणात पूर्ण लक्ष एकाग्रतेने केंद्रीत करणे, चर्चेत भाग घेणे आणि प्रशिक्षणाचा योग्य लाभ घेणे शक्य होईल. प्रत्येक प्रशिक्षणवर्गामध्ये एकावेळी फक्त २० प्रशिक्षणार्थींना प्रवेश दिल्यास, प्रशिक्षणाचा लाभ वाढेल. (शिक्षक : विद्यार्थी उचित प्रमाण) यासंबंधीचे तपशील प्रकरण तिसरे मध्ये दिले आहेत.

**२.२५४ एकमेकांना समोरासमोर पाहू शकणारी परंपरागत शिक्षण पध्दत आणि उपग्रहीय प्रक्षेपणाने सिध्द झालेली दृकश्राव्य पध्दत यांचा संयोग.**

तक्ता क्र. ३ मध्ये दूर अंतरावरून उपग्रहीय प्रक्षेपणाने दिलेले प्रशिक्षण आणि स्थानिक प्रशिक्षण केंद्रामध्ये तज्ञ प्रशिक्षकास निमंत्रण देऊन त्यांच्या व्दारे दिलेले जिवंत अनुभवाचे प्रशिक्षण यांचा परस्परपूरक संयोग करून प्रशिक्षण देण्याची सुचविलेली पध्दत खाली दिली आहे.

**तक्ता ३ :-**

| **कार्यक्रमाचे स्वरुप** | **यंत्रणा** | **संबंधित अधिका-यांच्या जबाबदाऱ्या** |
|---|---|---|
| चित्रपटाचा परिचय | प्रशिक्षण केंद्रात पाचारण केलेल्या तज्ञ व्यक्ती | दाखविल्या जाणाऱ्या चित्रपटाचा परिचय संक्षिप्तपणे देण्याकरता तज्ञ प्रशिक्षकाने केंद्रात प्रास्ताविक करावे किंवा चित्रपटाविषयीची उत्कंठा कमी न होऊ देता, एखाद्या चर्चेच्या किंवा संवादाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांच्या मनाची अनुकूलता निर्माण करणे. |
| चित्रपट पडद्यावर दाखविणे | उपग्रहीय प्रक्षेपण | उपग्रहीय मुख्य प्रक्षेपण केंद्राकडून चित्रपट दाखविला जातो. त्या प्रक्षेपणापूर्वी तज्ञ व्यक्तीने, ५ मिनिटे अगोदर दूरदर्शन संच चालू होण्यासाठी सज्ज करावा. |

| कार्यक्रमाचे स्वरुप | यंत्रणा | संबंधित अधिका-यांच्या जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| सामान्य प्रतिसाद | प्रशिक्षण केंद्रात तज्ञ प्रशिक्षकाची उपस्थिती | चित्रपट पाहून झाल्यानंतर पहिली ५-१० मिनिटे दर्शकांची सामान्य मते, प्रतिक्रिया किंवा प्रतिसाद समजून घेण्यासाठी ठेवावी. त्यानंतर तज्ञ प्रशिक्षकाने चित्रपटातील ३-५ ठसठशीत प्रसंग किंवा त्यातील महत्वपूर्ण विधाने कोणती हे दर्शकांकडून समजून घ्यावे व त्यासंबंधी छोटया गटात आपसात ते त्यांचेशी केलेल्या चर्चेने त्या गोष्टींची उजळणी करून घ्यावी. या चर्चेमुळे दर्शकांना योग्य असा सहभाग देण्याची संधी मिळते; तसेच चित्रपटाने त्यांच्या मनात झालेले संस्कार किंवा प्रभाव हेही जाणून घेता येतात. |
| चर्चा संचालित करण्याकरता तज्ञ प्रशिक्षकाने निर्माण केलेली अनुकूल परिस्थिती व सुविधा | प्रशिक्षण केंद्रातील आमंत्रित तज्ञ | प्रत्येक चित्रफितीमध्ये प्रशिक्षणाचा एक संच दिलेला असतो; त्यात त्यातील अभ्यासाचे विषय तसेच पूर्ण करावयाचे विशेष कार्यक्रम यांची माहिती असते. तज्ञ व्यक्तीने, सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात चित्रपटात दाखवलेल्या गोष्टीं व्यतिरिक्त स्थानिक विकासाची कोणती पाऊले उचलावीत याकरिता स्वतंत्र विचार करण्यास प्रवृत्त करावे. लटक्या रीतीने खिजवून किंवा डिवचून लोकांना बोलते करण्याचे तंत्र व प्रयुक्त्या, तज्ञ प्रशिक्षकांना शिकविलेल्या असतात. तसेच वर्गातील आनंद, उत्साह व रस टिकवण्यासाठी बौध्दीक खेळ (Games) किंवा प्रशिक्षणार्थ्याचे वादविवाद, चर्चा असे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. |
| प्रश्नोत्तरांचे सत्र | उपग्रहीय प्रक्षेपण (दुतर्फा) | तज्ञांच्या समूहातील सदस्यांशी ते सॅटकॉम (Satcom) स्टुडिओतून संभाषण करीत असता त्यांना प्रशिक्षण देणाऱ्यांनी प्रश्न विचारून तसेच चित्रफितीबाबत असलेला सर्वसामान्य प्रतिसाद सांगून त्यांच्याशी चर्चा करावी. तज्ञ सदस्यांनी त्यासंबंधात निर्माण झालेल्या २-३ प्रश्नांविषयी चर्चेला चालना द्यावी. |

**२.२५५ संमिश्र गटांमध्ये प्रशिक्षणाचे कार्य :**

विविध प्रकारच्या प्रशिक्षणार्थ्यांचे गट व त्यांची सामाजिक पार्श्वभूमी व भिन्न असलेली कामे व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन अशा संमिश्र गटांचा प्रशिक्षणात एकत्रित सहभाग मिळावा याकरिता पुरेशी काळजी घ्यावी. प्रशिक्षणाचे वेळी व त्यावेळच्या खुल्यादिलाच्या चर्चामधून मोकळेपणा व अनौपचारिकपणाचे वातावरण तयार होऊन त्यांना परस्परातील एकमेकांविषयी वाटणारे भय, शंका इ. निघून जाऊन त्यांच्या परस्परांतील असलेल्या पूर्वग्रहाच्या कल्पना देखील त्यांच्या मनातून निघून जातात. अभ्यासक्रम १ (अ) व अभ्यासक्रम १ (ब) यांचे प्रशिक्षण पंचायत सदस्य व अधिकारी यांच्या संमिश्र गटात एकाचवेळी द्यावे अशी अपेक्षा आहे. याशिवाय संयुक्त प्रशिक्षण वर्गामध्ये वेगळे संमिश्र गट खालीलप्रमाणे करता येतील.

**अ) दुसऱ्यांदा निवडून आलेले सदस्य आणि दीपस्तंभासारख्या आदर्श ग्रामपंचायतीचे सदस्य :**

दुसऱ्यांदा निवडून आलेले पंचायत सदस्य आणि ज्या पंचायतींनी नमुनेदार पध्दतीने व कार्यक्षमतेने विकासाची कामे केली . ज्या विकास कामाची दीर्घकाळ नोंद घेतली गेली आहे. अशा पंचायतीचे सदस्य या प्रशिक्षण कार्यक्रमात दाखल करून घ्यावे. (अ) एकमेकांचे अनुभव आणि केलेली चांगली कामे या संबंधी परस्परात संवाद, चर्चा व देवाणघेवाण व्हावी. तसेच (ब) अशा संबंधातून विविध ग्रामपंचायतीचे संघटन एखाद्या विणलेल्या जाळयासारखे व्हावे; हा या संमिश्र प्रशिक्षणाचा प्रधान हेतू आहे. प्रशिक्षणाचा भाग म्हणून चांगले काम झालेल्या खेडयांना भेटी देणे हाही कार्यक्रम त्यात असावा.

**ब) ग्रामपंचायत, सरपंच आणि सचिव यांचे संयुक्त प्रशिक्षण :**

सामान्यतः सरपंचाच्या खालील जबाबदाऱ्या असतात.

- देणी देण्यापूर्वी बिलांना मंजूरी देणे
- देणे देण्यापूर्वी ठेकेदारांनी जी मोजमापे सादर केलली असतात, अशा पूर्ण झालेल्या सार्वजनिक कामांची मोजणी पडताळून पहाणे.
- विकास कामांना प्रशासकीय मंजूरी देणे.
- ग्रामपंचायतीचे प्रशासकीय व वित्तीय व्यवस्थापन योग्य रितीने होते की नाही याची काळजी घेणे.
- अनुदाने जमा असलेल्या खात्यातून चेकने पैसे काढताना ग्रामसचिवासह सरपंचाने सही करणे.
- शासकीय दप्तर व मालमत्ता यांचा योग्य सांभाळ करणे.
- ऑडिट (लेखाप्रशिक्षण) चे आक्षेप लक्षात घेवून व आक्षेप राहणार नाहीत, अशा सुधारणा करणे.
- ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करणे व ते सादर करणे.
- ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या कामावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे.

सरपंच आणि सचिव यांच्या एकत्रित प्रशिक्षणाने दोघांनाही परस्परांच्या जबाबदाऱ्या समजून घेता येतील आणि परस्पर सहकार्याची भावना वाढेल.

**क) भिन्न पातळीच्या उदा. मोठया व लहान पंचायतीच्या सदस्यांचे संयुक्त प्रशिक्षण :**

जिल्हा, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती या तिन्ही भिन्न पातळीच्या पंचायतीच्या सदस्यांचा संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम घेतल्यास त्यांच्या सदस्यांना पंचायतराज यशस्वी करण्याकरिता कोणत्या भूमिका पार पाडाव्या लागतात. याची जाणीव व माहिती होऊन त्यांच्यातले सहकार्य अधिक प्रमाणात वाढू शकेल. याच प्रकारे पंचायत सदस्य आणि स्थायी समित्यांचे वेगवेगळया पातळीच्या पंचायतीचे अध्यक्ष असा वेगळया प्रकारचा संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम याचीही परस्पर स्नेह व सहकार्य वाढविण्यात मदत होईल.

**ड) भिन्न पातळीवरच्या (वरिष्ठ - कनिष्ठ) कर्मचाऱ्यांचे संयुक्त प्रशिक्षण :**

पंचायती राज या व्यवस्थेविषयी आस्था व विश्वास वाढावा तसेच भिन्न पातळीच्या कर्मचाऱ्यांमध्ये 'एक-संघभावना' निर्माण व्हावी म्हणून त्यांचेही संयुक्त प्रशिक्षण आयोजित करावे. या एकत्र येण्याने भिन्न पातळीवरच्या कर्मचाऱ्यांच्या काम करण्याची संस्कृती व नीती यांची जाण वाढून पंचायतीच्या कामाला त्यांची मदत होईल. विविध जिल्हयातील अधिकाऱ्यांनी ज्या कामाच्या अभिनव व चांगल्या पध्दती राबविल्या असतील त्यासंबंधीचे आदान - प्रदान करण्याकरिता असे प्रशिक्षण केंद्र, एखाद्या संवाद व्यासपीठासारखे काम करील.

**इ) अभियांत्रिकी, लेखा - परिक्षण आणि जमाखर्च हिशोब ठेवणारे कर्मचारी :**

विकास प्रकल्पांच्या सामाजिक, आर्थिक आणि मानवी परिवर्तनाच्या कार्याचे महत्व अभियांत्रिकी व जमाखर्चाचे हिशेब ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी अशा संमिश्र गटाचे प्रशिक्षण लाभदायक होईल. विविध कार्यक्रमांचे नियोजन व त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता पंचायतींना जे नव्याने अधिक अधिकार प्राप्त झाले आहेत त्यासंबंधीची जाणीव या प्रशिक्षणाने, त्यात भाग घेणाऱ्यांमध्ये वाढीस लागेल. पैशांची देणी देण्यापूर्वी पूर्ण झालेल्या कामांची योग्य रितीने मोजदाद करणे आवश्यक असते. हे लक्षात येऊन ग्रामसभेनी एखादे काम प्रमाणित करून मंजूर करताना पारदर्शी निर्णय घेण्यावर भर दिला जाईल. कामांच्या पूर्ततेचे पुरावे म्हणून कोणती कागदपत्रे आवश्यक असतात त्यासंबंधीची योग्य माहिती प्रशिक्षणात भाग घेणाऱ्यांना होईल.

**२.३ भाग २ - या नियमांच्या चौकटीत समाविष्ट झालेल्या भाग २ अभ्यासक्रमांचे वर्णन :**

**२.३१ अभ्यासक्रम II (अ) क्षेत्रीय कामासंबंधी भर देणारा प्रशिक्षण कार्यक्रम :**

२.३११ कार्यक्रमांचे नियोजन व कार्यवाही यासंबंधीच्या अनेक बाबींवर सदर भाग (II) कार्यक्रमात क्षेत्रीय कामावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर या कामातून उपलब्ध होणाऱ्या सेवा मिळण्याची हमी याला तितकेच महत्व देण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नियोजन व त्याची कार्यवाही करणे ही पंचायतींची प्रमुख भूमिका असते. मात्र या विषयाची कक्षा ओलांडून त्या पलिकडे असलेल्या बाबींचाही अभ्यास करणे आवश्यक असते. घटनेच्या

११ व्या यादीत समाविष्ट झालेल्या बाबी या जरी प्रधान महत्वाच्या असल्या तरी विकासानुकूल अग्रक्रमाची क्षेत्रे आणि केंद्र सरकारच्या योजना यांनाही समान महत्व देऊन पंचायतींनी त्यासंबंधी तत्परतेने कामे करावयाची आहेत. खाली दिलेल्या तालिका क्र. ४ मध्ये भाग ॥ मधील अशा योजना व क्षेत्रे यांची यादी दिले आहे.

**तक्ता क्र. ४**

| क्षेत्र | क्र. | योजना | केंद्रीय मंत्रालय / शासकीय विभाग |
|---|---|---|---|
| प्राथमिक शिक्षण | १ | सर्व शिक्षा अभियान | प्राथमिक शिक्षण विभाग |
| | २ | मध्याने भोजन योजना | |
| प्रौढ शिक्षण | ३ | सर्व साक्षरता अभियान | |
| सार्वजनिक आरोग्य | ४ | पिण्याच्या पाणी पुरवठयाची सेवा | पाणीपुरवठा विभाग |
| सार्वजनिक आरोग्य | ४ | पिण्याच्या पाणी पुरवठयाची सेवा | पाणीपुरवठा विभाग |
| | ५ | सार्वत्रिक स्वच्छता अभियान | |
| आरोग्य | ६ | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य सेवा | आरोग्य मंत्रालय |
| बालकल्याण | ७ | एकात्मिक बालक - विकास सेवा | मानवी संसाधन विकास मंत्रालय<br>माहिला व बालकल्याण विभाग |
| दारिद्रय निर्मूलन | ८ | राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | ग्रामीण विकास मंत्रालय |
| | ९ | स्वर्ण जयंती ग्रामीण स्वरोजगार योजना | |
| ग्रामीण घरबांधणी | १० | इंदिरा आवास योजना | |
| ग्रामीण रस्ते | ११ | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना | |
| ग्रामीण विद्युतीकरण | १२ | राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना | वीज मंत्रालय |
| | १३ | दुर्गम खेडयांच्या विद्युतीकरणाचा कार्यक्रम | अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय |
| आदिवासी जमाती विकास | १४ | आदिवासी विकास - उपयोजना | आदिवासी कल्याण मंत्रालय |
| नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन | १५ | हरियाली | ग्रामीण विकास मंत्रालय |
| | १६ | कृषिमंत्रालयाच्या गावतळयांच्या योजना | कृषिमंत्रालय |
| उद्योग व ग्रामीण व्यवसाय केंद्रे | १७ | अनेक प्रकल्प | अन्नप्रक्रिया मंत्रालय |
| | | | कापड मंत्रालय |
| | | | लघुउद्योग, कृषि व ग्रामीण उद्योग विभाग |
| आपत्ती व्यवस्थापन | - | - | वेगळे मंत्रालय, विभाग |

सेवांच्या उपलब्धतेच्या संदर्भात, नियोजन, कार्यवाही, पर्यवेक्षण व नियंत्रण, निवेदन आणि लेखा - नोंदी - जमाखर्च हिशेब या संबंधीचे स्पष्टीकरण अभ्यासक्रमात दिले जावे. पंचायत राज संस्थांनी सदर प्रकल्प व योजना यांची कार्यक्षमतेने अंमलबजावणी करण्याची गरज व तिचे महत्व या गोष्टी ही स्पष्टपणे माहित करून घ्याव्या.

२.३१२ **अभ्यासक्रम II अ मधील शिकण्याचे विषय :-** पंचायतीची विकास कामे टप्प्याटप्प्याने त्यांच्या कार्यवाहीच्या पध्दतीनुसार कशी करावयाची त्याचे प्रशिक्षण पंचायत सदस्य व कर्मचारी यांच्या आपापसातील चर्चा, विचारविनिमयाने होण्याकरता अभ्यासक्रम II अ ची आखणी करण्यात आली आहे. स्वयंसहाय्यता गट तसेच राज्य ग्रामीण विकास संस्था ज्यांच्या पूर्वी केलेल्या चांगल्या कामांची औपचारिकरित्या प्रंशसा / वाखाणणी झालेली आहे. अशा गटातील नेतृत्व व संघटन करणाऱ्या प्रमुख व्यक्तींकडून या कार्यशाळेचा प्रधान अभ्यासक्रम ठरविला जावा.

**तक्ता क्र. ५**

| **५ (अ) नियोजन** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | योजनेविषयीची स्थूल माहिती आणि त्यासंबंधात मंजूर झालेल्या कायद्यांचे ज्ञान | २ | संबंधित सेवा देण्याकरता सहभाग असलेली योजना तयार करणे. | ३ | पंचायत पातळीवरच्या प्रकल्पांचा स्थानिक गरजांच्या संदर्भात अग्रक्रम ठरविणे. |
| ४ | पंचायत योजनेची तपासणी आणि प्रकल्पांना मंजूरी मिळविणे | ५ | विविध कार्यक्रमात कोणते फेरबदल व सुधारणा करावी. त्यासंबंधीची उदाहरणे | ६ | विकास कामांची अद्ययावत मांडणी आणि त्यासंबंधीची तयारी करणे. |
| | | ७ | पंचायत पातळीवरच्या योजनांचा जिल्हा पातळीच्या नियोजनात समावेश करणे. | | |

| **५ (ब) अंमलबजावणी** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थ्यांची निवड | २ | हजेरी पत्रक ठेवणे | ३ | वेतन / मजुरी देणे |

| **५ (क) पर्यवेक्षण व नियंत्रण** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामांच्या पूर्ततेविषयक मोजणी | २ | गुणवत्ता नियंत्रण | ३ | केलेल्या कामाला प्रमाणपत्र देणे |
| | | ४ | वार्षिक अहवाल तयार | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | करणे. | | |
| **५ (ड) कामासंबंधी माहिती उघड करणे** | | | | | |
| १ | माहितीच्या आधाराच्या शर्ती पुऱ्या करण्याकरता तयारी करणे | २ | झालेल्या कामांचे तपशील जाहीर करण्याकरिता फलके, बॅनर्स किंवा पत्रके वाटणे. | ३ | सामाजिक लेखाजोखा झालेल्या कामांच्या गुणवत्तेविषयीचे परीक्षण व अभिप्राय समाजाकडून घेणे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **५ इ जमा खर्च हिशेब** | | | | | |
| १ | पंचायत जमा खर्च - हिशेब यासंबंधी स्थूल माहिती | २ | स्थायी स्वरूपाच्या नोंदवहया (रजिस्टर) ठेवणे | ३ | पंचायत निधीचे व्यवस्थापन |
| ४ | ट्रेझरीच्या कामांच्या पध्दती | ५ | बँक खात्यासंबंधातील कार्यपध्दती | ६ | लेखा - परिक्षण करून घेणे. |

**२.३१३ ll अ या अभ्यासक्रमातील शिकविण्याचे विषय व भाग यांची रूपरेषा :**
अभ्यासक्रमातील शिकविण्याचे विषय व भाग यांची रूपरेषा ठरविण्याच्या जबाबदाऱ्या खाली दिलेल्या तालिका क्र. ६ मध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हा प्रशिक्षण संघ यांच्या विविध जबाबदाऱ्या तपशीलवारपणे देऊन त्यांच्या कार्याची व्याप्ती दर्शविणारे आलेख (Activity mapping) त्यात दिले आहेत.

**तक्ता क्र. ६**

| **केंद्र सरकार** | **राज्य सरकार** | **जिल्हा प्रशिक्षण संघ** |
|---|---|---|
| विविध केंद्रीय मंत्रालयांनी ग्रामीण विकासाकरिता पंचायतींना जे महत्वाचे कार्यक्रम पार पाडण्यासाठी दिले आहेत. त्यांची संक्षिप्त माहिती पंचायत सदस्यांना देणे. | राज्यांनी विविध क्षेत्रीय विकास करण्याकरिता जे नेमके व स्पष्ट असे अग्रक्रमाचे कार्यक्रम पंचायतींना नियोजन व कार्यवाहीकरता गरजेचे म्हणून सोपविले आहेत. त्यांची माहिती देणे. | जिल्हा पातळीवरच्या योजना व कार्यक्रम यांच्यातील सूक्ष्म भेद ( ) तसेच क्षेत्रीय योजना पंचायत पातळीवर राबविताना लक्षात घ्यावयाचे (सूक्ष्म भेद). |

२.३१४ **अभ्यासक्रम यांच्या प्रशिक्षणाच्या शास्त्रीय पध्दतीची माहिती देणे आणि अंमलबजावणी करण्यासाठी साधनांची सिध्दता करणे.** :- जिल्हा वा तहसील पातळीवरच्या उच्च शासकीय अधिकाऱ्यांची साधनभूत तज्ञ म्हणून प्रशिक्षण कार्यात नियुक्ती व समावेश करणे. प्रशिक्षण भाग १ मध्ये निर्देश केलेल्या आर्थिक गुंतवणूकी आणि साधनभूत तज्ञ यांचाच उपयोग प्रशिक्षण भाग २ मध्ये करून घ्यावा. परंतु, क्षेत्रीय विशिष्ट कार्यक्रम यासंबंधी प्रशिक्षण देण्याकरता, त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्या योग्य मनोवृत्ती आणि कामाची समज

(aptitude) असणाऱ्या वरीष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे श्रेयस्कर होईल. कारण या अधिकाऱ्यांना कामाच्या सूक्ष्म व निकट साहचर्यामुळे झालेले ज्ञान, स्थानिक परिस्थिती आणि तळागाळाच्या पातळीपर्यंच्या वास्तवतेचे योग्य भान असल्यामुळे, त्यांना योग्य प्रकारे उत्तेजन व प्रेरणा दिल्यास, त्यांचेकडून निर्मितीक्षम आणि उपयुक्त असे योगदान मिळेल.

प्रशिक्षण भाग २ अ करिता, जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या संघात अगोदरच निवड झालेल्या विभागीय क्षेत्रातील अनुभवी कर्मचाऱ्यांकडून हे काम करून घ्यावे. स्थायी समितीच्या सदस्यांकरिता असणाऱ्या अल्पमुदतीच्या प्रशिक्षणाचे काम, जिल्हा व तहसील पातळीवरच्या वरीष्ठ कर्मचाऱ्याकडे सोपविले जावे. कारण की त्यांना त्यांच्या सिध्द हस्तांचा (      ) व अनुभवाचा लाभ झालेला असतो. त्याची नित्याची कामे व कर्तव्ये तसेच प्रशिक्षणाच्या कामाच्या जबाबदाऱ्या या दोन्हींचा समतोल राखण्यासाठी असे प्रशिक्षण कार्यक्रम फक्त १ दिवस किंवा अर्ध्या दिवसाचेच असावेत.

**२.३१५ अभ्यासक्रम II अ याचा कालावधी :**

सदर अभ्यासक्रम दोन भागात तालिका क्र. ७ मध्ये दाखविल्याप्रमाणे विभागावा.

**तक्ता क्र.** ७

| अ.क्र | टप्पा | कालावधी | अभ्यासाचे विषय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | टप्पा क्र. १ | ३ दिवस | जमाखर्च- हिशेब, वित्तव्यवस्थापन, जाहीर माहितीचे प्रकटन, सामाजिक प्रशिक्षण व मूल्यांकन यांचे परस्परांशी छेद देणाऱ्या बाबी | तालिका क्र. १ मध्ये दिलेल्या सर्व प्रशिक्षणार्थी करिता |
| २ | टप्पा क्र. २ | ३ दिवस | क्षेत्रासंबंधित असलेले आणि उपयोजना संबंधी असलेले नेमके व आवश्यक असे प्रशिक्षण | विविध स्थायी समित्यांच्या सदस्यांचे विशेषीकरण असलेले वर्गीकरण, वेगळया गटांमध्ये विभाजन आणि त्या त्या विशेषीकरणच्या भागांची सत्रे यामध्ये उपस्थिती व सहभाग |

वरील मूलभूत स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचनामध्ये, पंचायतींना दिलेला वाव आणि सशक्तीकरणाचे अधिकार यांच्या संदर्भात, आवश्यक ते बदल केल्यास हरकत नाही.

**२.३१६ अभ्यासक्रम - II (ब) - माहिती संवाद तंत्रज्ञान (ICT) कौशल्ये वाढविणे.**

या अभ्यासक्रमाने प्रत्येक पंचायतीतील किमान दोन व्यक्तींना संगणकाचा उपयोग करण्याचे प्रशिक्षण देणे.

**२.३१७ अभ्यासक्रम - II (ब) व त्यातील अभ्यासाचे विषय -**

पंचायतींच्या कामांना उपयुक्त अशी जी संगणक प्रणाली पुरविले असते. तिचा कार्यक्षम उपयोग करण्यासंबंधीची जाणीव निर्माण करणे आणि त्यात पारंगतता वाढविणे या हेतूने या अभ्यासक्रमाचे विषय ठरविण्यात आले आहेत. एन. आय. सी. (राष्ट्रीय संगणक केंद्र) यांनी तयार केलेल्या पंचायत कामाकरिता उपयुक्त सुसज्ज संगणक संच (पंचायत सूट - Suite) आणि उलट बाजूने मिळणाऱ्या प्रश्नांची उत्तरे, ( National Panchayat Portal) कडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाचा योग्य लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या जवळीकतेवर व परिचयांवर भर देण्यात यावा. माहिती भरण्याची कौशल्ये आणि सॉफ्टवेअरची कामे शिकविण्याकरिता निवड झालेल्या व्यक्तींना हे शिक्षण द्यावे.

**२.३१८ अभ्यासक्रम - II (ब) यातील तपशीलवार विषय ठरविण्याची जबाबदारी :**

तालिका क्र. ८ मध्ये, केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हा प्रशिक्षण संघ यांच्या जबाबदारी व कामांचे तपशीलवार आराखडे सदर अभ्यासक्रमात दिले आहेत.

**तक्ता क्र. ८**

| केंद्र सरकार | राज्य सरकार | जिल्हा प्रशिक्षण संघ |
|---|---|---|
| कामाची मूलभूत व मार्गदर्शक नियमावली (Manual) तसेच (एन.आय.सी.) राष्ट्रीय संगणक केंद्राने द्यावयाचे सॉफ्टवेअर | एन. आय. सी च्या राज्यपातळीवरच्या माहिती तंत्रज्ञान अधिकाऱ्यांनी राज्यांना उपयुक्त असणाऱ्या मार्गदर्शक नियमावल्या तयार करणे. | स्थानिक पातळीवर सुयोग्य अशा तज्ञ व्यक्तींची प्रशिक्षक म्हणून निवड करणे. |

**२.३१९ अभ्यासक्रम - II (ब) यांच्या शास्त्रीय पध्दतीनुसार करावयाचे प्रशिक्षण आणि त्याच्या कार्यपूर्तीसाठी आवश्यक अशा साधनांची जमवाजमव (Logistics) करणे.**

संगणक वापराच्या कौशल्यांकरता, साखळीबध्द व प्रवाही (Cascade Mode) प्रकारचे प्रशिक्षण असावे. माहिती तंत्रज्ञानात पारंगत असलेल्या पुरेशा तज्ञांची उपलब्धता ही निश्चित खात्रीची असल्यास, प्रशिक्षणास प्रारंभ करावा. त्या दृष्टिने प्रशिक्षकांचे प्रशिक्षण हे राज्य पातळीवर राज्य ग्रामीण विकास संस्था तसेच राज्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांच्या सहकार्याने आयोजित करावे.

**२.४ भाग III- आंतर संवाद व सहकार्य तसेच संघटनांचे जाळे (Network) यांच्या योगे सशक्तीकरणाचे मजबूत संघटन करणे.**

२.४१ या प्रशिक्षण चौकटीच्या भाग १ व भाग २ यांचे प्रशिक्षण निवडणूक झाल्यापासून १ वर्षाच्या आत राज्यपातळीवर संघटीत करावे. परंतु प्रशिक्षण संपल्यानंतर पंचायत सदस्य व अधिकारी आपापली कामे करू लागल्यानंतर त्यांना प्रत्यक्षात कार्यक्षेत्रात ज्या समस्या, अडचणी भासतील त्यांचे निवारण करण्याकरता प्रशिक्षण केंद्राने सातत्याने संवाद, संपर्क आणि अतिरिक्त सहाय्य देत रहावे. अभ्यासक्रमात समावेश न झालेल्या व झालेल्या अशा

अनेक कामासंबंधीचे मार्गदर्शन व प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या ३ ऱ्या भागात दिले जावे त्याचे तपशील खालीलप्रमाणे.

**२.४२ II (अ) ग्रामसभा पातळीवरची अभियाने :**

ग्रामसभांच्या कामांचे संचालन सुधारण्याकरिता लोकांना प्रेरणा देण्याकरता मोठया प्रमाणावर सामाजिक सहभागांचे कार्यक्रम आयोजित करण्याने, पंचायत सदस्य व अधिकारी यांच्या प्रशिक्षणास पूरक असे सहाय्य लाभावे. लाभार्थीची निवड करणे, सामाजिक परिक्षण व अभिप्राय घेणे याकरता समाजातील लोकांचा सहभाग व विचार घेणे याकरिता स्वयंसेवी - सहाय्य - गट, बिनसरकारी सामाजिक संघटना इ. यांचे कडून सहकार्य लाभल्यास विकासाकरिता लोकांचा उत्स्फूर्त व उत्साही सहभाग आवश्यक हा संदेश लोकांपर्यत पोहोचेल. महिला बचत गट, युवा मंडळे, स्वयंसहाय्य गट, विधायक कार्यकर्त्यांच्या लोकांना व इतर प्रभावी दबाव गटांना ग्रामसभेतील चर्चा व कामकाजात सहभाग देण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी सार्वजनिक मोहीम घेण्यात यावी. विविध क्षेत्रीय उपयोजना यांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात तसेच पंचायतींच्या स्थायी समितीच्या कामात उत्साहपूर्ण भाग घेण्यास या मोहिमेचा उपयोग होईल.

दारूचे जडलेले अमर्याद व्यसन, निरक्षरता, बालिकांचे शिक्षण, घरगुती हिंसाचार, हुंडा - प्रथा, पाणी व शेतजमिनींचे संरक्षण, जैविक शेती या सर्वांच्या जिव्हाळयांचे प्रश्न सोडविण्यासाठी भर दिलेल्या मोहिमा आयोजित करताना कला पथकांची नाटके, पथनाटये, प्रेरक व मार्गदर्शक गाणी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश व त्यांचा प्रचार वर्षभर सातत्याने दैनंदिन जीवनात व्हावा. ग्रामसभेच्या दोन-चार सभांनी हे प्रश्न मिटवले जाऊ शकत नाहीत.

**२.४३ II (ब) पंचायती राज टी. व्ही. चॅनल :**

२.४३.१‘पंचायती राज’ चा संदेश देशभर कानाकोपऱ्यात पोचविण्याकरता जर पहिले प्रभावी प्रयत्न करावयाचे असल्यास टि. व्ही. चॅनल इतके समर्थ व लोकप्रिय माध्यम नाही. कमीतकमी वेळामध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यत हे माध्यम पोहोचेल हा त्याचा विशेष लाभ आहे. मोठया संख्येच्या दर्शकांपर्यत पोहचणारे देशात खाजगी व सरकारी मालकीचे अनेक टि. व्ही. चॅनल्स आहेत. क्षमतावृध्दी प्रशिक्षण वर्गाचा संपूर्ण अभ्यासक्रम हा आखीव-रेखीव आणि विशिष्ट गटाच्या व्यक्तींकरताच असल्यामुळे टि. व्ही. माध्यमाचा त्या कार्यक्रमास फारसा फायदा होणार नाही. मात्र विद्यमान टि. व्ही. चॅनल्सवरून विज्ञापन-निवेदन यांनी त्यासंबंधातील ‘जनजागरणाची मोहिम’ बरीच यशस्वी होईल.

२.४३.२**रेडिओ (आकाशवाणी) :-**

रेडिओवरून प्रसारित केलेल्या व्यापारी जाहिरातींच्या करता, काही निश्चित वेळा या पंचायती राज कार्यक्रमांकरता राखून ठेवल्यास सर्वसामान्य लोकांमध्ये त्याबाबतीत माहिती व जागरूकता निर्माण होईल.

**२.४४ III क पंचायत सदस्यांचे विस्तारित संघटन (Network) :**

पंचायत सदस्यांचे विस्तारित संघटन (Network) वाढल्यास उपलब्ध होणारे निधी व त्याने होणारे विकास कार्य, पंचायतीराज प्रगती संबंधात जागरूकतेने लक्ष ठेवणे, परस्परांना उपलब्ध होणारी साधने, भासणाऱ्या अडचणी आणि जे कडू-गोड अनुभव यासंबंधीची मनमोकळी, प्रामाणिक चर्चा व विचारांची देवाण-घेवाण करणे सोयीचे होईल. पंचायत महिला शक्ती अभियान आणि पंचायत युवा शक्ती अभियान यांची रचना व घटना करण्याचे उद्देश त्यायोगे सफल होतील. अशा घटनातून स्वतः शिकण्याच्या प्रक्रियेतून खाली दिलेल्या काही विधायक गोष्टी संबंधितांच्या पुढाकारातून शक्य होतील.

अ) माहिती तंत्रज्ञानाचा वापर

ब) गावच्या तालुक्याच्या किंवा जिल्हयांच्या रहिवाशांकरता स्थानिक पातळीवर प्रसारित केलेले आकाशवाणी कार्यक्रम. यामुळे लहान प्रमाणावरच्या स्थानिक संघटनांना लाभ होईल. तालुका पातळीवरच्या आकाशवाणी कार्यक्रमामुळे गावोगावच्या विधायक कार्यकर्त्यांचा एकमेकांचा संपर्क वाढेल, ते जोडले जातील आणि सामर्थ्यवर्धक प्रशिक्षण सातत्याने पाठिंबा व आधार मिळत राहील.

**२.४५ III (e) वार्षिक उजळणी** (Refresher) **वर्ग :**

सर्व पंचायत सदस्यांकरता वर्षातून एकदा उजळणी वर्ग आयोजित करावा. प्रशिक्षण वर्ग १ अ प्रमाणेच त्याची आखणी करावी. उदाहरणार्थ (अ) उपग्रहीय प्रक्षेपणाच्या एकमेकांशी प्रत्यक्ष सहारय्यने चर्चा व संवाद. प्रशिक्षणाचा मुळ हेतू हा पंचायत सदस्यांना खालील गोष्टीसाठी एक प्रभावी व उपयुक्त मंच/व्यासपीठ मिळवून देणे हा असावा. (अ) यशस्वी झालेल्या कार्यपद्धती (Practices) व कामे तसेच अयशस्वी झालेली कामे व प्रकल्प यासंबंधीच्या अनुभवांची देवाण-घेवाण व खुल्यादिलाने चर्चा (ब) एकमेकांशी असलेली संपर्क व्यवस्था घट्ट करणे. ४ दिवसाच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात एकमेकांचे अनुभव कथन आणि विकासकामांची जागेवर जाऊन पहाणी करणे यांवर भर द्यावा.

**२.४६ III (फ) 'दिपस्तंभ' ग्रामपंचायतींना भेटी :**

ज्या पंचायतींची पारदर्शक व स्वतंत्र प्रकियेने नमुनेदार व आदर्श पंचायत म्हणून निवड झाली आहे. व ज्यांची कामे 'सजावटीतील कपाटामधून' दाखविण्यासारखी आहेत अशा पंचायतींचा अभ्यास करण्याकरता इतर पंचायत सदस्यांच्या भेटी आयोजित करण्याने उत्तम कार्यपद्धती आणा-या आदर्श पंचायतींना उत्तेजन मिळते, उत्तम प्रकारचे व आदर्श काम कसे याचे नमुने प्रत्यक्ष पाहायला मिळतात आणि विकासाची कामे व चांगले प्रशासन यांची प्रभारी भूमिका समजावून घेता येते.

**२.४७ III (ज) तालुका पातळीवरचे विस्तार व संसाधन केंद्र :**

२.४७.१ तालुका पातळीवर प्रत्येकी किमान एक विस्तार सेवा देणारे केंद्र असले पाहिजे की जेणेकरुन ह्या पंचायत क्षेत्रात असणा-या सर्व पंचायतींना प्रशिक्षण विषयक गरजा भागविता येतील. यातील प्रत्येक विस्तार सेवा केंद्रास प्रशिक्षण सेवा देण्याकरता प्रत्यक्ष कामाचा अनुभव

असणा-या तज्ञ व्यक्तीं आणि पंचायत सदस्य यांना एकत्र आणून त्यांचा विचारविनिमय आणि संघटन साधता येईल अशा विस्तार सेवा केंद्रात उपग्रहीय प्रक्षेपणाच्या सहाय्याने अभ्यासक्रम चालविण्याचे काम करता येईल. याच ठिकाणी, पंचायतसदस्यांच्या छोट्या बैठका घेऊन एकमेकांचे सहाय्य मिळविता येईल.

**२.४७.२प्रत्येक विस्तार सेवा केंद्रात काही तज्ञ व्यक्तींची नियुक्ती करून त्यांचेकडून पंचायतीच्या कामाकरिता तांत्रिक सहाय्य खालीलप्रकारे उपलब्ध होऊ शकेल.**

- अभियंताः पंचायत पातळीवरच्या संसाधन निर्मीती प्रकल्पांचे पुनर्वलोकन आणि प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे, त्याकरता निविदा (Tenders) मिळविणे आणि कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे ही कामे करुन घेणे.

- हिशोबनीसः वित्तीय मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायतींच्या कामाचे हिशेब व्यवस्थित ठेवणे, गरजेनुसार सहाय्य करणे, आणि ग्रामपंचायतींचे हिशोब तालुका पातळीवर देवून ते जिल्हा पातळीवर हस्तांतरित करणे.

- सामाजिक कार्यकर्ताः पंचायतींच्या विकेंद्रीत लोकसहभागीय नियोजनांची प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी, सर्वात गरीब आणि सर्वात दुर्बल व पीडित अशा व्यक्तींना ग्रामसभा व वॉर्डसभामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करणे.

२.४७.३अशा प्रकारची सहाय्यक केंद्रे अ) जिल्हा किंवा तालुका ब) जिल्हा किंवा तालुक्यांची मदत घेवून राज्य ग्रामीण विकास संस्था क) ज्या ठिकाणी पंचायतसदस्यांच्या संघटना सशक्त असतील अशा ठिकाणी या संघटनांमार्फत, ड) पंचायत सदस्य संघटनांशी निकटचा संबंध असलेल्या बिनसरकारी स्वयंसेवी संघटना, यामार्फत व्यवस्था लावता येईल. अशा प्रकारचे संघटन आणि व्यवस्थापन हे परस्पर सहमतीतून होणे गरजेचे आहे. यापैकी कोणत्याही प्रतिमान व्यवस्थेची निवड केली तरी, विस्तारित सेवा देणा-या केंद्रांचे नियंत्रण व व्यवस्थापन यांच्याशी पंचायतसदस्यांचा निकटचा संबंध असावा.

**२.४८ III (ह) हेल्पलाईन (Helpline) :**

कोणत्याही संबंधीत विषयावर स्पष्टीकरण देणे अथवा नवी माहिती देणे याकरता टेलीफोन हेल्पलाईन उपलब्ध असावी. याकरता प्रशिक्षित व्यक्ती आणि मार्गदर्शन मागणा-या व्यक्तीमध्ये जोडणारा संदेशवहन मार्ग असावा. तालिका क्र. ९ मध्ये यांसंबंधी संक्षिप्तपणे माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ९ -**

| | |
|---|---|
| स्थान | प्रारंभीच्या काळात राज्यपातळीवर सुरू करावे, मात्र ते जिल्हा पातळीवर असणे अतिशय सोईचे व आदर्श. |
| किमान सोयी | प्रत्येक मार्गदर्शक, सहाय्य देणा-या केंद्रात किमान एक दूरध्वनि मार्ग तसेच एक स्वतंत्र फॅक्स मार्ग असणे आवश्यक. |

| | |
|---|---|
| प्रशिक्षण | प्रत्येक टेलिफोनवरची माहितीची मागणी व त्याकरता केलेला संवाद वा प्रश्न यांना उत्तरे देण्याकरता प्रशिक्षित कर्मचा-यांची नियुक्ती केली जावी. पंचायती राजच्या सर्व कामांची त्यांना माहिती असावी तसेच त्यांचे बोलणे, वागणे, प्रतिसाद देणे हे प्रसन्न शिष्टाचारयुक्त असावे आणि मदत देण्यात त्यांना आस्था असावी. वेगवेगळया ठिकाणी प्रत्यक्ष विकास कामात गुंतलेल्या अनुभवी तज्ञ व्यक्तींची या कामाकरता चक्राकार पद्धतीने नियुक्ती व्हावी. म्हणजे तीच ती व्यक्ती सतत उत्तरे देण्यास नसावी, उत्तरे देणा-या व्यक्तीमध्ये सतत बदल करण्याचे लाभ उत्तरे देणारे व घेणारे या दोहोना होतात. |
| प्रशिक्षणाची वेळ | प्रत्येक दिवशी ८ तासांची एक पाळी या पद्धतीने दोन पाळयात म्हणजे १६ तास<br>हे मदतकेंद्र कार्यरत असावे. दूर अंतरावरच्या किंवा स्थानिक नसलेल्या दूरध्वनीच्या बोलण्याचे दर जेव्हा कमी असतात किंवा सवलतीचे असतात अशा वेळा सांभाळून ब-याच व्यक्ती त्यांना पक्की माहिती मिळावी म्हणून दूरध्वनीद्वारे प्रश्न विचारत असतात याकारणास्तव मदत केंद्र तब्बल १२ तास चालवावे. |
| जाहिरात व सार्वत्रिक संकलन. | सरकारी विज्ञापने, प्रकटने, माहिती देणारी साधने यांच्या व्दारा अशा मदतकेंद्राविषयी सार्वत्रिक माहिती दिली गेली पाहिजे. स्थानिक वा राष्ट्रीय वृत्तपत्रातून त्यांना प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. |
| खुलासा करण्याकरता उपलब्ध असलेली साधने | राज्य सरकारनी पंचायतराजसंबंधीचे केलेले कायदे, नियम, अधिनियम, कामाचे आराखडे, आदेश आणि कार्यालयीन पत्रके यासंबंधीची समग्र माहिती खुलेपणाने प्रसिद्ध करावी. मदतकेंद्रात माहितीच्या अधिकाराने मिळणा-या माहितीचा समावेश करावा. प्रकल्पाच्या कामांचे अंदाजपत्रक करणे, सरकारमान्य कामांचे प्रमाणित दर यासंबंधी झटकन स्पष्टीकरण देणारी माहिती उपलब्ध करावी. |
| मदतकेंद्राकडून फॅक्स संदेशाने माहिती उपलब्ध करणे. | सार्वजनिक एस. टी. डी. बूथवरुन ग्रामपंचायतींशी संपर्क साधून माहिती मिळविण्याची सुविधा असावी तसेच ज्या पंचायतींकडून फॅक्स संदेश उपलब्ध होण्याची यंत्रणा असेल त्यांनी फॅक्सद्वारे इच्छुक व्यक्तीस माहिती द्यावी. |
| माहिती मागणी करणा-या संभाक्षणांची नोंद ठेवणे व त्यांची उत्तरे देणे. | पंचायतराज कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसंबंधी असलेली मते, टीका व अभिप्राय,यांची नोंद दूरध्वनीच्या संभाषणाच्या नोंदीमुळे शक्य होईल. कोणत्या दूरध्वनीच्या विचारणा झाल्या, त्यांचे संक्षिप्त विषय कोणते होते. यांची प्रत्येक दिवसाची दफ्तर नोंद (लॉगबुका) त वेगळया नोंदवहीत करावी. |
| तक्रार निवारण | मदत केंद्रांच्या दूरध्वनीवर आपल्या तक्रारी आणि त्रास यांची नोंद करण्यासाठी ब-याच व्यक्ति दूरध्वनीवरचा उपयोग करतात. त्यांच्या तक्रार विषयी संबंधित अधिका-यांना माहिती देणे आणि त्यांचेकडून जे खुलासे |

| | |
|---|---|
| | मिळतात त्यांच्या आधारे उत्तरे देऊन त्रस्त व्यक्तिंच्या तक्रारीचे निवारण करणे हे मदतकेंद्राचे काम आहे. |
| पूर्वी मार्गदर्शक सूचना दिल्या असल्यास त्यात आवश्यक त्या नव्याने सुधारणा करुन, नवे मार्गदर्शन देणे | ज्या ठिकाणी राज्य सरकारला एकापेक्षा अधिक मदतकेंद्र हवे असेल तर प्रत्यक्ष विकास कामे ज्या ठिकाणी चालतात त्यासंबंधी अद्यावत माहिती मिळवून प्रत्येक महिन्यात मदत केंद्रात काम करणा-या कर्मचा-यांना नवी माहिती व नव्या सूचना देणे जरुरीचे असते. या परिस्थितीत कर्मचा-यांना एकमेकाच्या अनुभवावर आधारित अशी सत्यस्थिती समजावून घेण्याची संधि असते. ब-याचदा पुन्हा पुन्हा विचारल्या जाणा-या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, तक्रारनोंदवहीत असलेल्या सर्वसाधारण प्रश्नांची माहिती, वरिष्ठांकडून मिळणा-या सूचनेव्दारा मिळते. म्हणूनच त्या प्रमुख प्रश्नांची उत्तरे देणे सोईचे होते. |

## २.४९ III (य) पंचायतीराज प्रशिक्षणाचे औपचारिक प्रमाणपत्र :-

प्रशिक्षणाचे औपचारिक प्रमाणपत्र देण्यासाठी तशीच औपचारिक प्रशिक्षण. व्यवस्था असावी. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठांसारख्या संस्थांद्वारे, लेखनिक सचिव किंवा तांत्रिक कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाकरता खास प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करुन घ्यावे. इच्छुक निर्वाचित पंचायतसदस्यांनी या प्रशिक्षणवर्गात भाग घेवून त्यांचा लाभ मिळवावा. अध्ययनाचे प्रामणित दर्जे ठरविले जावेत आणि त्या दर्जापर्यत ज्यांची प्रगति झाली असेल अशांना प्राशिक्षण वर्गाच्या आयोजकांनी औपचारिक प्रमाणपत्र देणे जरुरीचे आहे.

# प्रकरण ३
# सामर्थ्यवर्धक प्रशिक्षण वर्गाच्या कार्यवाहीसाठी लागणा-या तज्ञ व्यक्ति

३.१ अभ्यासक्रम भाग १ व भाग २ हे शिकविताना उपग्रहीय प्रक्षेपण आणि चेहरे समोरासमोर असलेले प्रशिक्षण यांचा समन्वय करण्याची प्रगती ही प्रधान महत्त्वाची आहे. राष्ट्रीय पातळीपासून ते तालुका पातळीपर्यत तज्ञ साधन व्यक्तिंचे जत्थे करणे व प्रशिक्षणाची साखळी तयार करणे हा या कार्यक्रमातील गुंतवणूकीचा भाग आहे. प्रशिक्षण देणे हा केवळ एकाच वेळचा प्रयत्न नसून त्याच्या सातत्याकरता तज्ञ व्यक्तींची गरज भासल्यास त्यांची नैमित्तिक किंवा वेळांमध्ये खंड पाडून निवड करण्यापेक्षा त्यांचे कायमचे साठे तयार करावेत. असे त्यांचे साठे तीन टप्प्यांमध्ये साखळी प्रक्रियेने करावे लागतील ते म्हणजे राष्ट्रीय पातळीवर तज्ञ व्यक्ति, राज्यपातळीवरच्या तज्ञ व्यक्ति आणि जिल्हा व तालुका पातळीवरच्या तज्ञ व्यक्तींचे वेगळे साठे करणे आवश्यक आहेत. माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षणाकरता (अभ्यासक्रम ब) फक्त दोन पातळीवरच्या म्हणजे राज्य व जिल्हा पातळीवरच्या तज्ञ व्यक्तींची साखळी असावी.

३.२ **प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लागणा-या तज्ञ व्यक्तींसंबंधीची तपशीलवार माहिती :**

३.२१ महत्त्वाच्या विकासाच्या कार्यक्रमांच्या यशस्वितेकरता कर्मचा-यांमध्ये योग्य मनोवृत्ती, क्षमता आणि कौशल्ये देण्याची अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकणा-या, प्रशिक्षणात प्रभुत्व असलेल्या गुरुंची आवश्यकता आहे. प्रशिक्षणाचा आशय, त्याची पद्धती आणि कार्यक्रमाचे सुसज्ज संचालन यांच्या संदर्भाने प्रशिक्षणाच्या कौशल्यामध्ये वेगवेगळया पातळया ठरविता येतील. प्रशिक्षण प्रभुत्व असलेल्या शिक्षकांची मूलभूत गुणवत्ता ठरविणारे निकष अगोदरच निश्चित करावे तसेच प्रशिक्षणाच्या स्वरुपाप्रमाणे त्यांच्यात आवश्यक ते फेरबदल करावे. राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर, प्रशिक्षण प्रभूंना (Master Trainers) उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात यावे, निवडलेल्या प्रशिक्षकांना प्रशिक्षणकार्याचा तसेच विविध सरकारी योजना व कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्याचा गाढा अनुभव असावा. पंचायतीराज आदर्श संकल्पनेतील ध्येयवाद व त्याची प्रकृति यासंबंधी राष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षण देण्यावर भर द्यावा. तसेच त्यातील कार्यवाहीच्या यंत्रणाची सविस्तर माहिती द्यावी. या प्रशिक्षणाने राज्य पातळीवरचे प्रशिक्षणप्रभु तयार करणे व आवश्यक त्या विधायक कार्याचा दृष्टिकोन त्यांना आत्मसात करता यावा.

३.२२ जिल्हा पातळीवरचे तज्ञ प्रशिक्षक :- पंचायतीराज मध्ये झोकून देऊन सहभाग घेणा-या तज्ञ व्यक्तींची जिल्हा पातळीवर प्रशिक्षक म्हणून निवड करावी. प्रशिक्षण केंद्रामधील कामांना गति देण्याचे कामही प्रशिक्षकांवर सोपवावे.

३.२३ **आवश्यक प्रशिक्षकांची संख्या :-** तालिका क्र. १० मध्ये कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरता लागणारे विविध प्रकारचे तज्ञ व त्यांची संख्या दिली आहे.

| अनु. क्र. | तज्ज्ञ व्यक्ती कोणत्या गटाची | आवश्यक संख्या | आवश्यक संख्या ठरविणारे निकष | कामांचा स्थूल आराखडा तसेच संबंधित अभ्यासक्रम | प्रशिक्षणाची जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| **केंद्रीय पातळी** | | | | | |
| | उपग्रहीय प्रशिक्षण कार्यक्रमांचे नेतृत्व व सादरीकरण करणारे | ९६(१००) | प्रत्येक राज्याचे किमान ४ | राज्य उपग्रहीय प्रक्षेपणाने शिक्षण कार्यक्रम भाग १ व भाग २ चे कार्यक्रम - नेतृत्व व सादरीकरण | एस. आय. आर. डी. (SIRD) जो प्रशिक्षण कार्यक्रम सध्या राबवित आहे. त्या कार्यक्रमाविषयीचे प्राथमिक परिचयात्मक प्रशिक्षण केंद्रशासनाच्या पंचायतीराज मंत्रालयाने द्यावयाचे |
| | राष्ट्रीय तज्ज्ञ प्रशिक्षक | १५० | खालील स्तंभात संख्या दिली आहे. | प्रशिक्षण कार्यकम भाग १ व भाग २ चे काम करणा-या प्रशिक्षण प्रभुंना (Master Trainers) जिल्हा पातळीवर ToTs या कार्यक्रमाने तयार करणे | राज्याने पात्र व्यक्तींची प्रशिक्षणाकरता निवड करावी MOPR संस्थेद्वारा तसेच SIRD ने तयार केलेल्या अभ्यासक्रमाचे शिक्षण देवून प्रशिक्षणाची पूर्वतयारी करुन द्यावी. |
| | **एकुण** | **२५०** | | | |
| **राज्यपातळी** | | | | | |
| १ | राज्यपातळीवर प्रशिक्षण प्रभू तयार करण्याकरता निवडलेल्या | १८५० | खालील संदर्भात आकडा | जिल्हा पातळीवर च्द्च्च्च्ग्न हा कार्यक्रम राबविणे तसेच अभ्यासक्रम | निवडलेल्या राज्याने SIRD चा प्रशिक्षण कार्यकम राबवून - प्रशिक्षणात प्रभुत्व मिळवून देणे |

| अनु. क्र. | तज्ञ व्यक्ती कोणत्या गटाची | आवश्यक संख्या | आवश्यक संख्या ठरविणारे निकष | कामांचा स्थूल आराखडा तसेच संबंधित अभ्यासक्रम | प्रशिक्षणाची जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| २ | व्यक्ति | | | भाग १ व भाग २ याचे प्रशिक्षण | |
| ३ | जिल्हा पातळीवर तज्ञ प्रशिक्षक म्हणून निवडलेल्या व्यक्ति | २७५०० | वरीलप्रमाणे | - | राज्यातील प्रशिक्षण प्रभूंनी निवडलेल्या व्यक्तिंना जिल्हा पातळीवर तयार करणे |
| ४ | राज्य पातळीवरचे प्रशिक्षण प्रभू माहिती तंत्रज्ञान विषयांचे | १०० | प्रत्येक राज्यातून किमान ४ | जिल्हा पातळीवरच्या व्यक्तिंना कार्यक्रमाचे प्रशिक्षण | राष्ट्रीय संगणक केंद्र (NIC) ने राज्यशासनाच्या सल्ल्यानुसार प्रशिक्षणाकरिता निवडलेल्या व्यक्ती |
| ५ | जिल्हा पातळीवरचे तज्ञ प्रशिक्षक (माहिती तंत्रज्ञान) | १८०० | प्रत्येक जिल्हयातून किमान ३ | - | राज्याने निवड करुन च्या मदतीने व मार्गदर्शनाने प्रशिक्षित करणे |
| | **एकूण** | **३१२५०** | | | |
| **अंतिम बेरीज** | | **३१५००** | | | |

**खाली दिलेल्या तालिका क्र. ११ मध्ये आवश्यक असलेल्या तज्ञ प्रशिक्षकांच्या संख्येसंबंधीची गणिते.**

**तक्ता क्र. ११**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | निर्वाचित पंचायत सदस्यांची संख्या | २२०००००० | |
| ब | प्रत्येक तुकडीतील प्रशिक्षणार्थींची संख्या | २० | प्रशिक्षण वर्गाच्या प्रत्येक तुकडीत फक्त २० प्रशिक्षणार्थी असावेत त्यापेक्षा जास्त नकोत. त्यामुळे प्रशिक्षणार्थींकडे पुरेसे लक्ष देणे तसेच प्रशिक्षणार्थींला शिकतांना सहभाग घेण्यास वाव मिळेल. |
| क | प्रशिक्षण तुकडयांची एकूण संख्या अ÷ब | ११०००० | प्रत्येक तुकडीत २० पेक्षा कमी संख्या असल्यामुळे १ लाख दहा हजार तुकडयांपेक्षा जास्त प्रशिक्षण तुकडया अपेक्षित |
| ड | प्रशिक्षणाची १ फेरी पूर्ण करण्याकरिता लागणाऱ्या आठवडयांची संख्या | २० | पूर्वतयारी, क्षेत्रीय प्रशिक्षण आणि उच्चस्तरीय उजळणी वर्ग या तिन्ही प्रकारचे प्रशिक्षण २० आठवडयांच्या कालावधीत पूर्ण करावयाचे आहे. प्रत्येक राज्यात या प्रशिक्षण फेरीचा कालावधी २० आठवडयांपेक्षा जास्त नसावा. |
| इ | दर आठवडयातील प्रशिक्षण तुकडयांची संख्या क÷ड | ५५०० | १,१०,००० तुकडयांचे प्रशिक्षण २० आठवडयात पूर्ण करावयाचे असल्यामुळे दर आठवडयातील प्रशिक्षण तुकडयांची संख्या ५५०० होते. |
| फ | प्रत्येक तुकडीस प्रशिक्षण देणाऱ्या तज्ञांची संख्या | ५ | प्रत्येक तुकडीला किमान ५ तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती केल्यामुळे शिक्षणक्रम पूर्ण करण्यास ही संख्या प्राप्त होईल. या ५ व्यक्तिंपैकी ३ व्यक्तिंना पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून नियुक्त करावे. त्यांची निवड करताना ते बिन सरकारी विधायक समाजकार्य करणाऱ्या संघटनांचे सक्रिय कार्यकर्ते, पंचायतीचे आजी व माजी सदस्य, निवृत्त शासकीय अधिकारी यांना प्राधान्य द्यावे. उरलेले २ हे जिल्हा व तालुका पातळीवरचे विकास काम करण्याचा अनुभव असलेले अधिकारी असावेत. |
| ग | प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्याचे प्रशिक्षण देणाऱ्या तज्ञांची संख्या इ÷फ | २७५०० | देशभरच्या पंचायतींमध्ये प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षकांची संख्या |
| ह | राज्य पातळीवरच्या मुख्य | १५ | राज्यपातळीवरच्या एका प्रशिक्षणप्रभूने १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रशिक्षकांची (Master Trainers) संख्या व क्षेत्रीय तज्ञ प्रशिक्षकांची संख्या | | प्रशिक्षण तज्ञांना तयार करावयाचे |
| य | राज्य पातळीवरच्या प्रशिक्षणा प्रभूंची आवश्यक संख्या ग÷ह | १८३३ | - |
| ज | राष्ट्रीय पातळीवरच्या प्रशिक्षणप्रभूंची संख्या दर राज्य पातळीवरच्या शिक्षण प्रभूंच्या तुलनेत | १५ | प्रत्येक राष्ट्रीय प्रशिक्षणप्रभूने राज्य पातळीवरचे किमान १५ प्रशिक्षणप्रभू तयार करावयाचे |
| छ | राष्ट्रीय पातळीवरच्या प्रशिक्षणप्रभूंची आवश्यक संख्या य÷ज | १२२ | - |

### ३.३ **<u>प्रशिक्षकतज्ञांची निवड :</u>**

३.३.१ प्रत्येक पातळीवर निवड झालेल्या तज्ञ प्रशिक्षकांच्या गुणवत्तेवर, कार्यप्रभुत्वावरच या देशभरच्या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी अवलंबून आहे. व्यक्तींचा स्वभाव धर्म व मनाचा अनुकूल संच / मानसिकता (Mind Set), कामातील तळमळ व बांधिलकी तसेच धडाडीने काम करण्याची तयारी या गोष्टी पारखून प्रशिक्षक म्हणून निवड करण्याची दक्षता घ्यावी. पंचायतीचे आजी व माजी सदस्य, बिनसरकारी स्वयंसेवी सामाजिक संघटना, नोकरीत असणारे व निवृत्त सरकारी अधिकारी या गटांमधून प्रशिक्षणार्थींची निवड करावी. त्यांच्या निवडीच्या प्रक्रियेचे तीन टप्पे खाली दिले आहेत.

- पूर्वतयारीच्या प्रशिक्षणवर्गात निवड करण्यापूर्वी त्यांची गुणवत्ता, पात्रता, अनुभव, पार्श्वभूमि यांची प्राथमिक तपासणी.

- त्यानंतर त्यांना भरपूर काम करावयास लावून पुरा केलेला पूर्वतयारीचा वर्ग.

- प्रशिक्षण वर्ग संपल्यानंतरचे त्यांच्या क्षमतेचे वस्तुनिष्ठ मुल्यांकन.

३.३.२ **(पूर्व तयारीचा वर्ग) पायाभूत प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी उमेदवारांची केलेली प्राथमिक तपासणी** : यासंबंधीचे निकर्ष खालीलप्रमाणे.

- महिला व जाती यामधील समानता तसेच सर्व धर्म समभाव या मूल्यांशी बांधिलकी जात, लिंग व धर्म याबाबत पूर्वग्रह नसावे.

- पंचायतीराज व्यवस्थेच्या कामाचा अनुभव असल्यास त्याला पसंती, परंतु अनुभव असलाच पाहिजे अशी सक्ती नाही.

- संवाद सोडून दिलेल्या व्यक्तिस पुन्हा बोलते करण्यासाठी सहानुभूतिपूर्ण पध्दतीने संवाद साधण्याची क्षमता.

- अनेकविविध प्रकारची कामे करण्याची क्षमता उदा. प्रशिक्षक म्हणून समोरासमोर व्याख्यान, चर्चा इ. सहाय्याने शिकविणे, उपग्रहीय प्रक्षेपणासोबत अध्ययन करणे, मदत केंद्रे चालविणे, पंचायतीतील प्रतिनिधींना संगणकाच्या सहाय्याने व इ-मेलने ऑन लाईन संदेशवहनाने सहाय्य करणे अशी अनेक कामे सारख्याच कौशल्याने करता येण्याचा गुण.

३.३.३ **प्रारंभीचा परिचयात्मक प्रशिक्षण वर्ग (Induction Course)** :- सदर प्रशिक्षणकार्यक्रमाद्वारे प्रशिक्षणप्रभूंची निवड करावयाची असल्यामुळे या कार्यक्रमात कसून मेहनत करण्यावर भर आहे. प्रशिक्षणाची प्रक्रिया उत्तम व प्रमाणित दस्ताऐवज व अभ्यास साधने यावर आधारित तसेच पंचायती राजच्या गरजा व जिल्हयाचे विषय यांच्याविषयी संवेदनशीलता वाढविण्यावर विशेष भर या गोष्टींना महत्व देण्यात आले आहे. गरीबांविषयी सहानुभूति व कळवळा वाटणे तसेच प्रतिकूल परिस्थितीला व कठीण आपत्तींना तोंड देणे या प्रमुख गुणांना प्राधान्य देऊन इतर कौशल्यांची चाचणी दोन महिन्यांच्या प्रशिक्षणवर्गानंतर घेऊनच ‘मास्टर ट्रेनर’ म्हणून निवड केली जाते. खेडयातल्या जीवनाशी पूर्ण समरस होणे ही देखिल प्रमुख अपेक्षा आहे. संपूर्ण प्रशिक्षण प्रक्रियेचे वित्तीय, वाहतूक, साधनांची जमवाजमव यासबंधीचे व्यवस्थापन तसेच सर्व सामान्य व्यवस्थापनाचे संपूर्ण ज्ञान शिकाऊ प्रशिक्षणप्रभूंना पूर्वतयारीच्या वर्गात दिले जाईल

३.३.४ **अंतिम चाचणी** :- पूर्वतयारीचा वर्ग संपल्यानंतर प्रशिक्षणविषयक पूर्ण ज्ञान, त्यासंबंधीची बांधिलकी आणि ऐकणाऱ्या किंवा शिकणाऱ्या व्यक्तिंना संस्कार देऊन वळण लावण्याची हातोटी यांच्या चाचण्या घेऊन अंतिम परीक्षेनंतरच निवड करण्यात येईल.

### ३.४ क्षेत्रीय पातळीवर तज्ञ व्यक्ति :-

शासकीय विकास प्रकल्पांची कामे यशस्वीरीतीने तसेच क्षेत्रीय पातळीवर तज्ञ व्यक्ति म्हणून काम करण्याचा ज्यांना दीर्घ अनुभव आहे अशा अधिकाऱ्यांना राष्ट्रीय, राज्यस्तरीय पातळयांवरील प्रशिक्षण अभ्यासक्रम ‘शिकविण्यासाठी प्रशिक्षणप्रभू’ (Master Trainers) म्हणून प्रशिक्षण व्यवस्थेत सामावून घ्यावे. प्रत्येक प्रशिक्षण तुकडीला जे पाच तज्ञ परीक्षक नियुक्त करावयाचे त्यापैंकी किमान दोन हे शासकीय कामाचा अनुभव असणारे अधिकारी असावेत. प्रशिक्षण व्यवस्थेत सामील होण्यापूर्वीच अशा अधिकाऱ्यांची विकास कामांना आवश्यक असे ज्ञान व त्यासंबंधीची कर्तव्यनिष्ठा वाढलेली असते. अशा व्यक्तिंना देखील प्रशिक्षणाच्या पूर्वतयारीचा २ महिन्याचा वर्ग हा तात्विक प्रशिक्षणाचा भाग म्हणून आवश्यक असल्याने सक्तीचा करावा. एवढा मोठा काळ वर्गाच्या पूर्ण वेळ

उपस्थितीकरता जर त्यांना काढता येणे अशक्य असेल तर त्यांना अल्पमुदतीच्या पूर्वतयारीच्या (उदा. २ ते ३ आठवडयांचे वर्ग) वर्गात प्रवेश करुन तज्ञ प्रशिक्षकांच्या तुकडीत दाखल होता येईल.

क्षेत्रीय पातळीवरच्या अधिकाऱ्यांनी जर प्रशिक्षण वर्गात तज्ञ व्यक्ति म्हणून किंवा प्रशिक्षक म्हणून काम केल्यास त्यांना 'वेगळे मानधन' देण्यात यावे. मानधनाचे दर राज्य सरकारांनी ठरवावेत. प्रशिक्षकांचे मानधन हा प्रशिक्षण वर्गाच्या एकूण खर्चातील एक भाग समजावा, असे झाल्यामुळे प्रशिक्षण वर्गाच्या खर्चाच्या मोजणीचे प्रमाणीकरण (Standardization) देशभर होऊ शकते.

**३.५ तज्ञ प्रशिक्षकांचा उच्चस्तरीय उजळणी वर्ग (Refresher Course) :**

देशातील सर्व प्रशिक्षकाचा वर्षातून एकदा मेळावा घेऊन त्यांच्या खुल्या चर्चा घडवाव्या. पंचायती राजचे ज्या राज्यात काम उत्कृष्ट झाले असेल अशी उत्तम कामगिरी केलेल्या राज्यांना भेटी देऊन झालेली कामे पहाणे, समजून घेणे हा 'प्रशिक्षणप्रभू' च्या उजळणी वर्गाचा प्रधान भाग असावा.

# प्रकरण ४ थे
# प्रशिक्षण साधनांचा विकास

४.१ **प्रशिक्षण साधनांची जमवाजमव करण्याकरता मार्गदर्शक तत्वे** :- प्रशिक्षण साधने ही बहुशः चित्रमय असावीत. ती स्थानिक भाषेत, शक्यतो त्या भागातील बोलीभाषेत अत्यंत साधी व सोपी असलीच पाहिजेत यावर कटाक्ष असावा. स्थानिक पातळीवर उत्तम व अभिनव प्रयोग आणि कार्यपध्दती ज्या ठिकाणी राबवल्या जातात त्यासंबंधीची माहिती समर्पक रीतीने देण्याकरता चित्रसाधनांचा प्रशिक्षणात वापर करावा. त्यातल्यात्यात खेडयातील सामान्य लोकांनी दिलेल्या साधनांचा भरपूर प्रमाणावर उपयोग करावा. खालच्या पातळीवरच्या कर्मचाऱ्यांकरता चित्रांसोबत प्रश्न व त्याचे उत्तरे या पध्दतीने साधने तयार करावी. वारंवार विचारले जाणारे प्रश्न, कामातील 'करा' व 'करु नका' असे संदेश, पुन्हा पुन्हा वापरल्या जाणाऱ्या तांत्रिक संज्ञांचे सोपे अर्थ देणारी सूचि यांचा 'प्रशिक्षण साधन संच' मध्ये समावेश करावा. प्रशिक्षणापूर्वी प्रतिज्ञा घेतांना, पंचायतीराज या व्यवस्थेची प्राथमिक व मूलभूत माहिती सोप्या भाषेत देणारी एक पुस्तिका पंचायत राज संबंधित सदस्य, अधिकारी तसेच प्रशिक्षणार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी.

४.२ **छापील साधने (Print Material)** :- वैविध्यपूर्ण छापील अभ्यास साधने विकसित करण्याची गरज प्रशिक्षण कार्याच्या विराट स्वरुपामुळे आवश्यक आहे. ही साधने वाचावयास सोपी आणि चित्र, फोटो, आलेख, नकाशे इ. च्या सहाय्याने रंजक झालेली असावी. छापील अभ्यास साधने खालील प्रकारची असावी.

- संदर्भाकरता वीतभर डायरीसारखे एखादे पुस्तक (Handbook) पंचायत सदस्य, अधिकारी, प्रशिक्षणार्थी यांना द्यावे, त्यात नेहमी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांसह त्यांची उत्तरे असावीत.

- आराखडे, भित्तीपत्रके, भिंतीवर लावण्याची रंगीत चित्रे (Posters), वृत्तपत्रे याद्वारे पंचायती राज कामांची माहिती द्यावी आणि ही लोकशिक्षणाची साधने पंचायत कार्यालयांच्या मोक्याच्या जागी किंवा पोस्ट ऑफिस, मुख्य बाजार, सभागृह, मंदीर, शाळा, उद्यान, क्रिडांगण, नदीवरील पूल अशा सार्वजनिक ठिकाणी सहजपणे वाचता येतील अशी रितीने प्रदर्शित करावीत.

- प्रशिक्षणवर्गाची 'वार्तापत्रे' प्रशिक्षणार्थी तसेच सामान्यजन यांचेकरिता विनामूल्य वाटण्यात यावी.

४.३ **चित्रपट आणि दृकश्राव्य माध्यम साधने** : (Electronic Material) :- प्रशिक्षणास उपयुक्त होणारे चित्रपट, चित्रफिती यांची निर्मिती करतांना काही मुद्दे विचारात घ्यावे ते खालीलप्रमाणे :

- कार्यशाळांमधील खुली चर्चा, वैयक्तिक मुलाखती, आणि नाटिकांच्या माध्यमातून केलेले लोकशिक्षण अशा प्रकारची ही साधने असावी. अशा चित्रफितीत निर्वाचित पंचायत सदस्यांच्या अनुभवांवर आधारित चर्चा, विकासकामासंबंधीचे त्यांचे विचार, अभिप्राय, भाष्य आणि यातून आपल्या स्वतःच्या ग्रामपंचायतीने कोणता बोध वा धडे घ्यावे यासंबंधीचे निष्कर्ष अशा गोष्टींवर भर असावा.

- अशा लघुपटांची संहिता पूर्वीच लिहून तयार नसावी. संहितेशिवाय उत्स्फूर्त व अकृत्रिम चर्चा मनाला जास्त भावते. तज्ञ विद्वान व्यक्तिंच्या भाषणबाजीला शक्यतो या लघुपटातून वगळावे. निवडून आलेल्या पंचायत सदस्यांचा जिवंत आणि अस्सल खराखुरा रांगडा संवाद या लघुचित्रपटात दाखविला गेला तर त्याचा प्रभाव अधिक जोरकस असतो.

- स्त्री - पुरुष समानता तसेच जाती-जातीतील माणसांची समानता या संबंधी भिन्न गटातील व्यक्तिंचे संवाद, संभाषण किंवा वाद यांना या चित्रपटात स्थान द्यावे.

खाजगी सामाजिक संघटनांना अशा प्रकारचे लघुपट तयार करण्यासाठी शक्य तितका वाव देऊन, या अभियानात सामील करुन घ्यावे.

४.४ **कार्यक्रमाचा नियोजित आराखडा करणे व त्याचे व्यवस्थापन करण्यात पंचायतींचा सहभाग** :- सदर प्रशिक्षण कार्यक्रम हे ‘आपले आहेत, आपल्या स्वतःचे आहेत’ अशी पंचायतींची भावना, उत्तेजित करण्याची गरज आहे. तसेच त्या कार्यक्रमांचे अभ्यासक्रमातील विषय व भाग ठरविणे आणि प्रशिक्षणाची यंत्रणा कार्यान्वित करणे यातच पंचायतींचा ‘सिंहाचा वाटा’ हवा. प्रशिक्षणसंस्थांच्या ‘नियंत्रक मंडळात’ तसेच कामे करुन घेण्याचे अधिकार असलेल्या गटामध्ये (Task Force) पंचायत सदस्यांचा सहभाग व प्रतिनिधित्व व सदस्य म्हणून समावेश करण्याने प्रशिक्षण व सदस्य यांच्यात दुरावा राहणार नाही. सुरुवातीस, प्रशिक्षित झालेल्यांना तज्ञ प्रशिक्षक म्हणून नियुक्त करुन योग्य उत्तेजन दिल्यास इतर पंचायत सदस्यांना बरोबरीच्या मोकळेपणाने / संगतीने पंचायत विषयक महत्वाच्या बाबींचे अध्यापन सक्षमपणे करु शकतील. या प्रकारे राज्यांतर्गत आणि राज्याबाहेर, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पातळीवरच्या सहकार्यांचे बांधील करार किंवा त्याविषयक परस्परांच्या आदान प्रदानाचे ठराव यांना उत्तेजन तसेच सहाय्य मिळाले पाहिजे. दीर्घकाळात पंचायत सदस्यांच्या संघटन जाळयामार्फत या सामर्थ्यवर्धक प्रशिक्षण कार्यक्रमांचे देशव्यापी व्यवस्थापन केले जावे त्यातूनच पंचायतींची स्वतःची अशी आत्मनिर्भर प्रशिक्षण व्यवस्था उदयास येणे हे हितकारक आहे.

# प्रकरण पाचवे

# कार्यक्रमाचे व्यवस्थापन, मूल्यमापन आणि तत्संबंधी विषयांवर मौलिक कागदपत्रे व साहित्य यांचे जतन व (Documentation) प्रलेखन

५.१ ज्या संस्था प्रशिक्षणाचे कार्य स्वतः संचालित करीत नाहीत त्यांनी प्रशिक्षण कार्याचे तटस्थ आणि वस्तुनिष्ठ मुल्यमापन करणे श्रेयस्कर व उचित होईल यात शंका नाही. तथापि प्रशिक्षण देणा-या संस्थांनी देखील त्यांचे स्वयं-मूल्यांकन व आत्मपरीक्षण केले पाहीजे.प्रशिक्षण कार्यक्रम चौकटी प्रमाणे कार्यवाही ज्या यंत्रणेने होते त्या यंत्रणेच्या नियंत्रण कार्ये व मूल्यांकन करण्याची पध्दती यांना दिशा देण्यास खालील गोष्टी उपयुक्त आहेत.

- पूर्ण झालेल्या कामांची आकडेवारी तसेच ज्या उत्पादन कार्याची संख्यात्मक मोजणी होऊ शकते अशी माहीती देणे ,उदाहरणार्थ प्रशिक्षण वर्गाच्या कार्यशाळांची संख्या,त्यातील उपस्थितींची संख्या,त्यातील महिला व दलित मागासजमाती या वर्गातील उपस्थितीची संख्या व त्यांचा सहभाग, आकाशवाणी वा चित्रपट या साधनांचा झालेला वापर,उपग्रहीय प्रक्षेपणांचा उपयोग इ.

- **कार्यक्रमाची निष्पती (Outcome) खालील स्वरुपात**
  - पंचायतींना उपलब्ध झालेल्या सुविधांची गुणवत्ता (की ज्यामुळे पंचायतींना त्यांची जबाबदारी व्यवस्थित पार पाडण्यास सहाय्य होते.)
  - पंचायत पातळीवरच्या विविध कामांचे व्यवस्थापन -संचालन होत असतांना एकूण मनोवृत्ती किंवा मनोधारणेत झालेले बदल तसेच त्यांना उपलब्ध झालेल्या सेवांची गुणवत्ता.

५.२ **फलनिष्पत्तीचे सुनियंत्रण** :- गुणात्मक परिमितीवर आधारित (Qualitative Parameters) एकूण झालेल्या परिणामांचे विश्लेषण व परीक्षण होण्याची गरज आहे पंचायतींच्या सुप्तशक्ती किती प्रमाणात मुक्त झाल्या त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी खालील बाबी विचारात घ्याव्या.

- दिलेल्या प्रशिक्षणामुळ ग्रामसभा, वार्ड सभा व सामाजिक लेखापरीक्षण यांच्या संचालनात समाजाचा सहभाग किती प्रमाणात व कशा प्रकारे वाढला.

- पंचायतीच्या स्थायी समितीच्या कार्यक्षमतेवर प्रशिक्षणाचा कोणता प्रभाव झाला.

- प्रशिक्षणामुळे पंचायतीतील विविध लोकांच्या गटात सख्य,एकजूट व भागीदारी यांचे रसायन-मिश्रण कशा प्रकारे झाले तसेच सर्वसामान्य लोक व त्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी या दोघात एकोपा वाढला आहे काय.

- पंचायतीच्या सभात तसेच खुल्या ग्रामसभेत निर्णय प्रक्रिया सुधारण्यासाठी लोकशाही प्रणित संकेत व प्रक्रिया यावर हुकूमी वर्तन होण्यासाठी पंचायतींनी कोणते विशेष प्रयत्न केले.

- लोकसहभागी नियोजनांची निर्मिती आणि मान्यता यांना प्रशिक्षणामुळे कोणता लाभ झाला.

- स्थायी स्वरुपाच्या प्रशासकीय कार्यपध्दतीची (Procedure) पूर्तता करणे,तसेच अंमलबजावणीच्या योग्य प्रक्रियेकरता कोणते निर्णय घेतले गेले.

- प्रतिसाद व उत्तरे देणे तसेच स्वच्छपणे व प्रामाणिकपणे जमाखर्चाचे हिशोब देण्यात कोणत्या सुधारणा झाल्या.

- लोकांच्या तक्रारीचे निवारण करणे.

- ग्रामपंचायत सभांमध्ये वार्ड सदस्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग.

- पंचायत सभेत ग्रामसभेच्या सदस्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग.

५.३ **प्रशिक्षण कार्यक्रमांचे व्यवस्थापन** :- स्थानिक गरजा लक्षात घेऊन कार्यक्रमांचे व्यवस्थापन विकेंद्रित करण्यात आले आहे. तालिका क्र. १२ मध्ये दिल्याप्रमाणे वेगवेगळया उपसमित्या नेमून एकूण कार्यक्रमाच्या व्यवस्थापनाचे काम वाटले जावे. अशा श्रमविभागणीने व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होईल.

**तक्ता क्र. १२**

| **उपसमितीचे नांव** | **कर्तव्ये -जबाबदा-या** |
|---|---|
| अभ्यासक्रम निर्धारण समिती | या समितीच्या प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा आराखडा विकसित करण्याची जबाबदारी सोपविली आहे. यात अभ्यासक्रमाचा आशय आणि प्रशिक्षण पूर्तीची प्रक्रिया याही गोष्टी ठरवायच्या आहेत. प्रशिक्षण साधनांचा विकास,उत्पादन आणि वितरण हे काम तसेच प्रशिक्षणाकरिता आवश्यक असलेली प्रधान व पूरक साधने हेरणे व निश्चित करणे. |
| मुल्यांकन व साहित्य जतन यांचे नियंत्रण करणारी समिती (Evaluation and Doumentation) | मुल्यांकनाचे व नियंत्रणाचे निकष या समितीने निश्चित करावयाचे आहेत.तसेच विविध प्रशिक्षण कार्यक्रमांच्या कागदपत्रांचे व साहित्य साधनांचे जतन करणा-या तसेच त्यांचे मूल्यांकन करण्याचा अनुभव असलेल्या सुयोग्य व्यक्ति वा संस्था यांची माहिती मिळवून त्यांचेपैकी योग्य व्यक्तींना त्या कामाची जबाबदारी सोपवणे |

| | |
|---|---|
| वित्तीय/हिशोब लेखापरिक्षण समिती | प्रशिक्षणाच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध झालेल्या निधींचा विनियोग योग्य प्रकारे नियंत्रित करणे तसेच त्या खर्ची पडलेल्या रकमांचे सातत्याने आणि नैमित्तिक लेखापरिक्षण करणे ही या समितीची कर्तव्ये आहेत.प्रशिक्षणाकरिता त्यांचा विनियोग झाला याची प्रमाणपत्रे वेळेत सादर करणे अथवा मागणी झाल्यास केव्हाही सादर करणे या समितीच्या जबाबदा-या आहेत. |

५.४ प्रशिक्षण कार्यक्रम ठरविणे, त्याची साधने मिळविणे,त्यांच्या आशयाचा आराखडा बनविणे,मूल्यांकन करण्याकरता कार्यालयीन पत्रक (Form) तयार करणे, प्रशिक्षणोत्तर झालेल्या कामगिरीचे मूल्यांकन करणे या कार्यामध्ये, जिल्हा पातळीवर श्रेष्ठ व्यक्तींचे गट,पंचायत सदस्य,प्रशिक्षण- तज्ञ, स्वयंसेवी सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते यांनाही सामील करुन घ्यावे.

# प्रकरण - ६ वे
# क्षमतावृध्दी कार्यक्रमाच्या नियमांच्या चौकटीनुसार अंमलबजावणीच्या खर्चाचा अंदाज घेणे

६.१ सामर्थ्यवर्धक / क्षमतावृध्दी कार्यक्रम चौकटीच्या अंमलबजावणी खर्चाचे अंदाज घेण्यासाठी अनेक बाबींचा विचार करावा लागणे गरजेचे आहे. त्या खर्चाचे प्रमुख भाग म्हणजे भांडवली खर्च आणि महसूली (प्रतिवर्षी होणारा) खर्च. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या वर्षात भांडवली खर्चाची मोठया प्रमाणावर गुंतवणूक करावी लागेल. नियमावलीच्या चौकटीत आधीन राहून प्रशिक्षण प्रक्रियेमध्ये सातत्याने सुधारणा आणि चांगले बदल घडवावे लागतील. पहिल्या वर्षातील प्रशिक्षणाद्वारे वर्गात दाखल झालेल्या सदस्यास, कार्यक्रम राबविण्याकरिता आवश्यक असलेली मूलभूत व जुजबी माहितीची साधने ( ) उपलब्ध करुन देणे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे पहिल्या वर्षाच्या अनुभवाने दुसऱ्या वर्षाच्या प्रशिक्षण कार्यक्रमात मोठया प्रमाणावर फेरबदल व सुधारणा करण्याची गरज उद्‌भवेल. अभ्यासक्रमाचे छोटे भाग, प्रशिक्षण गट तसेच प्रशिक्षणाची रणनीती यांच्यात जे बदल होतील त्यामुळे पूर्वी केलेल्या खर्चाच्या अंदाजातही महत्वाचे बदल करावे लागणे अपरिहार्य आहे. अध्यापनाकरिता लागणारे छापील साहित्य तसेच दृकश्राव्य साधने यांच्यासारख्या बाबींवर ३ - ४ वर्षात एकदाच खर्च करावा लागेल. पण ज्या पहिल्या वर्षात त्या गोष्टी तयार होतील त्यांच्यावरील खर्च हा त्याच वर्षात दाखविला जाईल. तसेच तो त्याच वर्षात खर्ची पडेल. या कारणामुळे आरंभीच्या पहिल्या वर्षाचा वार्षिक खर्च हा त्यानंतरच्या प्रशिक्षणाच्या वार्षिक खर्चापेक्षा वेगळा असेल. तालिका क्र. १३ मध्ये वेगवेगळया भागांवर होणाऱ्या खर्चाचे गणित कसे मांडावयाचे व त्याची नोंद कशी करावयाची त्यासंबंधी तपशीलवार माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. १३**

| **भांडवल खर्च** | **वार्षिक खर्च** | **दुसऱ्या वर्षापासून पुढच्या वार्षिक खर्चाच्या बाबी** |
|---|---|---|
| उपग्रहीय प्रशिक्षण सुविधा | ‘प्रशिक्षणप्रभूं’ करिता असलेला प्रादेशिक पूर्वतयारीचा प्रशिक्षण वर्ग | उच्चस्तरीय उजळणीवर्ग प्रशिक्षित तज्ञांकरिता |
| पंचायतीमध्ये संगणक बसविण्याची सुविधा | १-अ) पायाभरणीचा अभ्यासक्रम | III क्र) प्रतिवर्षीचा उजळणी वर्ग |
| समिती पंचायत पातळीवरची प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्रे | १-ब) मूलभूत कार्यांवर भर देणारा अभ्यासक्रम. | III) नमुनेदार व निवडक पंचायतींना भेटी व त्यांच्या कार्याची माहिती |
| राष्ट्रीय एकात्मिक ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमास बळकटी देणे (NIRD) | १ क) कार्यानुभवी साक्षरता वर्ग<br>II अ) क्षेत्रीय विकास कार्यांवर केंद्रीत असा प्रशिक्षण कार्यक्रम | III क) ग्रामसभा पातळीवरचे साक्षरता अभियान<br>III य) प्रमाणपत्रांकरिताचा अभ्यासवर्ग |

| | | |
|---|---|---|
| राज्य पातळीवरच्या ग्रामीण विकास कार्यक्रमास मजबुती देणे (SIRD) | II अ) वरील प्रमाणे<br>III ड) पंचायत सदस्यांच्या संघटनांचे जाळे तयार करणे.<br>II ब) संगणकवापराची कौशल्ये वाढविणे | फलनिष्पत्तीवर लक्ष व नियंत्रण |
| | **फिल्म व अभियांत्रिकी साधने** | **प्रत्यक्ष कामांचे संशोधन** |
| | ***छापील साहित्य***<br>प्रथम वर्षापासून लागणाऱ्या त्याच त्या गोष्टी :-<br>III(ब) : पंचायत राज टी.व्ही चॅनल व आकाशवाणी कार्यक्रम.<br>III(क) : पंचायत राज वार्तापत्र<br>III(ग) : माध्यमिक पंचायत पातळीवर प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे<br>III(ह) : सहाय्यक व मार्गदर्शन यंत्रणा (Helpline) प्रशिक्षण कार्यक्रमाचे व्यवस्थापन | |

**६.२ तक्ता क्र.१४ मध्ये भांडवली खर्चाची नोंद कशा प्रकारे करावयाची त्यासंबंधी मार्गदर्शन दिले आहे.**

**तक्ता क्र.१४ : भांडवली खर्च**

**तक्ता क्र.१४ :- (अ-२) उपग्रहीय प्रक्षेपणाच्या सहाय्याने केलेल्या प्रशिक्षणाचा भांडवली खर्च :**

| बाब | प्रति घटक खर्च (कोटी रुपयांमध्ये) | घटक संख्या | घटक स्तर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| उपग्रहीय प्रक्षेपणाचा स्टुडिओ | ५ | - | राज्य | - |
| उपग्रहीय प्रक्षेपण उपलब्ध होण्याची केंद्रे | ०.००७ | - | माध्यमिक पंचायत पातळीवर प्रत्येकी एक | - |
| नागरी बांधकामाची कामे उदा. विद्युतीकरण प्रशिक्षण वर्गा करिता सभागृह बांधणी इ. | - | - | - | - |
| **एकुण** | | | | |

**तक्ता क्र १४ (ब) पंचायतींमध्ये संगणक व्यवस्था**

| बाब | प्रति घटक खर्च (कोटी रुपयांमध्ये) | घटक संख्या | घटक स्तर | एकूण खर्च (कोटी रुपये ) |
|---|---|---|---|---|
| संगणक (हार्डवेअर) | रु. ५०,००० | - | प्रत्येकी ग्रामपंचायत पातळीवर एक | - |

**तक्ता क्र. १४(क) प्रशिक्षणाच्या सुविधा समर्थ करण्याकरिता केलेला भांडवली खर्च**

| **बाब** | **प्रति घटक खर्च (कोटी रुपयांमध्ये)** | **घटक संख्या** | **घटक स्तर** | **एकूण खर्च (कोटी रुपये )** |
|---|---|---|---|---|
| माध्यमिक पंचायत पातळीवरची सहाय्यक केंद्रे | १० | - | प्रत्येक माध्यमिक पंचायत | - |
| राज्य एकात्मिक ग्रामीण विकास योजनेस सशक्त करण्याकरता ( ) | १०० | - | राज्यात किमान एक | - |

**तक्ता क्र.१५**

| **बाब** | **एकूण खर्च (कोटी रुपये )** |
|---|---|
| उपग्रहीय प्रक्षेपणाने प्रशिक्षण<br>संगणक - हार्डवेअर<br>माध्यमिक पंचायत पातळीवरची सहाय्यक केंद्रे राज्य एकात्मिक ग्रामीण विकास योजनेस सशक्त करणे (SIRD) | - |
| **एकूण** | |

राज्यपातळीवर अगोदरच उपलब्ध असलेली ‘विस्तारसेवा केंद्रे’ उपग्रहीय प्रशिक्षणाच्या सुविधा यासारख्या विद्यमान संरचनांचा विस्तार ज्या प्रमाणात झाला असेल त्यानुसार भांडवली खर्चात राज्यवार बदल व भिन्नता आढळण्याची शक्यता आहे.

## ६.३ **वार्षिक खर्च : (पुनरोद्‌भवी)**

६.३.१ प्रतिवर्षी होणाऱ्या वार्षिक खर्चात बदल असणे स्वाभाविक असते कारण प्रत्येक वर्षात कोणत्या प्रकारचे संमिश्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित होतात त्यात फरक असू शकतो.

**६.३.२ खाली दिलेल्या कोष्टकात (Matrix) दाखविल्याप्रमाणे पहिल्या वर्षी होणारा खर्च कशा रितीने मोजावयाचा त्यासंबंधी माहिती दिलेली आहे.**

तक्ता क्र.१६ :

| अ.क्र | बाब | घटक संख्या | मोजमाप करण्याचा निकष | एकूण खर्च (कोटी रुपये ) |
|---|---|---|---|---|
| १ | ‘प्रशिक्षणप्रभूं’ तयार करण्याकरिता घेतलेला पूर्वतयारीचा वर्ग : | - | ६० दिवसांचा प्रशिक्षण वर्ग प्रत्येक सहभागी प्रशिक्षणार्थी करता दर दिवशी रु.१००/- यामध्ये सर्व प्रकारच्या खर्चांचा समावेश केलेला आहे. | - |
| २ | अभ्यासक्रम १ (अ) पायाभरणीचा प्रशिक्षणवर्ग | - | ४ दिवसांचा दहा लाख निर्वाचित पंचायत सदस्यांचा व स्थायी समितीच्या सदस्याचा रु.१५० दर दिवशी अ ५ लाख अधिकाऱ्यांचा | |
| ३ | अभ्यासक्रम अ (ब) मूलभूत कार्यकारी प्रशिक्षण वर्ग (Functional Course) | - | ४ दिवसांचा दरदिवशी रु १५० प्रत्येकी - १० लाख निर्वाचित पंचायत सदस्य आणि स्थायी समितींचे अध्यक्ष याच्याकरिता अ ५ लाख अधिकाऱ्यांकरता. | - |
| ४ | अभ्यासक्रम १ (क) कामचलाऊ साक्षरता प्रशिक्षण (Functional) | - | प्रत्येक निरक्षर व्यक्तिस रु. १०००/- या दराने एकूण ८ लाख निरक्षर लोकांकरता | - |
| ५ | अभ्यासक्रम २ (अ) क्षेत्रीय विकास कामांवर केंद्रीत असलेला प्रशिक्षण वर्ग | - | प्रत्येक निरक्षर व्यक्तिस रु.१५०/- प्रत्येक दिवसाचा दरडोई खर्च असा २२ लाख निर्वाचित पंचायत सदस्य आणि ८ लाख अधिकाऱ्यांकरता | - |
| ६ | अभ्यासक्रम ३ (ड) पंचायत सदस्यांच्या संघटनांचे जाळे उभारण्यासाठी | - | प्रत्येक राज्यास एक संघटन जाळे त्याकरता होणारा प्रत्येक राज्याचा प्राथमिक खर्च रु. २ लाख | - |
| ७ | अभ्यासक्रम २ (ब) माहिती तंत्रज्ञान वापराची कौशल्य (ITS’s Skills) | - | प्रत्येक व्यक्तिकरता रु.२०००/- या दराने ५ लाख व्यक्तिंकरिता | - |
| ८ | चित्रपट आणि अभियांत्रिकी / Electronic प्रशिक्षण साधने | - | प्रत्येक अर्ध्या तासाच्या चित्रपटाकरिता रु १० लाख | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | छापील प्रशिक्षण साहित्य | - | त्याकरता आवश्यक असलेली ठोक रक्कम (Lump sum Allocation) | - |
| १० | अभ्यासक्रम ३ (ब) पंचायतीराजचा टी.व्ही. चॅनल आणि आकाशवाणी कार्यक्रम | - | ठोक रकमांची तरतूद (Lump sum Allocation) | - |
| ११ | अभ्यासक्रम ३ (क) पंचायत राज वार्तापत्र | - | रु. १० प्रत्येक वार्तापत्रा गणिक अशा प्रत्येक महिन्यास, प्रत्येक पंचायतींकरता ५ प्रती या दराने ६० प्रती दर वर्षास दर पंचायतीमागे | - |
| १२ | अभ्यासक्रम ३ (ग) माध्यमिक पंचायत पातळीवरची सहाय्यक केंद्रे | - | प्रत्येक सहाय्यक केंद्रास ठोक रक्कम रु.३ लाख | - |
| १३ | अभ्यासक्रम ३ (ह) मदतकेंद्रे (Helplines) | - | प्रत्येक राज्यास ठोक रक्कम रुपये १ कोटी | - |
| १४ | प्रशिक्षण कार्यक्रम व्यवस्थापन | - | एकूण वार्षिक खर्चाच्या १ टक्के रक्कम | - |

**तक्ता क्र १७ मध्ये दुसऱ्या वर्षात व त्यानंतरच्या येणाऱ्या प्रत्येक वर्षात वार्षिक खर्च कसा करावयाचा त्याचे कोष्टक दिले आहे.**

**तक्ता क्र १७**

| अ.क्र | बाब | परिमाणाची संख्या | मोजमाप करण्याचा निकष | एकूण खर्च (कोटी रुपये ) |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षकांचे उच्चस्तरीय उजळणी वर्ग | - | ४ दिवसांचा प्रशिक्षण वर्ग रु. २०० प्रत्येक प्रशिक्षणार्थीकरता (यात इतर सर्व खर्च समाविष्ट केले आहेत) | - |
| २ | अभ्यासक्रम ३ (इ) प्रतिवर्षी घ्यावयाचा उजळणी वर्ग | - | ४ दिवसांचा प्रत्येक प्रशिक्षणार्थीकरता रु १५०/- या दराने २२ लाख निर्वाचित पंचायत सदस्यांकरता | - |
| ३ | अभ्यासक्रम ३(अ) ग्रामसभा पातळीवरचे अभियान | | प्रत्येक जिल्हयाकरिता रु. ५ लाखाची ठोक रक्कम | |
| ४ | अभ्यासक्रम ३(फ) नमुनेदार आदर्श,व निवडक ग्रामपंचायतींना भेटी देणे | | २ दिवसांचा अभ्यासवर्ग रु. १५०/- दर दिवशी दर व्यक्तीचा या दराने १० लाख निर्वाचित | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पंचायत सदस्य आणि स्थाही समितीचे अध्यक्ष यांचेकरिता | |
| ५ | अभ्यासक्रम ३ (य) प्रमाणपत्रे देण्याकरिता घेतलेला प्रशिक्षण वर्ग | | १०० व्यक्तींना एका वर्षात प्रशिक्षित करण्याकरिता प्रत्येक प्रशिक्षण वर्गास रु. १०,०००/- देवून | |

**६.४ प्रत्येक राज्याने तपशिलवार प्रकल्प तयार करण्याकरता सुचना :**

सदर नियमावलीच्या चौकटीनुसार प्रत्येक बाबींची अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येक राज्याने एक प्रकल्प अहवाल तयार करुन सादर करावयाचा आहे. प्रत्येक राज्यास या चौकटीमधील विशिष्ट कार्यक्रमांवर भर द्यावयास असल्यास प्रकल्पाची कागदपत्रे सादर करताना आवश्यक असलेले तांत्रिक सहाय्य केंद्रशासनाच्या पंचायत राज मंत्रालयाकडून उपलब्ध होईल.वरील दिलेला अभ्यासक्रमांचा अनुक्रम ज्या पध्दतीने दिला आहे. त्याच पध्दतीने तो ठेवून तसेच त्यात दिलेली कामे त्यानुसार पुरी करुन विशेष स्वरुपाचे प्रकल्प तयार करावेत. पंचायतींना जेवढे अनुदान उपलब्ध झाले असेल त्यानुसार या प्रशिक्षण कामांच्या दिवसांमध्ये आवश्यक तो बदल करता येईल. त्याचप्रमाणे राज्यांमध्ये उपग्रहीय प्रशिक्षणाच्या साखळीबध्द यंत्रणेचा उपयोग करावा. त्याचबरोबर एक दूर अंतरावरुन संपर्क साधणारे (दुरस्थ) प्रशिक्षण केंद्र (Distance Training Center) उभारण्याचे अंतिम ध्येय साध्य करण्याकरिता प्रयत्न करावेत. राज्यवार प्रकल्पांनी प्रशिक्षणाकरिता कोणत्या सुविधा सध्या उपलब्ध आहेत त्यांच्या गणनेचे काम हाती घ्यावे की जेणेकरुन भविष्यात फक्त थोडया अधिक गरजा नेमक्या कोणत्या पूर्ण करता येईल यांचा अचूक अंदाज घेता येईल. राज्यपातळीवरच्या संदर्भात आवश्यक असेलल्या विशेष कार्यांची चौकट तयार करण्याकरिता व तिचा अंतर्भाव राज्याच्या योजनेत करण्याकरिता राज्याच्या पातळीवर असलेल्या निकडीच्या गरजांची वस्तुनिष्ट तपासणी व परीक्षण (assessment) करण्याकरिता विद्यमान उपलब्ध असलेल्या सुविधा आणि नजिकच्या आगामी वर्षात उपलब्ध करण्याच्या सुविधा याबाबतीत योग्य विचार व मूल्यमापन करण्यात मदत होईल.

# परिशिष्ट - ४
# मागास वर्ग व मागास जमाती यांच्या विकासाकरिता असलेली राखीव निर्देशित अनुदाने आणि त्यांच्या आधारे पूर्ण करावयाच्या अग्रक्रमांच्या योजनांची (schemes) यादी

१ समाज-सभागृहे (सर्वांसाठी खुली)

२ निवासाची सोय असलेले उच्चमाध्यमिक महाविद्यालय/त्यात मागासवर्ग व मागास जातीच्या विद्यार्थांना राहण्याकरिता स्वतंत्र इमारती (Hostels)

३ माहिती तंत्रज्ञानाची सोय-सुविधा (ITSs)

४ ग्रामीण क्रिडांगणे.

५ ख्यातनाम बिनसरकारी सामाजिक संघटनेस, त्यांच्या स्वत च्या जागेत माध्यमिक शाळा तसेच मुलींकरिता महाविद्यालय चालू करण्याकरिता आरंभाच्या काळात फक्त एकदा रुपये २० लाखाचे एकरकमी अनुदान देण्याकरिता उपलब्ध करणे.

६ २० अल्पभूधारक सिमांत मागासवर्गीय /मागासजातीच्या शेतक-यांच्या स्वयंसहाय्यता गटास ट्रॅक्टर व त्याची ट्रॉली तसेच शेतकी अवजारे खरेदी करण्यास आर्थिक सहाय्य देणे.

७ संगणक, मोबाईल दुरुस्ती, वाहन चालविणे यांचे सुशिक्षित तरुणांना प्रशिक्षण.

८ समांतर लष्करी दलांमध्ये (Paramilitary) तसेच इतर सुरक्षा दलांमध्ये नोकरी मिळण्यापूर्वी किंवा भरती होण्यापूर्वी द्यावयाचे आवश्यक प्रशिक्षण.

९ दुकानांची किंवा व्यावसायिक केंद्राची बांधकामे करुन त्यातील दुकानांचे गाळे होतकरु तरुणांना देणे, इत्यादी.